

१९९०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ९३७८

# मराठी साहित्य दर्शन

६

REFBK-0010863

अ.वा.वर्टी

अ.वि.गृह प्रकाशन पुणे

अवा॰ २६३२५

दि. २९-२-५९

अ. वि. गृह प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्र. २८३२५ वि. निवा
क्रमांक ९३१८ नों दि: २१-२

# मराठी साहित्य-दर्शन

पुष्प सहावें : डॉ. अ. वा. वर्टी

★

संपादन व प्रस्तावना
प्रा. चंद्रकुमार डांगे,
एम्.ए., एम्.ईडी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०८६३

REFBK-0010863

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे

नोव्हेंबर ] किंमत दोन रुपये [ १९६०

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

प्रकाशक :
**दि. दा. गांगल**, एम्. एस्सी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं,
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २

●

प्रथमावृत्ति नोव्हेंबर १९६०

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

●

मुद्रक :
**दि. दा. गांगल**, एम्. एस्सी.
लोकसंग्रह छापखान्यासाठीं,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रकाशकाचें निवेदन

मराठी साहित्य-दर्शनाचें हें पुष्प वाचकांच्या हातीं देण्यांत आम्हाला धन्यता वाटत आहे. मराठी साहित्यांतील थोर लेखकांच्या वाङ्मयाचा परिचय थोडक्यांत करून द्यावा असा त्याच्या मागचा हेतु आहे. मराठींतील नामवंत साहित्यिकांचें विपुल लेखन अनेक ग्रंथांच्या द्वारें, मासिकें, साप्ताहिकें, वृत्तपत्रें व रेडिओ इत्यादि विविध माध्यमांच्या द्वारें प्रकाशित होत असतें. ग्रंथालयांत किंवा ग्रंथागारांत पाऊल टाकलें की, एखाद्या लेखकाचींसुद्धा असंख्य पुस्तकें आढळून येतात. तेव्हा अशा स्थितींत कोणतें पुस्तक वाचूं व कोणतें नको, याचा संभ्रम माणसाला पडतो व त्यामुळे तो थोडासा गोंधळूनहि जातो. याशिवाय एखाद्या लेखकाच्या सर्व ग्रंथांचें वाचन व परीक्षण करणें प्रत्येक व्यक्तीला शक्य नसतें—निदान सध्यांच्या यांत्रिक-युगांत तेवढी सवडहि सर्व व्यक्तींना मिळतेच असें नाही. परंतु नामवंत लेखकाच्या सर्व वाङ्मय-प्रकारांचें दर्शन घडावें, ही इच्छा मात्र व्यक्तीच्या ठिकाणीं असते. अशा इच्छेची पूर्ति या मालेच्या द्वारें होईल अशी आम्हांस खात्री वाटते.

मराठींतील कांही नामवंत साहित्यिकांचा या दृष्टीने परिचय करून द्यावा, अशा हेतूने मालेचा प्रारंभ करण्यांत आला आहे. नामवंत साहित्यिकांच्या विपुल वाङ्मय-भांडारांतून निवडक व उत्कृष्ट, शिवाय त्यांत साहित्यिकाने लिहिलेलें शक्यतों सर्व तऱ्हेचे वाङ्मय-प्रकार यावेत या हेतूने आम्ही संपादकांना विनंती केली व ती त्यांनी मान्य केली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. मराठी साहित्यप्रेमी वाचकांना ही माला अर्पण करून हें निवेदन पूर्ण करतों.

नोव्हेंबर १९६०

व्यवस्थापक,
**अ. वि. गृह प्रकाशन, पुणें २.**

# विहंगालोक :

माझे स्नेही श्री. मो. ग. रांगणेकर आपल्या 'नाट्य-निकेतन' या संस्थेसाठी नवें नाटक रंगभूमीवर आणीत आहेत, ही कुणकुण मला जेव्हा लागली तेव्हा माझें औत्सुक्य चाळविलें गेलें. 'राणीचा बाग' असें काहींसें विनोदी नांव असलेलें नाटक रांगणेकर दिग्दर्शित करीत आहेत, या त्यांनीच सांगितलेल्या बातमीनें तें औत्सुक्य अधिकच वळावलें. सुविख्यात अभिनेत्री स्नेहप्रभा प्रधान या नाटकांत काम करीत आहे या नव्या तपशिलाने तर मी उतावळा होऊन एकदा पुण्याला आणि एकदा मुंबईला 'राणीचा बाग' कसा घडतो आहे, हें पहायला देखील गेलों. 'उमा, उमा, काय केलंस तूं हें ?' अशी किंकाळी फोडून माझे नटमित्र श्रीपाद जोशी बोलत होते. स्नेहप्रभा बाई चाचपडत प्रवेश करीत होत्या. त्यांच्या डोळ्यांतून आसवें गळत होतीं ! श्री. रांगणेकरांना नंतर मीं विचारलें, 'नाटक ट्रॅजेडी आहे वाटतं ?' त्यावर ते म्हणाले, 'हो !' 'कोणीं लिहलं आहे ?' मी. 'नाशिकचे डॉ. वर्टी.' रांगणेकर. 'पहिला प्रयोग केव्हां करणार ?' मी. 'पुण्याला करणार आहें पहिला प्रयोग ?' हें संभाषण इथेच थांबलें.

६ ऑगस्ट १९४९, शनिवारीं पुण्याच्या भानुविलास रंगमंदिरांत मी 'राणीचा बाग' ह्या नाटकाचा पहिला प्रयोग पहिला आणि हे वर्टी आहेत तरी कोण म्हणून बघूं लागलों ! आणि वर्टींची ओझरती दृष्टिभेट झाली ती १९५७ सालीं रांगणेकरांच्या पन्नाशीच्या सत्कार-समारंभाच्या निमित्तानें.

'राणीचा बाग' या नाटकाने मला खरोखर वेडें केलें होतें. स्नेहप्रभा प्रधान आणि श्रीपाद जोशी यांच्या असामान्य अभिनयाने या मूळच्या सुंदर नाट्यकृतीला अपूर्व रंगत प्राप्त करून दिली होती. या नाटकाचे कितीतरी प्रयोग मी पुण्यामुंबईस मन लावून पाहिलें आणि टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या स्नेहसंमेलनासाठीं हेंच नाटक निवडून त्याचा प्रयोग केला.

'राणीचा बाग' नाटकाबद्दलचें सारें प्रेम व्यक्त करण्याची अनावर हौस पूर्ण झाली. मी आणि माझे विद्यार्थी या नाटकाच्या धुंदींत कितीतरी दिवस होतों! पण वर्टी मला कधीच भेटले नाहीत. मध्यंतरीं पुलाखालून पुष्कळ पाणी वाहून गेलें, आणि एक दिवस कै. प्रा. शं. दा. चितळे यांनी आज्ञा केली, 'तुम्ही वर्टींचा कथा-संग्रह संपादन करा!'

तसें म्हटलें तर वर्टींना आजपावेतों विपुल आणि विविध प्रकारचें लेखन केलेलें आहे. 'अभिनय' आणि 'नवा धर्म' या कादंबऱ्या, वर उल्लेखिलेलें 'राणीचा बाग' हें नाटक, 'तिसरी इच्छा' नांवाची एकांकिका, 'पिसारा' या शीर्षकाने प्रकाशित झालेला लघुनिबंध-संग्रह आणि आठ लघु-कथासंग्रह ही डॉक्टरांची वाङ्मय-संपदा, म्हणजे वर्टींच्या लेखन-परिसरांत कथेचा ताटवा बहरलेला दिसतो. 'मुमताज' आणि 'टॉमी' या त्यांच्या कथापुष्पांना अनुक्रमें 'समीक्षक' आणि 'किर्लोस्कर' या नियतकालिकांनी गौरवून पारितोषिकें दिलीं हें अर्थपूर्ण आहे. अजूनहि डॉक्टर लिहीत आहेत. गति आणि गुणसंपन्नता यांचा तोल साधणें एका दृष्टीने कठीण असतें. वर्टींच्या समग्र लेखनाचा विहंगालोक अनुभवला तर हें अवधान त्यांनी काटेतोल पाळलें आहे असाच निष्कर्ष आपोआप मनांत येतो. विशेषतः कथेच्या बहरलेल्या ताटव्याकडे दृष्टिक्षेप टाकला तर वर्टींच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाची जडण-घडण डोळ्यांत भरते. कालच्या आणि आजच्या कथा प्रवाहांत कथालेखक वर्टी आहेत तरी कोणत्या कोणत्या घाटावर? हें नीट समजून घ्यावयास थोडें मागें वळून पाहिलें पाहिजे.

कहाणी, गोष्ट, कथा, लघुकथा, लघुत्तम कथा, व्यंगकथा आणि नवकथा अशा वेगवेगळ्या नांवांनीं मराठी गोष्ट वाढीला लागली. जानपद कथा, शिकारकथा हास्यकथा, रहस्यकथा इ. विशिष्ट अभिधानानेंहि मराठी गोष्ट चिर परिचयाची होत गेली. प्राचीन संस्कृत वाङ्मयाच्या दिव्य भांडारांत लक्षावधि कथारत्नांच्या राशी विराजिलेल्या आहेत. त्यांचें मराठी-करण आणि इंग्रजी भाषेंतील कथांची भाषांतरें अशा दुहेरी तीरामधून मराठी कथेची धारा अप्रतिहतपणें मार्ग काढीत गेलेली दिसते. पण या प्रवाहाला गति, व्यापकता, खोली आणि सौंदर्य यांचा लाभ करून दिला तो मराठी नियतकालिकांनीं. किंबहुना मराठी नियतकालिकांचा इतिहास

म्हणजेच मराठी गोष्टीच्या वाटचालीचा आलेख असें म्हणणेच सार्थ ठरेल. कालचे आणि आजचे ज्येष्ठ-कनिष्ठ कथालेखक या नियतकालिकांनी प्रकाशांत आणले, त्यांचा कथा-संसार नेटका करून दिला. आजदेखील ही परंपरा खंडित झालेली नाही. 'करमणूक', 'कुटुंब-शिक्षण-माला,' 'मनोरंजन' , 'रत्नाकर', 'ज्योत्स्ना', 'पारिजात' 'प्रतिभा', 'यशवंत', 'किर्लोस्कर', 'वसंत', 'हंस', 'सत्यकथा', 'समीक्षक' हीं नियतकालिकें म्हणजे मराठी गोष्टीच्या प्रवासांतील अर्थपूर्ण मैलाचे शिला-कोण होत. मराठी गोष्टींचा इतिहास तो घडविणाऱ्यांच्या स्मरणाने देखील सांगतां येईल. हरिभाऊ आपटे आणि सहकारी कृष्ण, वि. सी. गुर्जर आणि ना. ह. आपटे, फडके आणि खांडेकर, विभावरी शिरूरकर आणि कृष्णाबाई, वोकील आणि शामराव ओक, य. गो. जोशी आणि दिवाकर कृष्ण, लक्ष्मणराव सरदेसाई आणि वि. स. सुखटणकर, अरविंद गोखले आणि गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे आणि शांताराम, व्यंकटेश माडगूळकर आणि द. मा. मिरासदार अशा कांही वेचक कथाकारांच्या नांवाभोंवती मराठी गोष्टींचीं वलयानुवलयें दिसतात आणि मराठी गोष्टीची कहाणी आकलन होते.

सरल निवेदनापासून तो सघन अनुभवाचा साक्षात्कार घडविण्याचें सामर्थ्य मराठी गोष्टीने प्रकट केलेलें आहे. तिच्या अनुभवाची आणि आवाहनाचीं क्षेत्रेंहि विस्तारलेलीं आहेत. मराठी गोष्ट आज संपूर्णपणें कलात्मक पातळीवर उभे राहण्याची स्वाभाविक धडपड करीत आहे. परंतु 'गोष्ट' या अभिधानानें चिरपरिचित असलेली वाङमयीन कृति आजहि तितकीच लोकप्रिय आहे हें सत्य आहे. कै. प्रा. श्री. म. माटे, व्यंकटेश माडगूळकर, श्री. ज. जोशी, शंकर पाटील, मिरासदार, सुधा नरवणे, पु. भा. भावे इत्यादि कितीतरी लेखक आणि लेखिका आपल्या गोष्टींनीच मराठी वाचकांचें चित्त हेलावून टाकीत आहेत. 'मराठी गोष्ट' असा शब्दप्रयोग जो वरील विवेचनात आलेला आहे तो हेतुपूर्वक योजिलेला आहे. कारण डॉ. वर्टी हे देखील गोष्ट लिहूनच आपलें वैशिष्ट्य प्रगट करतात आणि आपलें लक्ष खिळवून टाकतात.

अगदी वरवर नजर टाकली तरी वर्टी हलक्या-फुलक्या (Light) गोष्टी रंगविण्यांत पराकाष्ठेचे कुशल आहेत हें समजून येतें. अकरावा

गडी, टालडुप्यो वाँगिमाडू, सुलूचा सर्व्हेट हीं त्यांच्या संग्रहाचीं शीर्षकें देखोल साक्ष देतात ती हीच. पण 'विनोद' या विशेषणाने मात्र या कथांचें खरें आणि पूर्ण वर्णन होईल असें नाहीं. चिं. वि. जोशी, श्री. कृ. कोल्हटकर, पु. ल. देशपांडे इत्यादिकांना आपण ज्या अर्थाने 'विनोदी' लेखक म्हणतों तशा अर्थानें वर्टींना म्हणतां येणार नाही. विनोदाचा वापर वरील लेखकांनी ज्या एका विशिष्ट हेतूने केलेला आहे, (आणि ज्यामुळें मराठींत विनोदी वाङमयाला कांही मर्यादाहि निर्माण झालेल्या आहेत.) एखादी विशिष्ट Type ची व्यक्तिरेखा निर्माण केली आहे, तसें वर्टींचें नाही. म्हणूनच त्यांच्या कथा Light या शब्दानें अधिक चांगल्या गौरविल्या जातील. अगदी तुलनाच करायची म्हटलें तर वि. वि. बोकिलांचें नांव, कथेची तऱ्हा (Pattern) स्पष्ट करण्यास निर्देशितां येईल. पण बोकील अनेकदा अभिरुचीला देखील मान खाली घालण्यास भाग पडेल असा विनोद करतात. वर्टी या सर्व दोषापासून अलिप्त आहेत. 'मुमताज' ला लिहिलेल्या प्रस्तावनेंत आचार्य अत्र्यांनी त्यांना आवडलेल्या कथांचा जो निर्देश केला आहे तोच खरा वर्टींचा प्रांत. तो म्हणजे हलक्या–फुलक्या खिलाडू वृत्तीच्या आणि जीवनाकडे आशावादी दृष्टीचा मंदोष्ण प्रकाश टाकणाऱ्या गोष्टी होत. या संग्रहांतील सात कथांच्या सप्तकांत वर्टींचें प्रतिभा विश्व सप्तरंगांनीं उजळून गेलेलें दिसतें. उरलेल्या दोन गोष्टींची गोष्ट मग विचारांत घेऊं

वर्टी आपली गोष्ट सरळ सांगतात आणि तिच्यांतील घटनेच्या मूळ शक्तीमुळे हें निवेदन गतिमान होतें. या सर्व निवेदनाचा नूर असतो तो उपरोधाने, व्याजोक्तीने नटलेला. विनोदाच्या आश्रयानें सामाजिक प्रवृत्ति, मनोधर्म, परंपरा यांच्यांतील विसंगतीवर बोट ठेवण्याची मराठी वाङमयांतील रूढ प्रवृत्ति वर्टींच्या लेखनांत आढळते; पण तिला 'उपदेशाचें' 'तात्पर्यार्थाचें' वळण ते देत नाहींत. किंवा मुद्दाम एखादी कलाटणी देऊन आपल्या कथेचा डौलहि बिघडवीत नाहीत. याचीं उत्तम उदाहरणें म्हणजे 'खेड्यावल्लीं माणसें' आणि 'किलबिल' या कथा होत. खेड्यांतील माणसांच्या निरागसतेबद्दल फार मोठा बभ्रा असतो. हा भ्रम, वर्टी एका त्यांच्या अनुभवाच्या द्वारें दूर करतात. ज्या वेळीं आपलाच ऐन जिनसी अनुभव

कथेच्या द्वारें प्रगट करावयाचा तेव्हा लेखक सरळ 'मी'नेच सर्व निवेदन करतो. वर्टींचें हें एक आणखी वैशिष्टय; पण हा 'मी' केवळ कलात्मक अलिप्तता राखीत नाही; तर संपूर्ण अनुभवच वास्तवाच्या संवेदनक्षम पातळीवरून सांगतो. गुजगोष्टींतील 'मी' हा खरा लेखक मानणें अकलात्मक तसें इथे आहे; परंतु म्हणून डॉक्टर वर्टी आपल्याच अनुभवाचें भांडवल करून वैयक्तिक सुख दुःखाभोवती रुंजी घालीत नाहीत. म्हणूनच त्यांच्या अनुभवाला जें आवाहन लाभतें तें लौकिक, विश्वात्मक असतें. साहजिकच त्यांची कथा वैयक्तिक आवर्तांत न गुरफटतां जीवनाकडे सरळ सरळ दृष्टि रोखते. इथेच वर्टी, केवळ 'कहाणी' सांगणाऱ्या जुन्या व नव्या कथाकाराहून जसे वेगळे दिसतात तसेच नव्या कथाकारांच्या परिमित कक्षेंतून निर्माण होणाऱ्या व म्हणूनच अनाकलनीय आशय व्यक्त करणाऱ्या प्रवृत्तीपासून अलग दिसतात. 'नवकथाकाराची हॅट' ही कथा या प्रवृत्तीची एक साक्ष. अगदी फौजदारी खटल्यांतील साक्ष. म्हणूनच ती कथा कलात्मतेची उच्च पातळी गाठूं शकत नाही; पण हें एक अनवधानाने किंवा मोहवशतेने घडलेलें लेखन म्हणून विस्मरणीय. 'किलबिल' हा जसा त्यांच्या लेखनांतील सहज सुंदर आविष्कार तद्वतच 'यंत्र-विशारद', 'रंगरावांची गैशा', 'मी केलेली चोरी', 'र. गो. फाटक' या कथा वर्टींच्या खेळकर, आशावादी दृष्टिकोणाच्या प्रत्यय घडविणाऱ्या. हें सारें लेखन कोणत्याहि ठराविक तंत्राची जाचक जाणीव करून देत नाही तद्वतच तें आपलें प्रवाहित्व खंडितहि करीत नाही. यामुळेच वर्टींच्या कथा वाचकांच्या मनाची पोलादी पकड न घेतां त्यावर कलाबुताचें जाळें टाकून त्याला मोहक अस्वस्थता मिळवून देतात.

'नवा संसार' व 'फत्तर' या आणि 'अखेरचा आघात' या संग्रहांतील सर्वच गोष्टी म्हटल्या तर प्रासंगिक. भारताच्या फाळणीच्या प्रसंगाने निर्माण झालेली उलघाल हा साऱ्याच कथांचा गाभा; पण या कथा जर कै. माटे, पु. भा. भावे, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर किंवा मामा वरेरकर यांनीं रंगविल्या असत्या तर त्यांचें रूप कसें झालें असतें याचा विचार अपरिहार्यपणें मनांत येतो. भडकपणा, प्रचार, विलास आणि भाव विवशतेचें दारूकाम करण्याचा मोह पाडील, अशीं द्रव्यें या घटनांत

ठासून भरलेलीं आहेत. कोणत्याहि नव्या-जुन्या लेखकाला आपल्या शब्द-कलेची हौस फेडून घेण्यास मोह पाडील अशीं हीं कथा-बीजें आहेत; पण डॉक्टर वर्टींनी हे सारे मोह सहजतेने टाळले आहेत. म्हणून तर नवा संसार आणि फत्तर यासारख्या कथा वाचल्यानंतर मनाला दारुण विकलतेचा चटका बसून तें सुन्न होतें. इथे वर्टी कुठेच स्वत: डोकावून कथेला डिवचत नाहीत. जें सारें घडतें तें आपातत: आणि नैसर्गिक मानवी मनाच्या क्रीडेंतून निर्माण होणाऱ्या प्रवृत्तींतून, वास्तवाची दाहकता आकारित होते ती प्रसंग आणि त्यांतील व्यक्तिरेखांच्या अपरिहार्य संघर्षातून. Truth is as strange as fiction असें म्हणावेसें वाटतें तें अशा कथांचा अनुभव घेतल्यानंतर.

वर्टींनी लिहिलेलें जें नाटक गाजलें तें 'राणीचा बाग' हें होय. कादंबरीवर आधारित अशी असफल नाटकें मराठी वाङमयांत पुष्कळ आहेत; पण नेमका वर्टींच्या बाबतींत मात्र वेगळा अनुभव प्रत्ययास आलेला आहे. अप्रत्यक्षपणें जणू असें सिद्ध झालें की, 'अभिनय' या कादंबरीचें कथाबीज नाटकाच्या माध्यमांतून प्रभावीपणे प्रगट होण्यास अधिक अनुकूल होतें. कथा, कादंबरी, काव्य, नाट्यछटा, निबंध इत्यादि लेखन-प्रकाराच्या संदर्भांत जेव्हा आपण 'नाट्यगुणा'चा निर्देश करतों तो आणि नाटकांत अभिप्रेत असलेला 'नाट्य' हा गुण एकाच जातीचा नाही, हें या ठिकाणीं स्पष्ट होतें. नाट्य केवळ विरोधांतूनच प्रगट होतें हाहि एक भ्रम आहे. किंबहुना तसा ढोबळ विरोध (Conflict) राणीच्या बागेंत अभावानेच आहे. जी सारी तडफड आहे ती उमेच्या दोन विश्वांमधली. दृष्टिहीनाचें जग आणि डोळसांचें जग यांत पसरलेल्या भयानक वास्तवाचें रूप ती न्याहाळते आणि असल्या गलिच्छ दर्शनीय जगापेक्षा आपली शांत, नीरव, पारदर्शक प्रकाशहीन अंत:सृष्टि सुखाने पत्करते. उमेचे डोळे फोडून घेणें हें केवळ उमाकांताच्या विरूपतेचा परिपाक नाही. मग ही कृति केवळ 'नाटकी' म्हणूनच भाव-विवश ठरली असती. मनोहरच्या सौंदर्याचा मोह तिला पडतो. ती तें कधीच नाकारीत नाही. इथे उमेचें मानवी मन आपल्याला कळूं शकतें; पण ती आपल्या डोळस जीवनाला अल्पकालांतच विटते. आंधळी उमा खरी डोळस असते. डोळस उमा आंधळी बनते. पुनः तें अबोध डोळसपण अनुभविण्यासाठी ती दोन खोबणींतल्या बाहुल्या

जाणिवेने फोडून टाकते. या साऱ्या घटनांना वर्टींनी आपल्या नितान्त सुंदर संवादांनी गुंफून टाकलें आहे. नटाच्या सर्जनशीलतेला आव्हान देणारी कृति वर्टी निर्माण करूं शकले त्याचें रहस्य या 'नाट्य' गुणांत आहे.

आज हें आणि या धर्तीवरचीं सुंदर पुस्तकें प्रकाशित झालेलीं पहाण्यास आपले श्री. अप्पासाहेब चितळे नाहीत, ही खंती मनाला विषण्ण करते आहे हें सांगितल्यावाचून राहवत नाही. असो.

असें आहे वर्टींचें लेखन-विश्व. त्याचा हा विहंगालोक रसिक वाचकाला प्रिय होईल अशी खात्री वाटते.

कोजागिरी
४–१०–६०
पुणें

चंद्रकुमार डांगे

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | मीं केलेली चोरी | १ |
| २. | खेड्यावल्लीं माणसं | ११ |
| ३. | यंत्र-विशारद | २३ |
| ४. | श्री. र. गो. फाटक | ३३ |
| ५. | रंगरावांची गैशा | ४६ |
| ६. | नवकथाकाराची हॅट | ५८ |
| ७. | फत्तर | ७१ |
| ८. | नवा संसार | ८६ |
| ९. | किलबिल | ९६ |
| १०. | उमा, उमा काय केलंस तूं हें ! | ११२ |

# डॉ. अ. वा. वर्टी

## यांचें साहित्य

लघुकथा-संग्रह :

(१) मुमताज
(२) रुपेरी स्वप्न
(३) नवा देव
(४) अखेरचा आघात

विनोदी कथासंग्रह :

(१) दंतकथा
(२) टालडप्पो वाँगिमाडूऽऽ
(३) सुलूचा सर्व्हंण्ट
(४) अकरावा गडी

कादंबरी :

(१) अभिनय
(२) नवा धर्म

नाटक :

राणीचा बाग

एकांकिका

(१) तिसरी इच्छा
(२) सुलूचा रामा—इडली डोसा

लघुनिबंध संग्रह :

(१) पिसारा

ह्याशिवाय संग्रहांत न आलेल्या अशा १०० कथा आहेत. ‘ टॉमी ’ व ‘ मुमताज ’ ह्या कथांना अनुक्रमें ‘ किर्लोस्कर ’ व ‘ समीक्षक ’ ह्या मासिकांच्या स्पर्धांत प्रथम पारितोषिकें मिळालीं. १९४७ ते ५४ पर्यंतच्या सात स्पर्धांतील सर्वोत्कृष्ट नाटक म्हणून ‘ राणीचा बाग ’ ला मुंबई-राज्य-सरकारचें पारितोषिक, तसेंच इंदूरचें यशवंत पारितोषिक मिळालें.

दा. क्र. १०८६३

१

# मीं केलेली चोरी

[ आपल्या सामाजिक प्रतिष्ठेला जिवापाड जपणाऱ्या मध्यमवर्गीयांच्या धडपडीचें रेखीव चित्र पुढील कथेंत रेखाटलें आहे. गुजगोष्ट आणि लघुकथा यांच्या सीमारेषेवर रेंगाळणारें हें लेखन मानवी स्वभावाच्या परस्परविरोधी गुणावगुणावर प्रकाश टाकतें. एका अत्यंत साध्या भावक्षणाचें चित्रण लेखक हळुवार शैलीने कसें करतात व उपरोधाच्या नाजुक शिडकाव्याने कसें आल्हादकारक करतात त्याचा एक नमुना. श्री. वर्टींच्या कथांना नवें, अनुभवाचा गाभा टिपून घेणारें सामर्थ्य कसें लाभत आहे त्याची साक्ष म्हणजे ही भावकथा. ]

★ ★ ★

कांहीकांही गोष्टी अशा असतात, की माणसाजवळ कितीहि पैसा असला तरी त्या त्याला पैसे देऊनहि मिळू शकत नाहीत. अन् मग माणसाला ती वस्तु आडमार्गानं मिळवणं प्राप्त होतं.

'पैसा देऊनहि मिळू न शकणारी वस्तु !—' तुम्ही कथाकादंबऱ्यांचे वाचक असाल तर हे शब्द तुमच्या डोळ्यांखालून हजारों वेळा गेलेले तुम्हांला आढळतील. हे शब्द पाहून तुम्हांला वाटेल, की आता एखादी प्रेमाची भानगड मी तुम्हांला सांगणार आहे अन् तुम्ही सरसावून बसाल.

छे छे ! आता मला प्रेमाविषयी बोलताच येणं शक्य नाही. कारण लग्नाच्या बंधनांत मी पडल्यापासून माझ्या प्रेमाच्या खजिन्यावर एक पहारेकरी डोळ्यांत तेल घालून बसलेला आहे.

मी सांगणार आहें तें छत्रीबद्दल.

लढाईमुळं छत्र्या महाग होताहोता, सरकारनं छत्र्यांवर नियंत्रण बसविलं. त्याचा साहजिक परिणाम म्हणून छत्री बाजारांतून अदृश्य झाली !

यंदाच्या पावसाळ्याला सुरुवात झाल्यापासून मी एखादी नवी छत्री विकत घेण्याच्या शोधांत होतों. पण बाजारांतच छत्री नसल्यामुळं माझ्या परिश्रमांवर (एकदोनदां पावसाचंहि) पाणी पडलं !

आता काय करावं ? पावसाळ्यांत छत्रीवांचून कसं चालणार ? अन् माझ्या असंहि दृष्टोत्पत्तीस येऊन चुकलं होतं, की आमच्या गांवचं पर्जन्यमान सरासरी २५–३० इंचच असलं तरी छत्र्या दुर्मिळ होऊ लागल्यापसून गेल्या दोन वर्षांत तें चाळीस इंचांच्या वर जाऊन पोंचलं होतं ! आणि लढाईच्या शेवटच्या वर्षी बाजारांत छत्री अजिबात मिळेनाशी होऊन एकदोनदां पावसांत चांगला भिजून निघाल्यावर मला शंका येऊ लागली, की आपण चेरापुंजीला तर चकन राहायला आलों नाही ना ? आमच्या गावच्या बाजारांत छत्री मिळत नाही असें दिसतांच वरुण राजाला आमचा गांव एकदम प्रिय झालेला दिसून येत होता.

छत्रीचे उपयोग काय ? ऊन, पाऊस, म्हशी, सावकार वगैरेवगैरे-पासून स्वतःचं संरक्षण करून घेणं ! हे उपयोग तर झालेच; पण माझ्या दृष्टीनं छत्रीचा मुख्य उपयोग म्हणजे छत्री हरवणं व त्यामुळं आपल्या विस्मरणशीलतेची आठवण होणं हाच होय ! आतापर्यंत दर पावसाळ्याला कमींत कमी एक याप्रमाणं मी छत्र्या हरवल्या होत्या व सध्या तर मी छत्रीच्या बाबतींत विधुरच होतों.

तुम्ही म्हणाल, छत्री नाही तर नाही; पण रेनकोटहि नव्हता का तुमच्याजवळ ? होता. पांचसहा वर्षांपूर्वी मोठ्या हौशीनं मीं एक रेनकोट विकत घेतला होता. पण रेनकोटाच्या बाबतींत मी एक पाहून ठेवलं होतं. आभाळ अगदी ढगांनी भरून आलं आहे असं पाहून, रेनकोटाचं ओझं खांद्यावर टाकून पावसाच्या आशेनं नि मोठ्या उत्साहानं बाहेर फिरायला पडावं, तर फिरून परत येईपर्यंत आकाश अगदीं निरभ्र झालेलं असावं ! बर, आकाशांत ढगांचा मागमूसदेखील नाही असं पाहून रेनकोट न घेतांच बाहेर पडावं, तर फिरून घरीं परत येईपर्यंत भिजून ओलेचिंब व्हावं ! दोनतीनदां हा अनुभव आल्यानं आकाश निरभ्र दिसलं, त्याच्या कानाकोपऱ्यांत ढगाचा मागमूसहि दिसला नाही की मी बिनचूक रेनकोट घेऊन बाहेर पडू लागलों नि लोकांच्या थट्टेचा विषय होऊं लागलों !

निदान माझी तरी खात्री झाली आहे की रेनकोटाचे खरे उपयोग दोनच. एक म्हणजे शोभा; व दुसरा म्हणजे कोटाची बाही किंवा कॉलर त्याच्या ओझ्यानं चुरगळून टाकणं! माझ्या त्या रेनकोटावर पावसाचा कधी थेंबहि पडला नाही! दर वर्षी पावसाळा सुरू झाला की सारी अडगळ उस्कटून मी तो मोठ्या नियमितपणानं बाहेर काढीं आणि पावसाळा संपला की परत अडगळींत टाकून देईं त्यानं मला ह्याप्रमाणं तीनचार वर्षं 'काम' दिल्यावर, अखेरीस बाजारांतून छत्री अदृश्य होण्याच्या ऐन सुमारासच तो कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडला! त्या 'सहस्राक्षा' ला अंगांत घालून दिवसाचं बाहेर पडणं लोकापवादामुळं शक्यच नव्हतं आणि ह्या वर्षीच्या भयंकर पावसाळ्यांत त्याला अंगांत घालून कांही फायदाहि झाला नसता.

मी जी छत्रीची चोरी करण्याला प्रवृत्त झालों त्याची पार्श्वभूमि ही अशी होती.

त्या दिवशीं दुपारीं मी बँकेंत पैसे काढण्याकरितां गेलों होतों. बँकेंतून रक्कम काढून मला ती तावडतोब मनीऑर्डरीनं बाहेरगांवीं पाठवून द्यायची होती. मी बँकेंत जायला निघालों त्या वेळी नेमका जोराचा पाऊस पडत होता, तेव्हा टांगा करून बँकेंत गेलों. बँकेंतील कारकुनाच्या कामाच्या उरकाची मला चांगलीच कल्पना असल्यामुळं, व टांग्याला दोन तास रखडत ठेवून त्याला नुसतं उभं राहण्याबद्दल पैसे देण्याची कल्पना मला आवडत नसल्यामुळं टांगेवाल्याचे पैसे चुकते करून मी त्याला जायला सांगितलं. म्हटलं, बँकेकडून पैसे हातांत पडल्यावर पाहूं. तोपर्यंत वरुणराजा कदाचित् माझ्यावर मेहेरबानी करून अश्रु ढाळण्याचं बंद करील किंवा ऐनवेळीं एखादा टांगाहि मिळेल.

बँकेंतून पैसे काढण्याविषयीचे सारे विधि आटोपून पैसे हातात पडण्याची वाट पाहत मी खिडकीशी जाऊन उभा राहिलों. पाऊस पडत असल्यामुळं रस्त्यानं जाणारे-येणारे लोक छत्र्या उघडूनच चालले होते. त्यांच्या छत्र्यांकडे पाहत मी मनाची करमणक करून घेऊं लागलों. कुणी आपल्या पुराण्या छत्र्या बाहेर काढून त्यांना भलीं मोठीं ठिगळं लावलेलीं दिसत होतीं. कुणाच्या साधारण बऱ्यापैकी दिसणाऱ्या छत्रीवरून एक नांव पुसून काढून सध्याच्या तिच्या मालकाचं नांव भल्या मोठ्या अक्षरांत

नवीनच घातलेलं दिसून येत होतं. कुणा एखाद्याच्या छत्रीच्या छताला मोठं भगदाड पडलेलं असे नि चालताना तें बरोबर पावसाच्या विरुद्ध दिशेला येईल अशा रीतीनं छत्री फिरविण्याचं त्याचं कसब कौतुक करण्यासारखं असे कुणाच्या छत्रीचा उपयोग पावसाचं पाणी गळून आपल्या अंगावर घेण्यापुरताच होई ! छत्र्यांच्या दुष्काळांतील छत्र्यांचे हे निरनिराळे नमुने पाहत साधारण तास दीड तास माझी चांगलीच करमणूक झाली. इतक्यांत माझ्या नांवाचा पुकार झाला. मी काढीत असलेल्या रकमेचा आंकडा मला विचारण्यांत येऊन मी मीच आहें ह्याविषयीं शहानिशा करण्यांत आली आणि अखेरीस माझ्या हातांत एकदाची रक्कम पडली.

मीं घड्याळांत पाहिलं. अडीच वाजले होते. मनीऑर्डर करण्याचा पोस्टाचा टाइम तीन वाजेपर्यंतच होता. मध्यें थोडा वेळ वरुणराजा विश्रांति घेत असला–बहुधा बँकेच्या गोऱ्या एजंटाप्रमाणं त्याचाहि तो ‘ लंचटाईम ’ असावा—तरी आता माझ्या अपेक्षेच्या बरोबर विरुद्ध बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. जणूं ‘ लंच ’ मधला एखादा पदार्थ अळणी होता नि त्यामुळं चिडलेला वरुणराजा दातओठ खाऊन आपलं काम करीत होता. दृष्टीच्या टप्प्यांत एखादा टांगाहि दिसत नव्हता. पायीं गेलों तर पोस्ट ऑफिस दहा मिनिटांच्या रस्त्यावर होतं. आणि आता तर पायीं जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतं पण ह्या असल्या पावसांत छत्रीशिवाय कसं जाणार ? ह्या वेळी माझ्याजवळ एखादी छत्री असती तर ?....

हा विचार मनांत येताच एका खिडकीकडे माझी दृष्टि वळली. त्या खिडकीच्या गजांना एक नवी कोरी आणि फॅशनेबल पांढऱ्या मिकाच्या मुठीची छत्री अडकवून ठेवलेली मी आल्यापासून पाहत होतों. अजूनहि ती तिथंच होती. मी बँकेंत आलों त्या वेळी बँकेंत असलेले लोक आतापावेतो निघून गेले होते व लोकांचा एक दुसरा संच बँकेशी व्यवहार करीत होता. अर्थात् त्यांपैकी कुणाची ती छत्री नव्हती, हें निश्चित. बँकेंतील कुणा कारकुनाची ती छत्री असणं शक्यच नव्हतं. कारण अशी नवी कोरी व सध्याच्या दिवसांत निदान पंच ीस रुपये किंमत असलेली छत्री एखाद्या कारकुनानं केवळ आपला देह भिजूं नये म्हणून विकत घेतली असणं व ती त्यानं घेतली असल्यास अशी कुणाचाहि हात पोचेल अशा मोकळ्या ठिकाणी ठेवून देणं ह्या

दोन्ही गोष्टी एकापेक्षा एक अशक्य होत्या. बहुतेक कुणीतरी ती छत्री विसरून गेला असावा. माझ्या तर्कपद्धतीप्रमाणं सध्यातरी ती छत्री पोरकी असावी, अशी मला खात्री वाटत होती.

मग लांबवावी का ती छत्री? सध्या परिस्थितींत हा अतियोग्य विचार माझ्या मनांत आला. पण तो येताच माझ्या मनावरील पांढरपेशे संस्कार एकदम उफाळून आले. "चोरी कधी करू नये!" ही क्रमिक पुस्तकांतील कविता हातांत छडी धरून म्हणत असलेले उग्र चेहऱ्याचे माझे लहानपणाचे मास्तर माझ्या डोळ्यांसमोर नाचू लागले. सत्य, नीति, सामाजिक स्थैर्य वगैरे अनेक गोष्टींनी माझ्या मनांत गर्दी केली व त्या छत्रीची चोरी करण्याविषयी माझं मन मागंपुढं होऊं लागलं.

पण तुम्ही मोठमोठ्या समाजशास्त्रज्ञांना, मानसशास्त्रज्ञांना विचाराल, तर ते तुम्हांला सांगतील, की बहुतेक चोरी करण्याची जन्मजात प्रवृत्ति नसते भांडवलशाही, सामाजिक विषमता व प्रतिकूल परिस्थिति ह्यांनी गांजल्यामुळंच चोर चोरी करण्यास प्रवृत्त होतो. सध्याच्या क्षणाला माझी सामाजिक व वैयक्तिक परिस्थिति अशी होती, की त्या सर्वांचा नैसर्गिक शेवट एकाच गोष्टींत होणं शक्य होतं व ती गोष्ट म्हणजे चोरीच!

माझ्या मनांतील पांढरपेशा विचारांना मीं तसंच कोकलत ठेवलं आणि त्या छत्रीची चोरी करायचीच असा मनाचा हिय्या केला!

बँकेंतील सर्व मानवांची मी एकदां पाहणी केली, कुणाचंच भावी चोराकडे व चोरल्या जाणाऱ्या वस्तूकडे लक्ष नव्हतं. मोठमोठ्या पुस्तकांवर डोक्यावरील विजेच्या दिव्यांच्या प्रकाशांत माना मोडून आकडे मोडण्यांत कारकूनवर्ग गढून गेला होता. कौंटरपाशी उभे असलेले लोक चिठ्ठ्याचपाट्या लिहिण्यांत नाही तर पैसे मोजून घेण्यांत गर्क झाले होते. नाही म्हणायला बँकेचा पट्टेवाला मात्र एका स्टुलावर बसून त्या छत्रीकडे आणि मधून मधून माझ्याकडे पाहत होता. पण त्याचेहि डोळे झोपेनं जडावल्याप्रमाणं दिसत होते ही त्यांतल्या त्यांत आशादायक वस्तुस्थिति होती.

माझ्या हालचाली कुणाला संशयास्पद वाटूं नयेत म्हणून कांहीतरी चाळे करीत मी कालहरण करीत होतों व त्याचवेळीं डोळ्यांच्या कोपऱ्यांतून त्या पट्टेवाल्यावर नजर ठेवीत होतों थोड्याच वेळांत त्याच्या पापण्या हळू-

हळू त्याच्या डोळ्यांना झाकू लागल्या व त्याचं डोकं खालीखाली येऊ लागलं. छत्रीहरणास हा काल योग्य आहे असं हेरून क्षणार्धांत साऱ्या लोकांवरून मी दृष्टि फिरविली माझ्याकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. मी खिडकीशी गेलों आणि आता मी त्या छत्रीवर झडप घालणार—

इतक्यात विजेचा धक्का बसावा तसा मी निश्चल उभा राहिलों !

'दिसते सोपी पण असते कठीण, ह्या अति मार्मिक शब्दांत कुणीसं कलेचं वर्णन केलं आहे. मला वाटतं, सध्या ज्या कलेचा मी उपासक बनलों होतों त्या कलेइतकी दुसऱ्या कुठल्याहि कलेला ही मार्मिक उक्ति सार्थपणीं लागू पडत नसावी माझ्यांत आणि त्या छत्रींत आतां सहा इंचाचं देखील अंतर राहिलेलं नसावं हात उचलून ती छत्री मी उचलण्याचा अवकाश, की ती छत्री माझी होणार होती. पण कांही केल्या माझा हात हालेना. जणू माझ्या हाताला कुणी मणाचं ओझं बांधून ठेवलं होतं ! त्या पावसाळी थंड हवेंतहि माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला.

माझ्या मनाच्या कमकुवतपणाला मीं शिव्या दिल्या. ओठाशी आलेला विजयाचा पेला दूर झाल्यावर हिटलरची जी अवस्था झाली असेल, तशी माझी अवस्था कुठल्यातरी अदृश्य शक्तीपुढं हार खाऊन झाली होती. अखेरीस हें अवघड काम आपल्याच्यानं व्हायचं नाही, तिथं पाहिजे जातीचं, असं ठरवून व प्रियतमेचा शेवटचा निरोप घेणाऱ्या प्रियकराच्या दृष्टीनं एकदा त्या छत्रीकडे पाहून घेऊन मी आता मागं वळणार, इतक्यांत माझ्या कानावर शब्द आले, " साहेब, ही छत्री तुमची का ? "

" हो ! " मी इतका अट्टल खोटं बोलणारा असेन ह्याची मला हा ' ह 'च्या बाराखडींतील ओकारान्त एकाक्षरी शब्द उच्चारीपर्यंत कल्पनाहि नव्हती. तो शब्द उच्चारून झाल्यावर मी त्या मला प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीकडे पाहिलं. पाहतों तों तो पट्टेवालाच माझ्या समोर उभा !

आता मात्र माझ्या पायांचीहि शक्ति गेली. ह्या अवघड परिस्थितींतून मार्ग हुडकून काढण्याविषयी मी माझ्या मेंदूला तातडीचे संदेश पाठवले. पण मेंदूत तर सारं अराजक माजलं होतं. कुणाचा पायपोस कुणाच्या पायांत नव्हता. तरीपण शाब्बास माझ्या मेंदूची ! थोड्याच वेळांत स्वतःला सावरून घेऊन त्यानं मला एक नामी उत्तर सुचवलं– " अं... नाही !

माझी नाही ही छत्री ! पण दिसायला अगदी माझ्या छत्रीसारखीच आहे ! ... कुठं गेली बुवा माझी छत्री ? ... " मेंदूनं सुचविल्याप्रमाणं अशी थाप मारण्याच्या मी अगदी बेतांत होतों. पण तेवढ्यांत तो पट्टेवालाच म्हणाला, " मग साहेब, ह्या दिसांत आपली छत्री ह्यावानी कुठंवी टाकून कसं चालंल ? कुणीवी ती पळवून नेईल, म्हून तर म्या मगापासनं तिच्यावर अक्षी पाळद ठेवून बसलोंया ! " असं म्हणून ती छत्री खिडकींतून काढून त्यानं ती मोठ्या आदबीनं माझ्या समोर धरली.

चोरी करण्याकरितां म्हणून नव्हे, पण चोरीचा येऊ पाहणारा आरोप टळावा म्हणून मग त्या छत्रीचा मीं मोठ्या रुबाबांत स्वीकार केला. मी बाहेर जाऊं लागताच माझ्या पाठोपाठ लाचार चेहऱ्यानं येणाऱ्या त्या मुसळधार पावसाला आव्हान देत मी रस्त्यावर पाऊल टाकलं.

पावसाळ्यांत गावांतील रस्त्यावर चिखल फार होतो अशी गावच्या नगरपालिकेविरुद्ध ओरड करण्याची मला सवय होती, पण सध्याच्या माझ्यावरील संकटांत आमची नगरपालिकाच माझ्या साहाय्याला धावून आली व मी तिला भरीत असलेल्या कराचं सार्थक झाल्याप्रमाणं मला वाटलं. माझ्या हातांत ती छत्री कुणी पाहिली तर ? कुणी तिला ओळखली तर ? अशी भीति मला मनांतून वाटत होती. पण रस्त्यावरील पाण्याची डबकीं टाळण्याचा व शक्य तेवढ्या कमी चिखलांतून चालण्याचा प्रयत्न करण्यांतच साऱ्या वाटसरूंचं लक्ष केंद्रित झालेलं असल्यामुळं माझ्या छत्रीकडे मान वर करून पाहण्याला कुणाला फुरसतच नव्हती !

पोस्टांतील काम आटोपून मी घरीं आलों. माझ्या हातांतील नवी छत्री पाहून साहजिकच सुलूनं विचारलं, " कुणाची ही छत्री ? "

" माझीच. " कोपऱ्यांत छत्री ठेवून देण्याच्या निमित्तानं तिची नजर चुकवीत मी म्हणालों,

" म्हणजे ? विकत का घेतलीत ? "

" हो. पंचवीस रुपयांना. पाऊस हा असा ! " मी बेधडक खोटं बोललों. आपल्या धर्मपत्नीजवळ हरघडी खोटं बोलल्याखेरीज माणसाचं चालत नाही. आपण सत्य धर्मानं चालणारे नीतिमत्तेचे पुतळे, अगदी सोवळे ब्राह्मण

आहोंत अशी तिची समजूत करून देणं संसारस्वास्थ्याच्या दृष्टीनं इष्ट असतं व त्याकरिता खोटं बोलल्याखेरीज गत्यंतरच नसतं !

" मग आता कधी हरवता ही छत्री ? " सुलूनं नेहमीच्या सवयीप्रमाणं मला टोमणा मारला, पण मी तें हंसण्यावारीच नेलं.

मला काय कल्पना सुलूची ही भविष्यवाणी तंतोतंत सत्यसृष्टींत अवतरणार आहे म्हणून !

पुराणाप्रमाणंच चोरीची वस्तु गिळंकृत करणं सोपं असतं; पण ती पचविणं फारच जड असतं ! त्यातून साऱ्या जगासमोर डोक्यावर मिरवित न्यावी लागणारी छत्रीसारखी वस्तु तर चोरून पचविणं फारच अवघड ! साधारणतः छत्री-चोरांचं छत्री पचविण्याचं एक विशिष्ट तंत्र असतं. एखादी छत्री त्यांनी चोरली की वर्ष दोन वर्ष तिला ते दडवून ठेवतात व मग मळ मालकाची तिच्या खाणाखुणांविषयीची आठवण आता बुजली असेल असा अंदाज करून तिला राजरोसपणानं आपल्या डोक्यावर मिरवितात.

हें नेहमींचं तंत्र झालं खरं. पण त्याचा उपयोग करून घेणं मला शक्य नव्हतं, कारण ती छत्री मी विकत आणली आहे, अशी मी सुलूला थाप मारली होती. तेव्हां ती छत्री घरी लपवून ठेवून बिनछत्रीनं पावसाच्या दिवसांत बाहेर पडता येणं मला शक्य नव्हतं. म्हणून मी माझं एक निराळंच तंत्र तयार केलं.

संध्याकाळी अंधार पडेपर्यंत मी घरीच दडी मारून बसलों. मी क्लबांत जावयास निघालों तेव्हा माझ्या 'इंद्राला' ( सहस्राक्ष रेनकोटला ) मी अडगळींत शोधूं लागलों.

" काय शोधणं चाललंय् ? " सुलूनं येऊन विचारलं.

" माझा रेनकोट कुठं आहे ? मी विचारलं.

आतां रेनकोट कशाला ? एवढी सुंदर नवी छत्री आणलीय् पंचवीस रुपयांची अन् तो फाटका रेनकोट कशाला आता ! " सुलू.

" अग असू द्यावा आपला बरोबर. पाऊस हा असा. नुसत्या छत्रीचा काय टिकाव लागणार आहे ? कुठं भिजलों तर फटकन् न्युमोनिया व्हायचा ! "–

मी न्युमोनियाचं नांव काढताच सुलूनं आणखी शंकाकुशंका काढल्या नाहीत. पांचदहा मिनिटं खटपट करून माझा तो खटखटलेला ‘ इंद्र ’ तिनं मला काढून दिला.

मीं हातावर छत्री अडकवली व रेनकोटाची नीट घडी करून छत्रीची मूठ झाकली जाईल अशा बेतानं तो हातावर ठेवून दिला. हेंच तें माझं छत्री पचविण्याचं नवं तंत्र !

क्लबांतील मंडळीच्या दृष्टीस ‘ माझी ’ ती छत्री पडताच साहजिकच तिच्याविषयीं सर्वांनी पृच्छा केली. एखाद्या निर्ढावलेल्या छत्रीचोराप्रमाणं सुलूला मारल्या होत्या तशाच थापा मारून मीं त्यांचं समाधान केलं.

आम्ही ब्रिज खेळावयास सुरुवात केल्यावर थोड्या वेळानं प्रो. खरे आले. थोडा वेळ ते आमचा खेळ पाहत बसून राहिले. मग त्यांची दृष्टि एकाएकी माझ्या छत्रीकडे गेली. थोडा वेळ त्यांनी कांहीतरी आठवण करण्याची अगदी एकाग्र मुद्रेनं भयंकर खटपट केली अन् मग ते स्वतःशींच हसून म्हणाले, “ अरेच्या ! माझी छत्री ही इथं आहे, काल इथंच विसरून गेलों वाटतें ! अन् मी सारखं समजतों आहें; की मी बहुधा ती दुपारीं बँकेंत गेलों होतों तिथं विसरलों असेन म्हणून ! छे ! आता मात्र माझ्या विसराळूपणाची कमाल झाली ! ”

“ कुठली छत्री ? ” त्यानी बँकेचं नांव काढताच मी दचकलों होतों. पण तो भाव दडवून ठेवून मी जरा रुबाबांतच त्यांना प्रश्न केला.

“ ती पांढऱ्या मिकाच्या मुठीची. ” त्या छत्रीवरील आपल्या स्वामित्वाविषयीं कुणी हरकत घेईल ह्याची कांहीच कल्पना नसल्यामुळे प्रोफेसरसाहेब अगदी सहज म्हणाले.

“ अहो प्रोफेसरसाहेब, आपली कांहीतरी चूक होत आहे. ती छत्री माझी आहे ! ” मी ठासून म्हणालों, “ तुमच्या छत्रीवर कांही नांवबीव होतं का ? ”

“ नांव ? ” आपलं टक्कल हळुवारपणानं खाजवीत प्रो. खरे उद्गारले. मग ते त्या छत्रीजवळ गेले व तिच्यावर नांव आहे का हें त्यानी पाहिलं. छत्रीवर नांव नाहीं असं पाहून ते पुन्हां टक्कल खाजवीत म्हणाले, “ नांव होतं की नाही कांही आठवत नाही बुवा ! ”

' अहो, ती छत्री माझी आहे. " त्यांचा विसराळू स्वभाव सुप्रसिद्ध होता. त्यामुळं ते संभ्रमांत पडलेले पाहून मी अगदी निश्चयाच्या स्वरांत म्हणालों. " आजच विकत घेतली मी त्या अब्बासभाईकडून एकच शिल्लक होती त्याच्याकडे. "

" हो का ? मग सॉरी हं. " प्रो. खरे दिलगिरीप्रदर्शक स्वरांत म्हणाले, " माफ करा हं ! माझा कांही तुमच्यावर तसा आरोप करण्याचा हेतु नव्हता...पण ही तुमची छत्री अगदीं माझ्या छत्रीसारखीच आहे म्हणून आपलं मला एकदम तसं वाटलं. एक्स्क्यूज् हं ! "

" छे छे ! त्यात काय मोठंसं ! " दिलदारपणानं मी म्हणालों.

ती छत्री प्रो. खऱ्यांची होती हें निर्विवाद. मी बँकेंत जाताना, हातात छत्री नसूनहि ती उघडून डोक्यावर धरलेली असावी अशा पोजमध्यें आपला हात धरून त्यांना बँकेतून बाहेर पडताना मीं पाहिलं होतं ! पण आता साऱ्यांना ती छत्री मी विकत आणली आहे असं ठासून सांगितल्यावर तीच वतावणी करीत राहणं मला भाग होतं. सुदैवानं छत्रीचा मालक प्रो. खऱ्यांसारखा विसराळू आणि मऊ स्वभावाचा निघाला ह्या आनंदांत मी पुन्हा ब्रिज खेळूं लागलों. प्रो. खरेहि टाइम्सचं वाचन करण्यांत गढून गेले.

ब्रिज खेळून संपल्यावर आम्ही घरीं जावयास निघालों. खिडकीशीं जाऊन मी छत्री पाहूं लागलों. पण छत्री जागेवर होती कुठं ?

मी छत्रीची बरीच शोधाशोध केल्यावर इतका वेळ बाहेरच्या व्हरांड्यांत बसलेल्या जोशींनी मला विचारलं, "पांढऱ्या मुठीची होती का तुमची छत्री ?"

" हो, कुठं पाहिली का तुम्हीं ?"

" अहो, प्रोफेसर खऱ्यांनी नेली ती मघाच. जातां ा छत्री मला दाखवून म्हणाले देखील की, ' हा पहा आमच्या विसराळू स्वभावाचा आणखी एक नमुना ! ही माझी छत्री मी विसरलों होतों इथंच ! पण मला सारखं वाटत होतं मी ती बँकेत विसरलो म्हणून ! चला, बरं झालं! सापडली एकदाची ! असे घोटाळे होतात माझ्या विसराळू स्वभावामुळं! ' नंतर हंसून जोशी म्हणाले, " आणि असं म्हणून अखेरीस त्यांनी तुमचीच छत्रीं नेली का ? कमाल झाली बवा खऱ्यांच्या विसराळू स्वभावाची ! "

● ● ●

अनुक्रमांक २०३२६ क्रमांक ७३१८ दि: नों: दि: २.५

२

# खेड्यावळीं माणसें

[ खेडयांतलीं माणसें दिसावयाला ओबडधोबड, गांजलेली, निष्कपट आणि निसर्गाच्या सहवासांत त्यांचें सारें जीवन अंतर्बाह्य निर्मळ असतें ही आपली कल्पना, स्वतःच्या पोराला ' रंडकीचें मूल ' म्हणणारा सधनवान् काळू पाटील आणि त्याचे साथीदार या आपल्या कल्पनेला कसा धक्का देतात ते पहा. दवाखान्यांतल्या साध्या प्रसंगावर ही कथा आधारलेली आहे. एका कठोर वास्तवाचें अंतरंग लेखक वेधकतेनें प्रगट करतात. कोणतीहि अतिशयोक्ति न करतां श्री. वर्टी मानवतेच्या पडद्याआडचें एक नवें जग आपल्यासमोर उभें करतात. ]

* * *

दवाखाना बंद करून मी घरीं जाण्याच्या बेतांत होतों. येवढ्यांत माझ्या दवाखान्यांत एका खेडुतानं प्रवेश केला. त्याच्यामागून आणखी एक खेडुत आला, त्याच्यामागून आणखी एक आला, त्याच्यामागून आणखी एक... ...

सिनेमाची वेळ झाली की चित्रपटगृहांत एकएक प्रेक्षक जमू लागावा आणि थोड्याच वेळांत सारं चित्रपटगृह प्रेक्षकांनी गच्च भरून जावं तसा माझा दवाखाना खेडुतांनी भरून गेला. दवाखान्याबाहेर रस्त्यावरहि आणखी कांही खेडुत उभे असलेले मला दिसले असते, तर त्याचंहि मला नवल वाटलं नसतं. माझ्या दवाखान्यांत आज बहुजनसमाजवादी पक्षाची एखादी सभा भरणार आहे, असा कयास जर ती गर्दी पाहून एखाद्या निरीक्षकानं केला असता, तर मीं त्याला दोष दिला नसता.

काम करून मी आधीच थकलो होतों. त्यांत आता आणखी अेवढे लोक तपासायचे हें माझ्या जिवावर आलं. पण निदान दहाच्या दहा-पांच

नोटा तरी माझ्या खिशांत जातील, ह्या विचारानं मला थोडा उत्साह वाटला. ती गर्दी पाहून खेडयांतून कुठल्यातरी रोगाची सांथ आली असावी असा मी तर्क केला.

कुणी बांकावर तर कुणी जमिनीवर असे ज्याला जशी जागा सापडेल त्याप्रमाणं सर्व खेडुत स्थानापन्न झाल्यावर त्या जमावांतूत मी त्यांचा पुढारी आणि आपला कथानायक शोधून काढला. हा आपला जानपद कथानायक त्याच्या कोटामुळं तर इतरामधून उठून दिसत होताच, पण इतरापेक्षा तो जरा पुष्टहि होता. शिवाय त्याच्या मिशांचे झुपकेहि होते. आपला कथानायक एक अगदीच मळकट धोतर नेसला होता; त्याचं कुडतं, मुंडासं आणि कोटहि अगदीच मळकट होता. जिथं पिण्याकरिता देखील पुरेसं पाणी मिळत नाही अशा एखाद्या वाळवंटांत त्याचं वास्तव्य असावं असा त्याच्या कपडयांवरून मीं तर्क केला.

आपल्या कोटामुळं ( कारण इतरांजवळ कोट नव्हते ) आणि आपल्या भरगच्च खिशामुळं हरिणांच्या कळपांत जसा काळवीट, त्याप्रमाणं उठून दिसणाऱ्या आपल्या कथानायकाला सारी स्थिरस्थावर झाल्यावर मी प्रश्न केला, " कोण गावची मंडळी ? "

" मडकीदामची. "

' मडकीदाम ' नांवाचं एक वाळवंट ह्या पृथ्वीच्या पाठीवर आहे, ह्या माहितीची मीं माझ्या ज्ञानकोशांत भर घातली आणि विचारलं,

" कुणाला तपासायचं आहे ? "

" ह्यं पोर आणलंय. " आपला कथानायक म्हणाला.

" आणखी कुणाला तपासायचंय ? " मी विचारलं.

" ह्यो योकच पॅशिजर आहे. " आपला जानपद–कथानायक म्हणाला. ' पॅशिजर ' आणि ' पेशंट ' ह्या दोन शब्दांची त्यानं गल्लत केलेली दिसत होती.

" मग हे बाकीचे लोक कशाला आलेत् ? " मीं विचारलं.

" आज बाजारचा दिवस म्हून आलीया मंडळी. "

हें उत्तर ऐकून माझी निराशा झाली. ती लपवण्याकरिता मी विचारलं, " नांव काय तुमचं ? "

" काळू पाटील. "

" काय होतंय मुलाला ? " मी पुन्हां विचारलं

" आता पाहा तुम्हीच. आम्ही खेड्यावल्लीं माणसं. त्यें जर आम्हांला कळत, तर तुमच्याकडं कशाला आणलं असतं ? " येवढं बोलून काळू पाटलानं इतर मडळीवरून आपली दृष्टि फिरविली. त्यावेळीं त्यानं आपल्या त्या भरघोस मिशांवरून हात फिरविण्याची कांहीच जरुरी नव्हती ; त्यामुळं त्याची ती दृष्टि विजयोन्मादाची आहे, ' कशी जिरवली ह्या लिवनाऱ्या दाक्तराची ! ' असा अर्थ तिच्यांत स्पष्ट आहे, असा मला निष्कारण भास झाला.

" हां हां ! " सर्व खेडुतांनी पसंतीदर्शक माना हालवून उद्गार काढला " आम्ही खेड्यावल्लीं माणसं ! "

खेड्यावल्लीं माणसं ! धरतीमातेचीं तीं साधींभोळीं निष्पाप लेकरं त्यांना आमच्या शहरी लोकांचे छक्के पंजे ठाऊक नाहीत. लबाडी ठाऊक नाही. उलट, त्या निष्पाप जिवांना कुणीहि हातोहात फसवावं ! त्यांचीं तोंडच पाहा. किती भोळे आणि अडाणी दिसतात ते त्यांचे कपडे मळकट असले तरी त्यांचीं हृदयं पुसून काढलेल्या काचेइतकी स्वच्छ असतात. लहान मुलंच तीं ! लहान मुलांवर कुणी रागवतं का ? मग खेड्यावरल्या माणसांवर रागावण्यांत तरी काय अर्थ आहे ? काळू पाटलानं तें वाक्य उच्चारलं तें सहजच उच्चारलं असलं पाहिजे. आपलं अज्ञान दाखवण्याचाच त्याचा हेतु असावा , माझी जिरवण्याचा तर त्याचा मुळीच उद्देश नसावा. तसा कांही अर्थ त्या वाक्यांतून निघतो ह्याची कल्पना तरी त्या बिचाऱ्याला होती की नाही कोण जाणे !

म्हणूनच मी आपला राग गिळला आणि त्या आजारी मुलालाच विचारलं,

" ताप वगैरे येतो का रे तुला ? "

" आँ ? " त्या मुलानं विचारलं.

मी पुन्हां तोच प्रश्न केला. त्याबरोबर धरतीमातेचं तें निष्पाप अल्लड कोंकरूं आपल्या कथानायकाकडे अगतिकपणानं पाहू लागलं. ' आता ह्या भयंकर संकटांतून तुम्हीच मला वांचवा. ' असं जण तो मुलगा काळू पाटलाला

विनवत होता. त्याबरोबर काळू पाटील त्याच्या सहाय्याला धावून आला. काळू पाटील म्हणाला, " ह्या, कधी येतो ऽ–कधी न्हाईबी येत !

मी विचारलं, " किती येतो ताप ?"

" आता आमच्याजवळ काय डिग्री आहे ? "

" पण अंदाजी ? "

काळू पाटलानं आपल्या अनुयायांवरून मघाची ती विजयोन्मादाची दृष्टि फिरवण्यापूर्वीच मीं विचारलं.

" असेल कधी शंभर, तर कधीं दोनशे, " काळू पाटलानं उत्तर दिलं.

जमावानं पसंतीदर्शक माना हालवल्या. काळू पाटील शब्दांत न सापडण्याची जी काळजी घेत होता, ती पाहून त्यांना त्याचं कौतुक वाटत असलेलं त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसून येत होतं. उगाच नव्हता त्यांनी काळू पाटलाला आपला पुढारी निवडला !

" भूक कशी लागते ! " मीं त्या पोराला विचारलं.

" आँ ? " त्या पोरानं विचारलं.

ह्या वेळीं तो प्रश्न मी पुन्हा विचारला नाही. 'खेड्यावल्लीं माणसं' प्रश्न विचारला की त्याचं उत्तर एकदम कधी देत नाहीत; आपला अडाणी चेहरा ते आणखीनच अडाणी करतात आणि उलट आपल्यालाच प्रश्न करतात, " आँ ? " पण आतापर्यंतच्या अनुभवावरून मला असं दिसून आलं आहे, की त्यांना असला प्रश्न नीट ऐकू गेलेला असतो. त्याचा अर्थहि त्यांना नीट कळलेला असतो, पण प्रश्नाचं उत्तर देण्यापूर्वी त्यांना नीट विचार करायचा असतो. विचार करायला वेळ मिळावा म्हणून त्या साध्याभोळ्या जिवांची ही 'युगत' असते.

" कधी लागते–कधी न्हाईबी लागत भूक ! " काळू पाटील म्हणाला आणि त्यानं त्या मुलाची संकटांतून पुन्हा एकदा सुटका केली ?

" थंडी वाजते का ताप येण्यापूर्वी ? "—मी.

" आँ ? "—तो मुलगा.

" उगाच थोडा कांटा ! "—काळू पाटील.

" वय किती तुझं ? "—त्या मुलाला मी विचारलं.

आँ ? "—तो मुलगा.

" आता आम्हांला कात्रं ठाव ? आम्ही खेड्यावल्लीं माणसं ! "—काळू पाटील.

" कधी डोकं दुखतं का ? "—मी जरा टोचून.

" आँ ? " तो पोरगा.

कधी वाईच दुखतं—कधी न्हाईबी दुखत ! "—काळू पाटील.

त्यानंतर मी आणखी पुष्कळच प्रश्न त्या पोराला विचारले. त्यानंहि ' आँ ?' असं म्हणून मला प्रश्न विचारले. आणि काळू पाटलानं आपण शब्दांत पकडले जाणार नाही ह्याची काळजी घेत माझ्या प्रश्नांचीं उत्तरं दिलीं.

मग मी त्या पोराची शारीरिक तपासणी केली. त्याचं पोट चाचपून तपासलं, त्याच्या छातीला नळी लावली. त्याची नाडीहि पाहिली आणि चेहरा गंभीर करून बसलों.

" बराबर तपासा, दाक्तरसाहेब. " इतका वेळ पार्श्वभूमींत असलेला एक ' म्हातारा ' पुढं होऊन म्हणाला, " अगदी नीट परीक्षा करा. "

" नीटच तपासलं मीं ! "—मी.

माझं हें वाक्य ऐकताच त्या जमावांतल्या ' जाणते ' म्हणून समजल्या जाणाऱ्यांनी एकमेकाकडे पाहून नेत्रपल्लवी केली. जणूं आपल्या डोळ्यानी त्यांनी माझ्यावर अविश्वासाचा ठरावच पास केला. अखेरीस तो मघाचा म्हातारा म्हणाला, " दाक्तरसाहेब, योक राहचलं ! "

" काय ? " मी आश्चर्यानं विचारलं.

" पोराच्या पोटाला नळी न्हाई लावली तुम्ही ! " माझं अज्ञान उजेडांत आणीत तो म्हातारा म्हणाला.

" पोटाला नळी ? " मी विचारलं. " पोटाला नळी लावून काय उपयोग ? "

माझा हा प्रश्न ऐकताच त्या जमावाचा माझ्यावरचा विश्वास एकदम शून्यावर आलेला दिसला. कांहींनी तर जणुं आपण आता उठूनच जात आहोंत, अशी चुळबूळ देखील केली. त्यांच्या दृष्टीनं माझ्या ह्या एकाच उत्तरानं मी परीक्षेंत नापास झालों होतों !

" पण आमच्या गावचा वैद्य तर पोटाला नळी लावून तपासतो. " 'मडकीदाम आमच्या शहरापेक्षा एका बाबतीत तरीं वरचढ आहे' असं दाखवणाऱ्या आवाजांत काळू पाटील म्हणाला

" परवा खंडयाच्या मांडीला मार लागला तवा मांडीलाबी त्यानं नळी लावून तपासलं ! " तो म्हातारा म्हणाला.

जमावांत एकच खळबळ माजली. आपल्या विषयाचं मूलभूत ज्ञानहि मला नाहीं, असा सर्वांनी निर्णय घेतलेला दिसला. आता माझ्या दवाखान्यांत एक क्षणभरदेखील थांबण्यात अर्थ नाही, असं ते एकमेकांना दबलेल्या आवाजांत सांगत होते. विषयांतर करण्याच्या उद्देशानं मी म्हणालों, " त्याला थंडीताप आहे. "

माझ्या ह्या वाक्याचा त्या जमावाला कांहीच अर्थबोध झालेला दिसला नाही. मग काळू पाटलानं विचारलं, " थंडीताप तर हायच. पण तो ऊष्ण वात हाये की सरद वात हाये ? "

" सर्दीचा वात आहे ! " मी म्हणालों.

ही वाताची, उष्णतेची नि सर्दीची भानगड मला अजूनपर्यंत कळलेली नाही. पण अशा प्रसंगीं एकंदर रागरंग पाहून मी असं कांहीतरी उत्तर ठोकून देतों. त्यामुळं बिचाऱ्या 'खेड्यावल्ल्या पॅशिंजरा' ची थोडी फसवणूक होते हें खरं; पण त्याला इलाज नाही. ह्या भाषत रोगाचं निदान केल्याशिवाय त्यांना कांही कळत नाही की त्यांचं समाधनहि होत नाही. त्यांच्या भल्याकरिताच करावं लागतं हें मला. माझं उत्तर बरोबर आहे की चूक आहे हें जाणण्याकरिता मी काळू पाटलाकडे पाहिलं. तो निरुत्तर झालेला दिसत होता आणि जमावाची चुळबूळहि थंड पडली होती. त्यावरून माझा खडा अचूक लागल्याचा पडताळा मला मिळाला आणि माझा आत्मविश्वास परत आला.

" त्याला सुई दिली पाहिजे; आणि आठ दिवसांचं औषध देईन. त्याच्या शरिरांतली सगळी सर्दी नाहीशी होईल. " मी पूर्ण आत्मविश्वासानं म्हणालों.

त्या साध्याभोळ्या खेडुतांना माझं म्हणणं एकदम पटलेलं दिसलं. काळू पाटील म्हणाला, " हा. भारीचं इंजक्शन द्या. "

" एकंदर दहा रुपये पडतील." मी मुख्य मुद्द्याला हात घातला.

" अस नगा करू—आम्ही खेड्यावल्लीं माणसं !" काळू पाटील म्हणाला.

" आता औषधं महाग झालीं आहेत. ह्या वॉर टाइमांत–" बोलतांना मी मधेच थांबलों. ' खेड्यावल्ल्या ' ह्या अडाणी माणसांना हा अवघड इंग्रजी शब्द काय समजणार ? असा विचार करून मी सोप्या लोकभाषेंत म्हणालों, " ही लढाई आहे ना, त्यामुळं सगळ्या औषधांच्या किंमती वाढल्या आहेत."

" वार्टेमाचं नका सांगू हो," काळू पाटील म्हणाला.

" वार्टेमाचं ? म्हणजे ?" मीं विचारलं.

माझ्यासारख्या शिकल्यापढलेल्या ' दागतरा ' ला एवढ्या साध्या शब्दाचा अर्थहि कळू नये ह्याचं त्या जमावाला आश्चर्य वाटलेलं दिसलं काळू पाटील स्पष्टीकरण करण्याकरिता म्हणाला, " वार्टेम ! जर्मलांची नि ब्रिटिशांची वार चालू आहे ना ?"

" हं हं !" माझ्या डोक्यांत प्रकाश पडून मी म्हणालों, ' वॉरटाईम !'

" हां ! वार्टेम ! " काळू पाटील म्हणाला, " ह्या वार्टेमात समदं-महाग झालं, आम्हाला तर खायालावी न्हाई मिळत ! "

" तुमचं ठीक आहे हो." मी म्हणालों, " धान्याच्या किंमती किती वाढल्यात ! चिक्कार फायदा होत असेल तुम्हांला !"

" कायचा फायदा !" काळू पाटील म्हणाला " औंदा पानकळ्यांत पानी झालं न्हाई म्हून बाजऱ्या आला न्हाई !"

" पण गव्हाचं पीक तर चांगलं आलं असेल ना ? " दहाऐवजी आठ रुपये घेऊं, असा विचार करून मी विचारलं.

" अहो, कसलं आलय् गहू ! हा पर्वा पानी झाला ना तं साऱ्या गव्हावर तांबेरा पडला. "—काळू पाटील.

" पण आता द्राक्षं तरी चांगलीं येतील " मनांतल्या मनांत आठाचे सहा करून मी भीतभीत विचारलं.

" दराख तर परवाच्या थंडीनं खलास झालीं !" तो म्हातारा म्हणाला.

आता अशा लोकांकडे काय मागणार ? त्यांच्याकडून औषधाचे पैसे

मागण्याची कल्पना मनांत आणणं म्हणजेसुद्धा मला पाप वाटूं लागलं. मी म्हणालों, " बरं तर, पांच द्या ! "

न्हाई न्हाई ! असं नगा करू साहेब." काकुळतीनं काळू पाटील म्हणाला, पोराला बाप न्हाई. त्याची आई रांडकू आहे ! "

" रांडकू ? " मी आश्चर्यानं विचारलं. रांडेच्या मुलाला घेऊन ह्या लोकांनी कां यावं मला कळेना !

" हां रांडकूं ! " काळू पाटील म्हणाला, " इधवेला आम्ही खेडचावल्ली माणसं रांडकू म्हणतों. "

" असं, असं " माझ्या ज्ञानकोशांत मी ह्या सुंदर शब्दाची भर घातली.

'त्येला खायलाबी न्हाई. पुन पोर तापानं बेजार झालं, म्हून घेऊन आलों मी. म्हंगालों, करूं पोरासाठीं चारदोन रुपये खर्च ! " काळू पाटील म्हणाला.

धरतीमातेच्या त्या सुपुत्रानं मला पुरतं लाजवलं. एका अनाथ पोरक्या मुलाला केवळ भूतदयेनं प्रेरित होऊन आणि स्वतःची पदरमोड करून औषधोपचाराकरिता तो माझ्याकडे घेऊन आला होता. मी मात्र माझ्या पैशाचा परम पवित्रपणा विसरून त्याच्याशीं पैशाची घासाघीस करीत होतों. शरमिंद्या स्वरांत मी विचारवं, " मग म्हणणं काय तुमचं ? "

" तीन रुपये घ्या. येताना चार रुपये मारवाड्याकडून घेऊन आलों होतों. " गयावया करीत काळू पाटील म्हणाला, " आठ आणं येतांना वशीला लागले, आठ आणं मला वापस जाया होवंत. "

माझा आता नाइलाज होता. मी साधारण हिशेब केला. येवढ्या रकमेंत औषधाची किंमत कशीबशी भरून निघत होती. ' बरं ' म्हणून मी इंजेक्शनची पिचकारी उकळण्याकरिता स्टोव्हवर ठेवून पुन्हा आपल्या खुर्चीवर येऊन बसलों.

" वाईच जरा लवकर, " काळू पाटील म्हणाला, " मला कोडतांत जायचं आहे."

त्याच्या मघाच्या बोलण्यावरून आणि ' इंजेक्शन ' च्या बदली त्यानं ' इंजंक्शन ' हा शब्द वापरला होता त्यावरून त्याला डॉक्टरापेक्षा वकिलाशीच बोलण्याचा अधिक सराव आहे हें मीं ओळखलंच होतं. मी

म्हणालों, " आता होईल पांच मिनिटात. " मीं एक सिगरेट शिलगावली. काळू पाटलानं बिडी काढली. म्हाताऱ्यांनी चिलमी पेटवल्या. थोड्याच वेळानं माझा दवाखाना धुरानं आणि खोकल्यानं भरून गेला.

पिचकारी तयार होईपर्यंतचा वेळ कसातरी काढावा म्हणून काळू पाटलानं तेव्हा चालू असलेल्या लढाईचा विपय काढला. ' जर्मलां ' विषयी त्या सर्वांना कौतुक आणि आदर वाटत होता. काळू पाटलानं विचारलं, " आता हिटलर कुणावर आर्कमन करणार ? "

" आर्कमन ?" मी विचारलं. तेवढ्यांत खुलासा होऊन उद्गारलों, " हं, हं, आक्रमण ! "

हां. हिटलर आता कुणावर आकर्मन करनार ? "—काळू पाटील. नंतर आम्ही दोघांनी युद्धाच्या डावपेचांवर त्या पांच मिनिटांत शक्य तेवढी चर्चा केली. कुठल्याहि मुद्द्यावर काळू पाटील माझ्या विरुद्ध बाजू घेत असे व असं कांही बोलत असे की, मला त्याचा अर्थबोधच होत नसे. साहजिकच मी गोंधळून जाऊन निरुत्तर होई. सारा जमाव आमची ती चर्चा ऐकून थक्क झाला. विशेषतः काळू पाटलाचं युद्धविषयक ज्ञान पाहून, मध्येच तो वापरत असलेला एखादा जाडा शब्द ऐकून आणि ह्या येवढ्या अवघड विषयांतहि तो माझ्यासारखा ' लिवनाऱ्या दाक्तर ' शीं यशस्वीपणानं दोन हात करू शकतो हे पाहून तर त्यांना काळू पाटील म्हणजेच खुद्द हिटलर असंहि तेवढ्या वेळेपुरतं वाटलं असणं शक्य आहे.

मुलाला इन्जेक्शन दिलं. औषधहि दिलं. औषधाला बाटलीहि मीच दिली. तीनतीनदा औषध घेण्याविषयीच्या सूचना समजावून दिल्या. त्याच्या साऱ्या शंकाकुशंकांचं शांतपणानं निरसन केलं. पथ्याविषयी—काय घ्यावं नि काय वर्ज्य करावं—सविस्तर चर्चा झाली. पृथ्वीतलावरील यच्चयावत् खाण्यासारख्या व पुष्कळशा न खाण्यासारख्याहि वस्तु त्या पोराला दिल्या तर चालतील की नाही ह्याविषयी कीस काढण्यांत आला आणि अखेरीस मी अगदी थकूनभागून गेल्यावर ' बरं आता पैसे द्या ' अशी मी काळू पाटलाला सूचना दिली.

काळू पाटलानं आपल्या कोटाच्या उजव्या खिशांत हात घातला आणि एक पावली काढली, मग डाव्या खिशात संशोधन करून एक चौकोनी

चवली काढली. मग कमरेला चाचपून उजव्या कनवटींतून एक अधेली काढली. मग डाव्या कनवटींतून दोन आण्यांचा खुर्दा काढला आणि तो काळजीपूर्वक चारचारदा मोजला. मग त्यानं कुडत्याच्या चोरखिशांतून एक वंदा रुपया काढला. त्यानंतर त्यानं ती सर्व रक्कम मोजून काढली. मग आपलं मुंडासं चाचपलं त्यांतून एक गोल चवली काढली. मग त्यानं सगळीकडे तपासलं, पुन्हां पैसे मोजले आणि मग तो त्या म्हाताऱ्याला म्हणाला, " पिराजी पाटील, थोडं पैसं देता का ? तीन रुपयांना चौदा आणं कमी पडत्यात ! "

पिराजी पाटलानं आपले खिसे उलटे केले. त्यांतून एक चकमक, एक चिलीम, थोडीशी तंबाखू आणि त्याच्या सदऱ्यावरून तुरुतुरु चालत जाणारा कुठलासा एक छोटा प्राणी ह्यांखेरीज दुसरं कांही निघालं नाही.

" मला उशीर होतोय् ! " मी म्हणालों, शरीराच्या कुठल्याहि भागांतून काळू पाटील एखाद्या जादुगाराप्रमाणं पैसे काढील अशी मला खात्री होती.

" घेतों, घेतों ! " असं म्हणून काळू पाटलानं कंबरेचा कसा काढला आणि त्यातून कांही पैसे काढून ते त्यानं आधी काढलेल्या पैशांत मिळविले. मग ते पुन्हा एकदां मोजून माझ्या टेबलावर ठेवन देत तो म्हणाला, " घ्या तुमचं पैसं."

तो पैसे काढत असताना माझ्या मनांत विचार आला–काय हें खेड्यातलं दारिद्र्य ! तीन रुपयांची जमवाजमव करताना केवढा हा त्रास ! आणि तेहि मारवाड्याकडून कर्ज काढून आणलेले. ते तीन रुपये मी घेणार ह्याचा अर्थ काळू पाटलाला निदान आठ दिवस तरी अर्धपोटीं राहावं लागणार असाच नाही का ?

पथ्याविषयी आणि औषध केव्हा घ्यावं, कसं घ्यावं, ह्यावर पुन्हा थोडी चर्चा झाल्यावर मंडळी ' रामराम ' करून निघून गेली.

ते निघून गेल्यावर एका मुलाला औषधोपचार करण्याच्या सत्कार्यात आपलाहि हातभार लागला ह्या विचारानं मला सात्त्विक आनंदाचा लाभ झाला. त्याचा पुरा उपभोग घेण्याकरिता ' हुश्श ' करून मीं एक सिगारेट शिलगावली...

सिगरेट ओढून झाल्यावर टेबलावर पडलेला तो तीन रुपयांचा खुर्दा मी उचलला. त्यातला रुपया मला जरा काळसर दिसला म्हणून मी तो वाजवून पाहिला. त्याचा बद्द आवाज झाला. चवली चोपडी होती; अधेलीला खोच गेलेली होती.

काय ही फसवणूक ! माझ्या मनांत सात्त्विक संताप उत्पन्न झाला. धरतीमातेच्या ह्या साध्याभोळ्या लेकरांच्या अज्ञानाचा फायदा लोक दुष्टपणानं घेत असले पाहिजेत ! त्यांना किती फसवत असले पाहिजेत ! साध्या तीन रुपयांत दोन रुपये बारा आणे खोटे—आणि चार आणे तर अजिबातच कमी ? छे छे. शेठजी आणि भटजी ह्यांनी शेतकऱ्यांची शतकानुशतकं जी ही दुष्ट पिळवणूक चालवली आहे ती बंद पाडलीच पाहिजे. खेडुतांना सज्ञान करणं, त्यांना साक्षर करणं आणि शहाणे करून सोडणं, हाच एक उपाय त्यांची स्थिति सुधारण्याकरितां राहिला आहे ! ... मी तो खुर्दा खिशांत घातला व घरी जाण्याकरिता म्हणून उठलों.

एवढ्यात माझ्यासमोर आणखी एक खेडूत उभा असलेला मला दिसला. प्रथम वाटलं, मघां मडकीदामच्या ज्या सैन्यानं माझ्या दवाखान्यांत तळ ठोकला होता, त्यांतलाच हा एखादा पाठीमागं पडलेला सैनिक असावा ! पण माझा तो तर्क चुकीचा ठरला. कारण, तो मडकीदामनिवासी दरवाजांतून बाहेर जात नव्हता, तर आंत येत होता.

" मडकीदामची मंडळी आली व्हती का ! " त्यानं विचारलं.

" हो, येऊन गेली आत्ताच, " मी म्हणालों.

" काळू पाटलाच्या पोराला दवादारू दिली ? " त्यानं विचारलं.

" दिली, " मी म्हणालों. मग मी एकदम विचारलं, " कुणाला ? "

" काळूपाटलाच्या पोराला. लई मोठी असामी आहे काळू पाटील म्हंजे. लाखाचा दावा चाललाय् कोडतांत त्याचा. "

" काळू पाटलाचा पोर ? तें पोर रांडकूचं आहे ना ? "

" न्हाई न्हाई ! काळू पाटलाला चांगलं त्याच्या आवेपासनं झालंय्. "

" पण ते तर म्हणाले की त्या पोराला बाप नाही म्हणून ! आणि त्याच्या औषधाकरिता त्यांनी मारवाड्याकडन चार रुपये उसने आणलेत ! "

" पैसे उसने घ्यायची त्येना काय जरूर ? "

" पण ते तसं म्हणाले ना ! "

" अँा ?...असं म्हंगाले ते ? " तो खेडूत म्हणाला.

" हो ! " मी ठासून म्हणालों.

" आम्ही खेड्यावल्लीं मानसं–आम्हांला काय ठावं ! " तो खेडूत म्हणाला आणि तो अडाणी, हरघडीला ह्या लबाड जगाकडून फसविला जाणारा साधाभोळा जीव मठ्ठ चेहरा करून, रखरखीत उन्हांतून मडकीदामची वाट चालू लागला.

● ● ●

३

# यंत्र-विशारद

( हलक्या फुलक्या प्रेमकथा लिहिणें हे श्री. वर्टीचें एक खास वैशिष्टय. पण अशा प्रेमकथा ते भाव-विवशतेने कधीच रंगवीत नाहीत. उलट खुमासदार विनोदी शैलीने आणि चटकदार संवादांच्या द्वारें ते आजकालच्या थिल्लर प्रवृत्तींचें हंसत खेळत दर्शन घडवितात. बन्या गोखलेने जिंकलेली प्रेमाची शर्यत जितकी दर्शनीय तितकीच नव्या पिढीची जीवनाकडे पहाण्याची उथळ वृत्ति चिंतनीय. श्री.वर्टींच्या लेखनांतील सहज सूचकतेचा डौल कथेला कलापूर्ण महिरपीसारखा शोभतो व कथेची बंदिस्तीहि साधतो. )

* * *

आम्ही चौघेजण नेहमी मंदेकडे जात येत असूं. आणि–तुम्हांला आता खरं सांगायला कांही हरकत दिसत नाही–आमच्यांतला प्रत्येकजण तिच्याशी लग्न करण्याची गुप्त इच्छा मनांत बाळगून होता. आमच्यांतला एक स्कॉलर होता, एक कवि होता नी एक म्हणजे मी लेखक होतों. बन्या गोखलेला मात्र ह्याप्रमाणं कुठल्याच वैशिष्टयावर हक्क दाखविता येण्यासारखा नव्हता.

आम्हांला वाटत होतं, आम्हा तिघांतच खरी स्पर्धा आहे. बन्या गोखलेला आम्ही हिशेबांतच धरीत नव्हतों. पण आश्चर्य असं की– सांगतोंच तुम्हांला ती सारी हकीगत.

एक दिवस आम्ही मंदेच्या खोलीवर जमलों होतों नी नेहमीप्रमाणं मोठ्या तावातावानं मंदा आम्हांला व्याख्यान सुनावीत होती, " मला जर कुणी सांगितलं, की ह्या विसाव्या शतकाचं एका शब्दांत वर्णन करा, तर मी उत्तर देईन–' यंत्र ! ' हें युग यंत्राचं आहे. तुम्हीआम्ही जीं वस्त्रें वापरतों तीं यंत्रावर विणलेलीं आहेत. आपण ज्यानं लिहितों तें फाउंटन

पेन, आपणाला वेळ सांगणारं आपलं घड्याळ हीं सारीं यंत्रंच आहेत. आपण आपल्या गावाहून इथं आगगाडी–मोटारनं येतों तेंहि यंत्राच्याच सहाय्यानं. फार कशाला ? नुसती चहाची तलफ भागवायची असली तरी आपणाला ज्या स्टोव्हची कास धरावी लागते तो स्टोव्हसुद्धा यंत्रच आहे…."

ती आणखी किती बोलली असती कुणास ठाऊक! पण राजा काळे मध्येच म्हणाला, "हो. बरी आठवण झाली. अहो मंदाबाई, चहा करा बुवा."

"हो चहा करा!" एकच गलका करून सर्वांनी राजाला अनुमोदन दिलं.

"सॉरी!" मंदा म्हणाली, "केला असता हो, पण माझा स्टोव्ह बिघडला आहे जरा."

"अरेरे!" सर्वांनी एक दुःखाचा सुस्कार सोडला.

पण मंदाला चिडवायला ही संधि चागली आहे असा विचार करून मीं म्हटलं, "पाहा हीं तुमचीं यंत्रं! केव्हा बिघडतील नी दगा देतील याच नेम नाही. म्हणून मोठमोठे विचारवंत म्हणतात, की ही यंत्रसंस्कृति सोडून द्या नी निसर्गाकडे चला. चरखा, टकली नी बैलगाडी यांच्या युगांत चला. यंत्रानं बेकारी वाढते, माणूस सुखलोलुप होतो…

"अहो विद्वान्…" मंदा माझ्या अपेक्षेप्रमाणं चिडून म्हणाली, "पण तुमचे हे चरखे नी बैलगाड्या कधी नादुरुस्त होतच नाहीत काय ? शिवाय तींसुद्धा द्वापारयुगांतील यंत्रंच नव्हे का ?" नंतर एकाद्या न्यायाधीशाचा आव आणून तिनं निकाल दिला, "तें कांही नाही. हें यंत्रयुग आहे नी प्रत्येकाला यंत्रविद्या अवगत असलीच पाहिजे. पाश्चात्य राष्ट्रं ह्या यंत्र-विद्येच्या जोरावर किती पुढं गेलीं आहेत. नाहीतर आमचे तरुण! नुसते पुस्तकांतले किडे!"

"अहो मंदाबाई, पण तुम्हांलाहि अशाच एखाद्या पुस्तकांतल्या किड्याशी लग्न लावावं लागणार आहे हें लक्षांत असूं द्या." नाना परांजपे तिला खिजविण्याकरता म्हणाला.

"मुळीच नाही! ज्याला यंत्रविद्या येत नाही त्याच्याशीं मी मुळीच लग्न करणं शक्य नाही." नाकपुड्या फेंदारून मंदा म्हणाली. त्या वेळच्या तिच्या त्या आवेशानं आम्ही जरासे चमकलोंच. "पाहूं या, तुमच्यापैकी कोण माझा स्टोव्ह दुरुस्त करून आणतो तें ?" आम्हां सर्वांवरून करडी

नजर फिरवून तिनं प्रश्न केला. आमचीं तोंडं एकदम अुतरलीं. मंदा ही भलतीच परीक्षा घेत आहे असं आम्हांला वाटलं. ह्या बाबतींत आम्ही चौघेहि एकाच माळेचे मणि आहोंत एवढंच त्यांतल्या त्यांत समाधान होतं.

पण हें आमचं समाधानहि फार टिकून राहूं शकलं नाही. कारण नेहमी गप्प बसून राहणारा बन्या गोखले आपल्या चेहऱ्यावर कांहीहि बदल होऊं न देता शांतपणानं आपल्या जागेवरून उठला आणि स्टोव्हजवळ जाऊन तो म्हणाला, "पाहूं."

"तुम्हांला येतो का स्टोव्ह दुरुस्त करतां?" मंदानं उत्सुकतेनं विचारलं.

"पाहूं या तर खरं काय बिघडलंय् तें." असं म्हणून बन्यानं स्टोव्ह उचलून घेतला. दोनतीनदा तो उलटासुलटा करून त्यानं त्याचं निरीक्षण केलं, तें अशा ऐटींत की जणू रोज पांचपंचवीस स्टोव्ह त्याच्या हातांतून जात असावेत. त्याच्या त्या स्टोव्हतपासणीकडे पाहून आम्ही तिघे एकमेकांशीं किंचित् हसलों.

"पंपच बिघडलाय् वाटतं!" त्याच्याजवळ जाऊन मंदा लाडिकपणानं म्हणाली आणि आम्हां तिघांकडे तिनं तुच्छतेनं एक कटाक्ष टाकला.

पण आम्हाला त्याचं कांही वाटलं नाही. कारण बन्या मंदेला बनवतो आहे अशी आमची प्रांजल समजूत होती. आता पुढं कशी काय मजा उडते इकडेच आम्हीं लक्ष लावलं होतं.

पण पुढं आमच्या अपेक्षेप्रमाणं कांहीच गंमत झाली नाही. उलट बन्यानं तो स्टोव्ह शांतपणानं एका फडक्यांत बांधून घेत मंदेला प्रश्न केला, "उद्या आणून दिला तर चालेल ना?"

"चालेल. पण शक्य तितक्या लवकर आणा, नाहीतर चहाची अडचण होते बाई."

"हो. तेंहि खरंच." बन्या गंभीरपणानं म्हणाला.

"नाहीतर असंच करा ना. उद्या सकाळी स्टोव्ह घेऊन चहालाच या ना?" मंदा लाडिकपणानं बन्याला म्हणाली.

"चालेल. कांही हरकत नाही!" बेपर्वाईनं बन्या म्हणाला आणि जातांना आपणांबरोबर स्टोव्ह घेऊन निघाला.

मंदेच्या खोलीपासून दूर आल्यावर मीं बन्याला म्हटलं, " बन्या, एखाद्या मलीची अशी थट्टा करणं बरं नाही. "

" कोण म्हणतो मी तिची थट्टा करतों म्हणून ?" बन्यानं उलट प्रश्न केला.

" म्हणजे! तूं काय खरोखरच हा स्टोव्ह दुरुस्त करणार ? " आश्चर्याचा धक्का बसून राजा काळेनं विचारलं.

" अर्थात्." शांतपणानं बन्या म्हणाला.

" कधी शिकलास ही कला तूं ?" नाना परांजपेनं विचारलं. त्यावर बन्यानं किंचित् स्मित केलं नी अशा ऐटीत खांदे उडवले की स्टोव्ह दुरुस्त करणं हा जणू त्याच्या हातचा मळ होता

तो गेल्यावर राजा म्हणाला, " इंप्रेशन मारायला बघतोय् लेकाचा ! "

" पण तें काय त्याला जुळणार आहे ?"—मी.

" चांगलीच फजिती होईल उद्या सकाळीं त्याची ?"—नाना परांजपे.

" खरंच. आपण त्याची फजिती पाहायला गेलं पाहिजे उद्या सकाळीं." —राजा काळे.

आणि मग आम्हाला आमंत्रण नसतानाहि दुसऱ्या दिवशी सकाळी चहाच्या वेळेला मंदेच्या खोलीवर हजर राहण्याचं आम्हीं ठरवलं ! खोलीवर मंदेवरचं आपलं इंप्रेशन अधिक पक्कं करण्याची बन्याला संधि मिळू नये म्हणून आम्ही जाण्याचं ठरवलं, अशी कोणा कुत्सित वाचकाला शंका येईल पण ती शंका साफ निराधार आहे. तसा विचार आम्हांपैकीं कोणी बोलूनसुद्धा दाखवला नव्हता. केवळ बन्याची जी फजिती उडणार होती ती पाहण्याचाच आमचा उद्देश होता, हें ह्यावरून सिद्ध होतं

आणि बन्याची चांगलीच फजिती उडणार ह्याविषयीं आमची खात्री होती. कारण बन्याला आम्ही ओळखत होतों तें कांही एखादा यंत्रविशारद म्हणून नव्हे, तर एक घुम्या नी अभ्यासांत किंवा दुसऱ्या कुठल्याहि क्षेत्रांत कधीहि न चमकणारा असा निरुपयोगी प्राणी म्हणूनच !

तरीपण अयोग्य मार्गानं बन्यानं मंदेवर छाप पाडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला पाहून आम्हांला त्याचा राग आला नी–हो, थोडासा मत्सरहि वाटला हें नाकारण्यांत अर्थ नाही.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही तिघं मंदेच्या खोलीवर जाऊन पोचलों तो बाहेरूनच आम्हांला जोरानं पेटलेल्या स्टोव्हचा आवाज ऐकू आला. तो आवाज नी मंदेचं खिदळणं आमच्या कानांत गरमागरम चहाप्रमाणं भाजत शिरलं. आंत जातों तो एखाद्या विजयी वीराप्रमाणं बन्या एका आराम-खुर्चीत बसला होता. आमच्याकडे त्यानं जवळजवळ दुर्लक्षच केलं.

" किती छान दुरुस्त केला स्टोव्ह तुम्हीं, गोखले ! " कौतुकानं बन्या-कडे पाहत मंदा म्हणाली.

" छे ! कसचं, कसचं ! " बन्या विनयशीलपणाचा आव आणून म्हणाला. त्याच्या त्या ढोंगीपणाचा आम्हांला राग आला.

थोड्या वेळानं आम्ही जावयास उठलों तेव्हा बन्याकडे पाहून मंदा म्हणाली, " हो वरी आठवण झाली. तुम्हाला फौंटनपेन दुरुस्त करता येतं का हो ? माझं पेन जरा बिघडलंय्. त्यांतून शाई फार झिरपते. "

" पाहूं? " बन्या शांतपणानं म्हणाला.

मंदानं आपल्या पोलक्याच्या आंतल्या बाजूला लावलेलं पेन काढून त्याच्या हातांत दिलं. त्यानं तें आपल्या हातांत धरलं. त्याच्या त्या पेन धरण्याच्या नी त्याकडे पाहण्याच्या तऱ्हेवरून आम्हांला वाटलं, जणू तो तें प्रेमानं कुरवाळीतच आहे. मी तर तो आता त्याचं चुंबन केव्हा घेतो ह्याचीच रागानं वाट पाहात होतों; पण त्यानं तसं कांही केलं नाही, एकदा आमच्याकडे दृष्टिक्षेप करून दर्दी कारागिराच्या नजरेनं त्या पेनकडे त्यानं पाहिलं नी शांतपणानं विचारलं, " उद्या सकाळी दिलं तर चालेल ? "

" हो, चालेल. पण शक्य तेवढ्या लवकर द्या. नाहीतर नोट्स लिहून घेताना त्रास होतो बाई. "

" बरय्. " आपल्या वरच्या खिशांत आपल्या पेनशेजारी तिचं पेन लावून घेत बन्या पूर्ण आत्मविश्वासानं म्हणाला. तीं दोन्हीं पेन्स शेजारीं-शेजारीं पाहून आमच्या हृदयाला चरका बसला.

बाहेर पडल्यावर मीं बन्याला विचारलं, " काय रे, तुला फौंटनपेनहि दुरुस्त करतां येतं का ? "

"अरे, मग माझींहि दोनतीन पेन्स दुरुस्त करायचीं आहेत. काय घेशील ? बोल. " राजा काळे चिडक्या आवाजांत म्हणाला.

बन्यानं नुसतं ' हूं ' केलं नी एकवार खांदे उडवून तो निघून गेला.

" आता तरी त्याची खात्रीनं फजिती होणार. " आनंदाच्या स्वरांत नाना परांजपे म्हणाला.

" इंप्रेशन मारण्याच्या भरात चांगलाच वाहवत चाललाय् ! "– –मी.

"एक स्टोव्ह् दुरुस्त करता आला म्हणून काय पेनहि दुरुस्त करता येतं?" काळे म्हणाला.

" हें यंत्रयुग स्पेशॅलिस्टाचं आहे म्हणावं. " थोडासा विनोद करण्याच्या उद्देशाने मी म्हणालों.

" उद्या सकाळींहि गेलंच पाहिजे आपणांला त्याची फजिती पहायला. " काळे म्हणाला. पण त्याच्या आवाजांत कालच्या इतका दम नव्हता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही जरा लवकरच मंदाकडे गेलों. खोलींत ती एकटीच होती. अजून बन्या आला नव्हता. आम्हांला तेवढंच बरं वाटलं.

" काय? बन्या आला नाही वाटतं अजून ? " राजानं विचारलं.

" कोण, मिस्टर गोखले का ? " मंदा म्हणाली.

" मिस्टर गोखले " अं ? हं !

" नाहीच येणार तो ! " आमच्याकडे डोळे मिचकावून पाहात नाना परांजपे म्हणाला.

" कां ? " आश्चर्य दाखवून मंदेनं विचारलं.

" कां म्हणजे ? त्याला कुठं पेन दुरुस्त करता येतंय् ? तोंडानं सांगणं सोपं आहे " नाना म्हणाला.

" हो. अजून ज्याअर्थी तो आला नाही त्या अर्थी पेन दुरुस्त करता करता मोडून टाकलेलं दिसतंय् स्वारीनं. " माझ्या विनोदानं आम्ही तिघंहि हसलो. मंदाहि हसली. आम्हांला वाटलं, ती माझ्या विनोदालाच हसली.

" पेन म्हणता होय ? " मंदा हसतहसत म्हणाली, " पेन तर त्यांनी काल संध्याकाळींच आणन दिलं. "

" दुरुस्त करून ? " नानानं विचारलं.

" हो किती छान चालतंय् आता. आभार प्रदर्शित करणारं पत्रच लिहीत होतें मी त्यांना " आपलं पेन दाखवीत मंदा बोलत होती. " नंतर आम्ही काल सिनेमालादेखील जाऊन आलों ! "

आम्हां तिघांपैकी एकाद्याला मृत्यु आला असता तर त्याच्या स्मशान-यात्रेहून परत येताना जसे आमचे चेहरे झाले असते, तसे चेहरे करून थोड्या वेळानं आम्ही तिच्या खोलीबाहेर पडलों. तिनं आम्हांला चहाचा आग्रह केला, पण त्या मनःस्थितींत तो आम्हांला गोड लागला नसता म्हणून आम्ही ‘ नको ’ म्हटलं.

“ त्या फडतूस बन्याची चहा करते नी आम्हांला चहा प्या म्हणते. ” बाहेर आल्यावर मीं कोटी केली; पण त्यावर कुणी हसलं नाही.

“ कांही चहा नाही घ्यायचा तिच्याकडे. अक्कल नाही तिला ! ” राजा काळे रागानं म्हणाला.

“ पण इतके दिवस ती फार हुषार आहे असं तूंच तर म्हणत होतास ! ” नाना परांजपे म्हणाला. राजानं त्याच्याकडे फक्त रागानं पाहिलं.

“ बाकी बन्यानं आपल्याला हातोहात फसवलं ! ” मी म्हणालों.

“ अरे चल ! तो ठोंब्या काय फसवतो आपल्याला ! त्याच्यासारख्या छपन्न जणांना पुरून उरूं म्हणावं आपण. ” राजा म्हणाला.

“ त्यानं कसं फसवलं म्हणतोस तूं ? ” नानानं मला विचारलं.

“ ‘ आज सकाळीं येईन ’ असं मंदेला आपणांसमोर सांगून लेकाचा संध्याकाळींच येऊन गेला. छान चकवलंन त्यानं आपणांला. ” मी म्हणालों.

हळूहळू मंदाकडे जाण्याचा आम्हां तिघांचा उत्साह थंडावूं लागला.

तरीपण मधूनमधून तिच्या समाचाराला आम्ही जात होतों. पण नंतर एक दिवस जो प्रसंग घडला त्यानंतर मात्र तिच्याकडे जाण्याचं आम्ही अजिबात बंद करून टाकलं.

“ आणलं का माझं घड्याळ नीट करून ? ” आम्ही सर्वजण चहा पीत असतां मंदेनं बन्याला प्रश्न केला. तिचा तो प्रश्न ऐकून आम्ही चांगलेच दचकलों.

“ नाही ; उद्या देईन. त्याचं एक लिव्हर बदलायला पाहिजे. ”– बन्या.

“ उद्या तरी नक्की आणाल ना ? नाहीतर पहा हो, आपल्या अपाइंट-मेंटला मला फार उशीर झाला तर माझ्यावर नाही हं ! ” लाडिकपणाची कमाल करून मंदा म्हणाली.

“ हं ” बन्या हसला नी म्हणाला, “ उद्या सकाळीं अगदी नक्की. ”

" कसली अपॉइंटमेंट आहे तुमची उद्या ? " मीं भीतभीत विचारलं.

" अं... कांही नाही. जाणार आहोंत आम्ही पिक्निक्‌ला. "

मंदाबरोबर पिक्निक्‌ला जाणं ही कांही महत्त्वाची गोष्ट नव्हे अशा तऱ्हेनं बन्या बोलला नी चहाचे घुटके घेऊं लागला.

" तुला मोटार, आगगाडीचं एंजिन, विमान वगैरेसुद्धा दुरुस्त करतां येत असेल, नाही ? " मी जरा टोचूनच बन्याला विचारलं. एकदमच उघडकीस आलेल्या बन्याच्या ह्या यंत्रकौशल्यामुळं आम्ही कासावीस झालों होतों.

" हो, तेंसुद्धा करतील ते. यंत्रविद्येंत फारच हुषार आहेत ते. " मंदा कौतुकानं म्हणाली. " आपल्या देशांत जन्मले म्हणून त्यांची किंमत नाही. इंग्लंडांत नाहीतर जर्मनींत असते तर--

" अगदी एडिसन नाहीतर मार्कोनीच झाला असता ! " छद्मीपणानं राजा काळेनं तिचं वाक्य पुरं केलं.

" हो. " तो अर्थ लक्षांत न येऊन मंदा सहज म्हणाली. " मला तर त्या-बद्दल मुळीसुद्धा शंका नाही. मिस्टर गोखले म्हणजे एक झाकलं माणिक आहेत. नी वर एवढासुद्धा गर्व नाही हो त्यांना. "

" कसचं, कसचं ! " लाजल्यासारखं करून बन्या म्हणाला नी आमच्या-कडे चोरून पाहून लेकाचा गालांतल्या गालांत हसला.

त्यानंतर मात्र आम्हीं मंदेचा नाद अजिबात सोडला. ती आता बन्याच्या आहारीं पूर्णपणानं गेली होती. त्याच्या तावडीतून तिला सोडवणं आमच्या आटोक्याबाहेरचं होतं.

ह्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. एक स्कॉलर, एक कवि किंवा एक लेखक ह्या तिघांपैकी एकाची पत्नी होण्याचं भाग्य तिच्याकडे आपल्या पायांनी चालून आलं असतांना मंदा अखेरीस बन्यासारख्या शुंभाची पत्नी झालेली पाहून त्यांच्या लग्नाच्या दिवशीं आम्ही एक दुःखाचा सुस्कारा टाकला.

नाना परांजप्यानं खिशांतून कागदाचं एक पुडकं काढलं नी तें समोरच्या टेबलावर भिरकावलं.

" काय आहे हें ?" मीं विचारलं.

" मंदेवर केलेल्या कविता !" एक उसासा टाकून परांजपे म्हणाला. इतके दिवस त्यानं त्या आमच्यापासून लपवून ठेवल्या होत्या.

" फाडून टाक त्या." राजा काळे रागानं म्हणाला. " तिची तेवढी लायकी नाही."

" छे, तिच्यासमोर बन्याला चांगला जिरवायला पाहिजे होता." मी वैतागानं म्हणालों, " पहिल्यापासून आपलीच चूक झाली."

" छे छे !" नाना म्हणाला, " स्त्रीच्या बाबतींत सौंदर्य नी बुद्धि यांची व्यस्त प्रमाणांत वांटणी करणाऱ्या ब्रह्मदेवाचीच चूक आहे ही !"

" अंहं !" मी म्हणालों, " यंत्रविद्या शिकण्यासाठी हातोडे मारायला व्ही. जे. टीं. त न घालतां आर्टस्‌च्या कॉलेजांत आपणांला घालणाऱ्या आपल्या वडिलांचीच चूक आहे ही."

" जाऊं द्या रे !" राजा म्हणाला. " तिच्यासाठी कशाला इतके हळहळतां ? तिच्या डोक्यांतला एक स्क्रू ढिला आहे..."

" म्हणूनच तर तिनं यंत्रविशारदाशीं लग्न केलंय !"–मी

" पण काय रे ? बन्या एवढी यंत्रकला शिकला तरी कधी ?"–नाना.

" अरे, असतं एकेकाला त्यांत डोकं !"–मी

" छट् ! कसचं डोकं नी कसचं काय ! आठपंधरा दिवसांत कुणालाहि शिकतां येतील ह्या गोष्टी. "–राजा.

" मग तूं का नाही शिकून घेतलंस इतक्या दिवसांत ? मग मंदा तुला मिळाली असती."–नाना.

" हं. मंदेकरता मी असलीं हलक्या प्रतीचीं कामं करूं ?" राजा नानावर किंचित् रागावून म्हणाला. " तेवढी कांही तिची योग्यता नाही. मला यापेक्षा दुसऱ्या पुष्कळच उच्च गोष्टी शिकण्यासारख्या आहेत."

बन्याची बरीच निंदा केल्यावर नी आपल्या प्रेमाला पात्र होण्याइतकी मंदेची योग्यताच नाही अशी एकमेकांची खात्री पटवून दिल्यावर मग कुठं आम्हांला जरासं समाधान वाटलं !

नंतर बऱ्याच दिवसांची गोष्ट. बन्याची नी आमची भेट क्वचितच होई. आम्ही हा प्रसंग जवळजवळ विसरूनच गेलों होतों. एक दिवस माझा बिघडलेला स्टोव्ह दुरुस्त करण्यासाठी मी शिंद्यांच्या दुकानाच्या पायऱ्या चढत होतों. इतक्यांत दुकानांतून बाहेर पडणाऱ्या बन्याशी माझी अचानक गाठ पडली. त्याला पाहून मी विचारलं.

" ओहो बन्याबापू, किती दिवसांनी भेटलांत ! पण तुम्ही इकडे कुठं ?

" आमचा स्टोव्ह जरा बिघडला होता, तो दिला होता दुरुस्तीला " बन्या अगदी सहज म्हणाला. सद्सद्विवेकबुद्धीची टोचणी, लाजलज्जा वगैरे कांहीसुद्धा वाटलं नाही त्याला हे शब्द उच्चारतांना.

" पण तूं तर मोठा यंत्रविशारद आहेस ना ? स्टोव्ह, पेनं, घड्याळं, एंजिनं, विमानं सारंसारं तुला दुरुस्त करतां येतं ना ?" मीं जरा रागानंच विचारलं.

" असं कधी म्हटलं मी ?" बन्यानंच मला उलट प्रश्न केला. " बिघडलेल्या सर्व वस्तु मी पूर्वीपासून या दुकानांतूनच तर दुरुस्त करून आणतों." एवढं बोलून तो विमनस्कपणानं हसला नी आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणं एकवार खांदे उडवून निघून गेला.

संग्रहालय, ... 
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नों: दि: .....



# श्री. र. गो. फाटक !

[ शीर्षक वाचल्यावर वाटावें की एखादें सुंदर व्यक्तिचित्र या कथेंतून पहावयास सांपडेल; परंतु अखेरपर्यंत उत्कंठेने रंगून गेलेली ही कथा वर्टींच्या अनुभवांतील एका प्रसंगाचें चित्र साकार करते. आपल्या आवडत्या लेखकाच्या दर्शनाने, त्याला केलेल्या मदतीने स्वत: लेखकच हुरळून सहज पुसले जातात ते अखेरपर्यंत ! श्री. वर्टींच्या कथांत (Local colour) सुपरिचित व्यक्ति आणि स्थल यांचे निर्देश कशा खुबीने आलेले असतात त्याचा हा एक नमुना. 'ताजमहाल आणि भेंड्यांची भाजी' या एकाच बोलक्या निर्देशाचा उल्लेख याची उत्तम खूण.]

* * *

संध्याकाळीं पांचाचा सुमार होता. कपडे चढवून मी दवाखान्यांत जाण्याच्या तयारींत होतों. इतक्यांत दारावरची घंटा वाजली. कोण आलं असावं ह्याविषयीं विचार करीत मीं दरवाजा उघडला. पाहतों तर आमच्या गावचे प्रमुख साहित्यिक रा. रा. वा. श्री. देशपांडे समोर उभे.

त्यांना पहाताच मी मनांतून जरासा चरकलोंच. कारण वा. श्री. दे. हे कांही माझे पेशंट नव्हते. ते कधीं माझ्याकडे येत ते कसल्या तरी कार्यासाठी वर्गणी मागण्यापुरतेच. तेव्हा त्यांना बघून मला जरासा निरुत्साह वाटला असल्यास त्यांत नवल नव्हतं.

आणि तसं मला वाटण्यास आज दुसरंहि एक कारण झालं होतं. आज सकाळीं अशाच एका कारणासाठी माझी आणि एका पांचाच्या नोटेची फारकत झाली होती. आता ती पांचांची नोट पुढेमागे परत मिळण्याची

मला आशा होती, हें खरं. पण आणखी कोठल्याहि कार्याला मदत करण्याची निदान आज तरी माझी इच्छा नव्हती.

पण, मनांत क्षणार्धांत येऊन गेलेले हे विचार चेहऱ्यावर उमटूं न देतां किंचितसं हसून मीं वा. श्री. देना. प्रश्न केला,

" ओहोहो! आज इकडे कुठे ? "

" आपल्याकडेच. जरा बाहेर चला. "

" कुठे ? "

" एक पेशंट पहायचा आहे ? "

" कोण आजारी आहे ? "

" पुण्याचे साहित्यिक फाटक माहीत असतीलच तुम्हाला. त्यांना जरा बरं नाही. "

" कोण ? फाटक ! म्हणजे ते आज गेलेच नाहीत का पुण्याला ? " मीं जराशा आश्चर्यानं विचारलं.

" नाही, प्रकृति बिघडल्यामुळं त्यांनी जाणं रहित केलं. तुमची त्यांची ओळख आहे वाटतं ! "

" ओळख म्हणजे–हो. आज सकाळीच झाली आमची ओळख. "

हा वेळपावेतो माझी औषधांची बॅग मीं तयार केली होती. ती वा. श्री. देंच्या हातात देऊन आम्ही फाटक रहात असलेल्या ' केशवाश्रमा ' चा रस्ता चालूं लागलों.

सुप्रसिद्ध लघुकथालेखक श्री. र. गो. फाटक हे तुम्हांला ऐकून माहीत असतीलच. घरगुती वातावरणाच्या गोष्टी लिहिण्यांत त्यांचा अगदी हातखंडा आहे. मी त्यांच्या गोष्टींचा मोठा चाहता असलों तरी त्यांच्याशी प्रत्यक्ष ओळख होण्याची संधि मला अजूनपर्यंत मिळालेली नव्हती. तशी संधि आज सकाळीं अगदी अचानक मला लाभली होती–आणि तीहि मोठ्या मजेदार रीतीनं.

रस्त्यानं चालता चालता आज सकाळचा तो प्रसंग माझ्या दृष्टीसमोरून जाऊं लागला.

साडेअकरा–बाराचा सुमार असेल. दवाखान्याचं काम आटोपून सकाळचीं वर्तमानपत्रं वाचीत मी बसलों होतों. स्थानिक शारदोपासक मंडळाचं

वार्षिक स्नेहसंमेलन, पुण्याहून मुद्दाम आमंत्रण करून आणलेल्या र. गो. फाटकांच्या अध्यक्षतेखाली कालच पार पडलं होतं. त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचा वृत्तान्त वाचण्यांत मी गढून गेलों होतों.

किती सुंदर भाषण केलं होतं त्यांनी. रस्त्यानं चालतांना फर्लांगा-फर्लांगावर पी डब्ल्यू. डी. चे पांढरा रंग फासलेले दगड आढळावेत, त्याप्रमाणें कंसांत 'हंशा' आणि 'टाळ्या' हे शब्द त्या वृत्तान्तांत थोड्या थोड्या अंतरावर विखुरलेले होते. पण तो वृत्तान्त वाचतांना माझ्या मला आनंद वाटत नव्हता. एका अत्यवस्थ रोग्याकडे अडकून पडल्यामुळे मला मनांत फार असून फाटकांच्या भाषणाला काल हजर राहता आलं नव्हतं. माझ्या आवडत्या लेखकाचं एक सुंदर भाषण ऐकण्याची आलेली संधि फुकट गेल्याबद्दल, तो वृत्तान्त वाचतांना माझ्या मनाला सारखी चुटपुट लागून राहिली होती. त्या वेळीं आम्हा डॉक्टरांच्या धंद्याचा मला चांगलाच राग आला होता. एखादा कार्यक्रम ठरवावा, आणि ऐन त्याच वेळीं एखाद्या पेशंटकडून बोलावणं यावं, हा तर माझा अगदी नेहमीचाच अनुभव होता.

" डॉक्टर आहेत का ? " तो वृत्तान्त वाचीत असतां बाहेरच्या खोलींत उच्चारलेले हे शब्द मला ऐकू आले.

" आहेत. काय काम आहे ? " माझ्या कंपाऊंडरनं विचारलं.

" जरा खासगी काम आहे त्यांच्याशीं ! "

त्या गृहस्थाला कंपाऊंडरनं माझ्या खोलींत आणून सोडलं. आंत येताच त्यानं मला नमस्कार केला आणि विचारलं, " आपणच का डॉ. खरे ? "

" हो. बसा ! "

" आपल्याकडे माझं थोडं खासगी काम आहे. " खुर्चीवर बसता बसता तो गृहस्थ म्हणाला

आम्हा डॉक्टरांकडे 'खासगी' कामासाठी येणाऱ्या लोकांचे दोन प्रकार असतात. एक प्रकार 'गुप्त' रोग झालेल्यांचा आणि दुसरा मदतीची याचना करावयास येणाऱ्यांचा. तो गृहस्थ खुर्चीवर बसेपर्यंत मी त्याची पाहणी करून घेतली. गृहस्थ चांगला गोरागोमटा, बांधेसूद आणि रुबाबदार दिसत होता. डोक्यावर बारीकशी काळी टोपी होती आणि ती कलात्मक रीत्या किंचितशी कलती ठेवली होती. तिच्याबाहेर दिसणारे केस एखाद्या

चित्रांतल्याप्रमाणे काळेभोर आणि कुरळे होते. अंगांत निळ्या ब्लेझरचा कोट होता. खाली पांढरंशुभ्र तलम धोतर होतं. पायांत नुकतेच पॉलिश केल्याप्रमाणे चकचकीत दिसणारे पंपशू होते.

त्या गृहस्थाच्या एकंदर झक्पक रुबाबावरून तो मदत मागावयास येणाऱ्यांच्या वर्गांतला नसावा, असा मी तर्क केला. अर्थात् मग तो डॉक्टरांना भरपूर पैसे देणाऱ्या ‘ गुप्त ’ रोग झालेल्यांच्या वर्गांतला असावा असा विचार माझ्या मनांत आला आणि मनांतून मी जरा खुश झालों.

“ हं, काय काम आहे तुमचं ? ” वर्तमानपत्र बाजूला ठेवून देत मीं विचारलं.

“ असं पहा,” तो गृहस्थ खुर्चीवर ऐसपैस बसून म्हणाला, “ माझं आपणाशी थोडंसं खासगी काम आहे. ” नंतर जरासं चाचरत तो म्हणाला, “मला आपणांकडून थोड्या आर्थिक मदतीची अपेक्षा आहे.”

येवढ्या रुबाबांत ‘ खासगी ’ कामासाठी माझ्याकडे आलेला मनुष्य ‘ गुप्त ’ रोग झालेला नसून अखेरीस भीक मागावयास आलेलाच निघाला, हें पहाताच माझी जराशी निराशा तर झालीच; पण त्या माणसाचा मला रागहि आला. कपड्यांवरून श्रीमंत दिसणाऱ्या माणसाला मदतीची जरुरी कां लागावी, हेंहि मला समजेना. माझ्या मनांतल्या ह्या नाना तऱ्हांच्या विचारांचं प्रतिबिंब बहुतेक माझ्या चर्येवर उमटलं असावं. कारण तो गृहस्थ एकदम म्हणाला, “ माझी ही विनंति ऐकून तुम्हांला आश्चर्य वाटेल, हें मी जाणून आहें; पण परिस्थितीच अशी विचित्र आली आहे की, मला याचकाची भूमिका स्वीकारावी लागत आहे. डॉक्टरसाहेब, मदत मागत फिरणाऱ्यांपैकी मी नाही. पण आज अडचणीत सापडल्यामुळे मला ह्या मार्गानं जावं लागलं आहे...फार नाही, मला फक्त पांच रुपयांची जरुरी आहे. ”

इतक्या भारी पोषाखांतल्या माणसानं मदत मागायला यावं, ह्याचं मला वाटलेलं आश्चर्य अजून कमी झालेलं नव्हतं. निरनिराळ्या सबबी सांगन मदतीची याचना करावयास येणाऱ्या लफंग्यांपैकीच हा कोणीतरी असावा, अशी मला शंका आली. मी म्हणालों, “ हें पहा मिस्टर, ज्यांना मदत करावीशी मला वाटते, त्यांना मी आपण होऊन आपल्या शक्तीप्रमाणं मदत करीत असतों. तुम्हाला मी स्पष्टच सांगतों–मी तुम्हाला कांहीएक मदत करणार नाही. ”

" पण माझं म्हणणं तर जरा ऐकून घ्याल ? "

तो गृहस्थ बोलूं लागला, पण त्याला मध्येच अडवून मी म्हणालों, " अहो, असे लोक आमच्याकडे पुष्कळ येतात. प्रत्येकाला जर मी मदत करूं लागलों, तर लवकरच मला दवाखाना बंद करून दिवाळं फुंकावं लागेल. इथं मी बसतों तो पैसे कमवायला, आल्यागेल्याला पैसे वाटायला नव्हे. "

" पण…… "

" पण बिण कांही नाही. तुम्ही आजारी पडलांत तर तुम्हाला पाहिजे तर दोन दिवस मी औषध फुकट देईन. बस्स ! पण पैशाची गोष्ट काढूं नका. " असे कोणी मदत मागावयास आले असता द्यावयाचं माझं ठराविक उत्तर मीं दिलं. पण तें त्या गृहस्थाला बरंच लागल्यासारखं दिसलं. थोडा वेळ तो गप्प बसून राहिला. मीहि फिरून श्री. र. गो. फाटकांच्या भाषणाचा वृत्तान्त वाचण्यांत गर्क झाल्याचं सोंग आणूं लागलों.

पण येवढ्यानं तो गृहस्थ माझा पिच्छा सोडीलसं दिसेना. तो बोलूं लागला, " डॉक्टरसाहेब, माझी हकीकत एकदा ऐका आणि मग पाहिजे तर मदत करा किंवा करू नका. मी परगावाहून इथं आलों आहें. आज गंगेवर आंघोळीला गेलों होतों. पाण्यांत उतरल्यावर कपडे घाटावर काढून ठेवले होते. आंघोळ झाल्यावर येऊन पाहतों तो कोटाच्या खिशांतलं माझं पैशाचं पाकीट नाहीसं झालेलं मला आढळून आलं. काय करावं हेंच मला सुचेना. माझ्याजवळ होते नव्हते तेवढे सर्व पैसे त्या पाकिटांत होते. आता माझ्याजवळ एक दिडकीसुद्धा नाही. सकाळपासून माझ्या पोटांत अन्नाचा कण नाही. शिवाय दीडाच्या गाडीनं मला परत गेलंच पाहिजे. दोघां चौघांजवळ मी मदतीची याचना केली; पण त्यांनी मला धुडकावून लावलं. अखेरीस तुमच्या नावाची पाटी पाहून, मनाचा हिय्या करून, शेवटचा प्रयत्न करण्यासाठी वर चढलों गांवी पोचतांच तुमचे पांच रुपये मी मनिऑर्डरनं ताबडतोब पाठवून देईन. "

" हें पहा, " त्याचा तो सर्व इतिहास शांतपणानं ऐकून घेऊन, निश्चयात्मक स्वरांत मी म्हणालों, " ह्या तऱ्हेची गोष्ट सांगणारे आमच्याकडे पुष्कळ जण येतात. हाच इतिहास मी शंभरदा तरी ऐकला असेल. आता तुम्ही जावं हें बरं ! "

" डॉक्टरसाहेब, असं म्हणू नका. खरोखरीच अडचणीत सापडल्याशिवाय मी असा गयावया करणार नाही. तुम्ही आता पैसे दिले नाहीत तर माझी दीडाची गाडी चुकेल मी सांगितलेली हकीगत तुम्हांला खोटी वाटत असेल तर वाटूं द्या. मला तुमचे पांच रुपये फुकट नकोत. त्याबदली पाहिजे तर माझं हें पार्करचं फौंटन पेन तुमच्याजवळ ठेवायला मी तयार आहें. त्याची किंमत सोळा रुपये आहे. यदाकदाचित् तुमचे पैसे जर मीं परत केले नाहीत, तर त्याबदलीं तुम्हांला हे पेन मिळेल. "

जराशा रागारागानं हे शब्द उच्चारून आपल्या कोटाच्या वरच्या खिशांतून फौंटनपेन काढून, त्यानं तें टेबलावर माझ्यासमोर ठेवून दिलं. जणू काय माझ्यावर तो उपकार करूं पहात होता; पण मीच मूर्खपणानं तो नाकारीत होतों, असा त्यावेळचा त्याचा आविर्भाव होता.

मीं त्या पेनकडे दृष्टि टाकली. तें पार्करचं होतं आणि भारीपैकी होतं ह्यांत शंका नव्हती. पण त्या गृहस्थाच्या लोचटपणाचा मला आता इतका राग आला होता की मी त्याला म्हणालों, " मला काय तुम्ही गहाणाचा व्यवहार करणारा एखादा मारवाडी समजतां की काय ? इथं मी डॉक्टरकी करायला बसलों आहें, सावकारी नाही, समजलांत ? "

माझं हें कठोर भाषण ऐकून तो गृहस्थ एकदम शरमिंदा झाला. थोडा वेळ स्वस्थ बसून नंतर खिन्नपणानं तो जावयास उठला. टेबलावरचं पेन उचलून घेता घेता तो म्हणाला, " बरंय् जातों तर. तसदीची माफी असावी. "

असं म्हणून नमस्कार करून तो जाऊं लागला.

तो तें पेन उचलीत असतां, मला दिसून आलं होतं की त्यावर कोणाचं तरी नांव कोरलेलं आहे ! अर्थात् तें त्या गृहस्थाचंच असणार असा मीं तर्क केला. ह्या वेळपावेतो त्या गृहस्थाचं नांव जाणण्याची मला उत्सुकता वाटूं लागली होती. पण तें विचारण्याची संधीच इतका वेळ मिळाली नव्हती. फाउंटनपेनवरचं तें नांव पाहिल्यास आपणांला त्या गृहस्थाचं नांव आयतंच कळेल, ह्या कल्पनेनं मी त्याला म्हणालों, " अहो, जरा पाहूं तें पेन. "

किंचित् आनंदानं त्यानं तें पेन मला दिलं. त्याला पैसे न देण्याचा माझा विचार बदलला असावा, अशी आशा त्याला वाटलेली दिसली.

त्या पेनवर कोरलेलं नांव मीं वाचलं मात्र, आणि मला आश्चर्याचा एक

चांगलाच धक्का बसला.

तें नांव दुसऱ्यातिसऱ्या कोणाचं नसून पुण्याचे सुप्रसिद्ध लघुकथालेखक श्री. र. गो. फाटक ह्यांचं होतं !

त्या नांवाकडे आणि आलेल्या गृहस्थाकडे मी आलटून पालटून पाहात राहिलों. त्यावेळीं माझ्याकडे पाहून कोणालाहि हसू आलं असतं, इतका माझा गोंधळ उडाला होता.

" र. गो. फाटक ते आपणच ? " मीं विचारलं. माझ्या बोलण्यांतला कठोरपणा आता नाहीसा होऊन त्याची जागा आदरानं घेतली होती.

त्या गृहस्थानं माझ्या प्रश्नाचं उत्तर एकदम दिलं नाही. सांगावं की न सांगावं ह्याचा त्यानं थोडासा विचार केल्यासारखा दिसला आणि नंतर कांहीतरी विचार ठाम करून त्यानं उत्तर दिलं, " हो. "

" मग मघांच कां नाही सांगितलं तसं ? म्हणजे मघांचा सर्व प्रकार टळला असता. " मी जराशा सलगीच्या स्वरांत म्हणालों.

" मला तसं सांगणं प्रशस्त वाटलं नाही. माझ्या वाङ्मयीन लौकिकाचा असा गैरफायदा घ्यावा हें मला योग्य वाटेना. होता होईल तो नांव न सांगता काम झालं तर पहावं असा माझा हेतु होता. पण अखेरीस तुम्हांला माझं नांव कळलंच ! " आपलं नांव मला कळलं ह्याचं त्यांना थोडंसं वाईट वाटलेलं मला दिसून आलं.

हा गृहस्थ म्हणजेच फाटक असावेत असं मला वाटू लागलं होतं; पण तेवढ्यांत मला एक शंका आली आणि मीं विचारलं, " तुम्ही शारदोपासक मंडळाच्या स्नेहसंमेलनाला आलां होतां ना ? "

" हो, मी अध्यक्ष होतों. "

" विचारतों ह्याबद्दल राग मानू नका, पण मग शारदोपासक मंडळाच्या चिटणीसांनी तुम्हांला मदत केली नसती का ? "

" कां नसती केली ? अवश्य केली असती. पण चिटणिसांनी प्रवासाचे पैसे मला आगाऊच पाठवून दिले होते. त्यांच्याकडे मी आणखी पैसे मागितले असते तर त्यांनी मला ते दिले असते खरे; पण तसं करणं मला प्रशस्त दिसेना. त्यांचं मन माझ्याविषयीं कलुषित झालं असतं. "

त्यांच्या या उत्तरानं माझ्या सर्व शंकांचं निरसन झालं. सर्व गोष्टींचा मीं थोडासा विचार केला आणि माझ्यासमोर उभी असलेली व्यक्ति म्हणजेच माझे आवडते लघुकथालेखक श्री. र. गो. फाटक हे होत, हें मी समजून चुकलों. त्यांच्याकडे मी थोडा वेळ आदरयुक्त नजरेनं पाहिलं. त्यांचा तो बुद्धिमत्ता दर्शविणारा विशाल भालप्रदेश, ती सरळ आणि उन्नत नासिका, हृदयाचा ठाव घेणारी ती भेदक दृष्टि, त्यांचा तो हसरा आणि सतेज चेहरा–सर्व गोष्टी कशा एकाद्या उत्तम लघुकथालेखकाला साजेशाच होत्या.

प्रत्येक वाचक, एकाद्या लेखकाच्या ललितकृति वाचून त्याच्या रूपाविषयीं वगैरे मनांतून कांही कल्पना बांधीत असतो. फाटकांच्या लघुकथांवरून मीहि ते कसे दिसत असतील, कसें बोलत असतील, ह्याचीं कांही चित्रं मनाशींच काढलीं होतीं. माझ्या ह्या कल्पनांप्रमाणें र. गो. फाटक हे एक उमदे, विनोदी, खेळकर, धडधाकट, निरोगी प्रकृतीचे आणि पाहतांक्षणींच दुसऱ्याला वश करून घेणारे असे गृहस्थ होते. आणि माझ्यासमोर उभी असलेली ती व्यक्ति ह्या कल्पनांशीं पुष्कळशी जुळणारी अशीच होती.

फाटकांसारख्या मोठ्या साहित्यिकाला आपल्या हातून अजाणतेपणीं का होईना पण अन्याय घडत होता, त्यांना एखाद्या लफंग्याप्रमाणे आपण वागवलं, ह्याची आठवण होऊन मी थोडासा खजील झालों आणि शरमिंद्या आवाजांत म्हणालों, " माझ्या मघाच्या वागणुकीनं तुम्हांला बराच मानसिक त्रास झाला असेल नाही ? मला त्याबद्दल क्षमा करावी. "

" छे, छे! त्यांत क्षमा कसली करायची!" ते हंसून म्हणाले, " अनोळखी माणसाशीं तुम्ही ज्या तऱ्हेनं वागलांत, त्यांत व्यवहाराच्या दृष्टीनं काय चुकलं ?"

" हं, हे घ्या पांच रुपये. " त्यांच्या हातावर एक पांचाची नोट ठेवीत मीं म्हटलं, " आणि ते परत पाठवण्याचीहि घाई नाही. सावकाश पाठवा सवडीनं. "

फाटकांसारख्या एका उमद्या साहित्यिकाशीं अशी अचानक ओळख झाली आणि त्यांच्या उपयोगी पडण्याचीहि संधि मिळाली, ह्याविषयी मला आनंद आणि अभिमान वाटत होता !

"मी आपला अतिशय आभारी आहें." असं म्हणून त्यांनी ती नोट आपल्या कोटाच्या आंतल्या खिशांत ठेवून दिली आणि माझ्या हातांतल्या पेनकडे आपली दृष्टि वळवली. जणू त्यांना म्हणायचं होतं, " माझी ओळख पटली ना ? मग माझं पेन ठेवून घ्यायची आता जरूर काय ?'

त्यांच्या दृष्टींतला तो अर्थ मी जाणला आणि त्यांना म्हणालों, " हें पेन मात्र नाही हो परत मिळणार. आतां हें पेन मी आपल्या प्रथम भेटीची आठवण म्हणून सदैव माझ्याजवळ ठेवून घेणार. येत्या दिवाळीला दुसर एक छानसं पेन मी तुम्हांला भेट म्हणून पाठवून देईन."

" बरं बरं," असं म्हणून आणि परत एकदा माझे आभार मानून ते घाईघाईनें निघून गेले. जेवण उरकून त्यांना दीडची गाडी पकडायची होती.

फाटक निघून गेल्यानंतर त्या पेनकडे कितीतरी वेळ मी पहात राहिलों. ताजमहालसारख्या एकाद्या अपूर्व वस्तूकडे पहात राहावं तशा आदर आणि कुतूहलपूर्ण दृष्टीनं मी त्याकडे पहात होतों. हो ! हेंच तें पेन, ज्यांतून एकापेक्षां एक सरस लघुकथा कागदावर उतरल्या होत्या, ज्यांतून झरणाऱ्या अमृतानं सर्व महाराष्ट्र बेहोष झाला होता. 'ताजमहाल आणि भेंड्यांची भाजी' ही घरगुती वातावरणानं थबथबलेली अपूर्व लघुकथा ह्याच कृष्णमुखीच्या पोटांतून बाहेर पडली होती. आणि इतक्या ऐतिहासिक महत्त्वाचं तें लेखनाचं शस्त्र आतां माझ्या मालकीचं झालं होतं. केवढा मी भाग्यवान् !

वा. श्री. दे.बरोबर वाट चालतांना हा सर्व प्रसंग माझ्या डोळ्यांसमोरून निघून जात होता. पेनची आठवण होतांच कोटाच्या वरच्या खिशाला हात लावून तें सुरक्षित आहे ना, ह्याची मीं खात्री करून घेतली. फाटकांनी आजारी पडावं ही वाईट वाटण्यासारखी गोष्ट होती खरी; परंतु त्यांच्याशीं आज सकाळींच झालेली ओळख पक्की करण्याची त्यामुळें संधि प्राप्त झालेली पाहून, मला आनंदच झाला होता.

केशवाश्रमांत शिरतांना माझ्या मनांत विचार आला, 'आज आपण फाटकांना पैशाची मदत केली हें किती चांगलं केलं! नाहीतर आजारपणांत त्यांना बराच त्रास झाला असता.'

वा. श्री. दे. नी, फाटकांनी भाड्याने घेतलेल्या खोलींत शिरतांना प्रश्न केला, ' वा फाटकसाहेब ! डॉक्टरांची आणि तुमची ओळख असून आम्हांला त्याचा थांगपत्तासुद्धां लागू दिला नाही तुम्ही !'

मी आंत शिरून आजूबाजूस पाहिलं; पण फाटक मला कुठं दिसेनात ! नाही म्हणावयास एका कोपऱ्यांतल्या लोखंडी खाटीवर एक जाड भिंगाचा चष्मा लावलेली, रडव्या चेहऱ्याची, खुजट आणि किडकिडीत व्यक्ति पडलेली माझ्या दृष्टीस पडली ती व्यक्ति फाटक असणं शक्यच नव्हतं. कुठं तें त्यांचं राजबिंड रूप आणि कुठं हे दरिद्री बुद्रुक !' छट् ! हे र. गो. फाटक असणं शक्यच नाही ! मी मनांत विचार केला.

" कुठे आहेत फाटक ? " मी वा. श्री. दे. ना प्रश्न केला.

" हे काय, तुमच्या समोरच आहेत कीं !" ते म्हणाले. माझ्या प्रश्नाचं त्यांना जरा आश्चर्य वाटल्यासारखं दिसलं. त्यांनी विचारलं, " तुमची त्यांची ओळख आहे म्हणता ना ? "

" मी ह्या फाटकांना ओळखत नाहीं. माझी र. गो. फाटकांशीं ओळख आहे."

" मग र. गो. फाटक हेच की !" वा. श्री. दे. ठासून म्हणाले.

" हेहि र. गो. फाटकच ?" मीं गोंधळून गेलों होतों; पण थोडासा विचार करून मी म्हणालों, " काय नवलाची गोष्ट आहे पहा ! एकाच नांवाची दोन माणसं असावीत आणि त्यांची ओळख होण्याचा योग एकाच दिवशीं यावा ! खरोखरच आश्चर्य आहे नाही ? "

" दुसरे र. गो. फाटक कोण ?" वा. श्री. दे. नी प्रश्न केला.

" र. गो. फाटक माहीत नाहीत तुम्हांला ! अहो, ते पुण्याचे सुप्रसिद्ध लघुकथालेखक."

वा. श्री. दे. नी आणि खाटेवरच्या फाटकांनी थोडा वेळ एकमेकांकडे प्रश्नार्थक दृष्टीनं पाहिलं. नंतर दोघांनीहि माझ्याकडे एक तीव्र दृष्टिक्षेप केला. जणू त्यांना म्हणायचं होतं, ' तुम्हांला वेडबीड तर लागलेलं नाही ना ?"

" अहो, सुप्रसिद्ध लेखक र. गो. फाटक ते हेच ! " जराशा चिडक्या आवाजांत वा. श्री. दे. म्हणाले.

"हे फाटकहि लेखक आहेत ?" मी म्हणालों, "आणखी एक आश्चर्य !" पुष्कळदा सत्य कादंबरीपेक्षा अधिक नवलाचं असतं म्हणतात, तें कांही खोटं नाही. दोघेहि र. गो. फाटकच, आणि दोघेहि लेखक ! बाकी अलिकडे काय म्हणा, कोणीहि उठावं, चारदोन गोष्टी खरडाव्या आणि लेखक म्हणून मिरवावं, अशी स्थिति आलीय्. आणखी चारदोन र. गो. फाटक लेखक म्हणून सापडले, तरी मला आश्चर्य वाटणार नाही !" माझा उद्देश थोडासा विनोद करण्याचा होता; पण एवढं बोलून झाल्यावर माझ्या लक्षांत आलं, की खाटेवरल्या फाटकांना आपलं हें बोलणं जरा बोचक वाटलं असावं, म्हणून मीं लगेच विषयांतर केलं. "कुठं प्रसिद्ध होतात ह्यांच्या गोष्टी ?"

"डॉक्टर, तुम्ही स्वतःला लेखक म्हणवतां, आणि र. गो. फाटकांच्या गोष्टी कुठे प्रसिद्ध होतात म्हणून विचारतां ?" जरासें रागावून वा. श्री. दे. म्हणाले, "अहो, ह्यांची गोष्ट प्रसिद्ध होत नाही, असं मराठीत एकहि प्रमुख मासिक तुम्हाला मिळणार नाही !"

"होय का ! मग दोघा र. गो. फाटकांच्या गोष्टीचा बराच घोटाळा होत असेल !" मीं म्हटलं.

मीं म्हटलं खरं, पण मी स्वतःच आता घोटाळ्यांत पडलों होतों. आज भेटलेल्या दोन र. गो. फाटकांतले सुप्रसिद्ध लघुकथालेखक फाटक कोण ह्याविषयीं मी विचार करूं लागलों. पुराव्यानिशीं माझी समजूत होती की, सकाळीं भेटलेले फाटकच प्रसिद्ध लघुकथालेखक होत. शिवाय इतक्या सुंदर गोष्टी लिहिणारे फाटक कसे दिसत असतील, ह्याची मी मनाशीं जी चित्रं काढली होती, त्यांच्याशी आज सकाळचे गोरेगोमटे आणि रुबाबदार फाटकच, ह्या खाटीवर पडलेल्या किरकोळ आणि रोगट फाटकांपेक्षा अधिक जुळते होते. आणि शिवाय र. गो. फाटकांचे फोटोहि मी पुष्कळदा मासिकांतून पाहिलेले होते, तेदेखील ह्याच कल्पनांना पुष्टी देत होते. हे खाटेवरले फाटक, फोटोग्राफरनं आपलं सर्व कौशल्य खर्ची घातलं, तरीहि त्या फोटोतल्याप्रमाणें रुबाबदार दिसणं शक्य नाही, असं मला वाटत होतं.

पण वा. श्री. दे. तर निक्षून सांगत होते की सुप्रसिद्ध र. गो. फाटक ते हेच. मग हा घोटाळा आहे ? मला कांहीच समजेना, म्हणून मी विचारलं' "शारदोपासक मंडळाच्या संमेलनाचे अध्यक्ष फाटक ते हेच ?"

" होय. वा डॉक्टर, तुम्ही आज असं काय करता हेंच समजत नाही ?" जरा निराशेच्या स्वरांत वा. श्री. दे. म्हणाले.

आता आणखी घोटाळा नको म्हणून मी सकाळचा सर्व प्रकार त्यांना निवेदन केला. ते ऐकून खाटेवरचे फाटक पहिल्यांदाच हसले. पण तें क्षण-भरच. आपल्या खप्पड आणि रडक्या चेहऱ्यावर येणाऱ्या हास्याला जणू काय त्यांनी बंदी केली होती. आणि त्यावर हास्य दिसतांच त्यांनी त्याला हुसकावून दिलं होतं. ते म्हणाले, " त्यांनी तुम्हांला दिलेलं पेन काळ्या रंगाचं आहे का ? आहे का तें तुमच्याजवळ आता ?"

मीं होकारार्थी उत्तर दिलं, आणि खिशांतून तें सकाळचं पेन काढून त्यांना दाखवलं. त्याकडे पाहून खाटीवरचे फाटक म्हणाले,

" अहो, हें तर माझंच पेन आहे ! परवापासून नाहीसं झालं होतं !"

मी आश्चर्यचकित होऊन त्यांचं बोलणं ऐकतच राहिलों.

तुमच्याकडे र. गो. फाटक म्हणून आलेला गृहस्थ उंच, गोरा, देखणा आणि झकपक पोषाखातला होता का ?"

" हो."

" अहो, मग तोच तो माझ्याबरोबर परवा आगगाडीत होता. पुण्याहून नाशकापर्यंतचा प्रवास आम्हीं बरोबरच केला. इथल्या स्टेशनवर उतरेपर्यंत त्याने माझ्याशीं चांगल्या गप्पागोष्टी केल्या. गाडीतून उतरल्यावर पाहतों तर माझं पेन खिशांतून नाहीसं झालेलं ! वाटलं होतं, प्रवासाच्या गड-बडीत कुठं तरी पडलं असेल...त्यानं तें चोरलं असेल अशी मला शंकासुद्धा आली नव्हती......मीं तर माझ्या ह्या पेनची आशाच सोडली होती; पण किती विचित्र योगायोगानं तें मला परत मिळालं पहा ! गोष्टीला सुंदर कथानक आहे, नाही ?"

" हें तुमचं पेन घ्या परत. हें कथानक मात्र मी घेतों !" त्यांच्या हातांत तें पेन खुपसीत मी म्हणालों. माझ्या आवाजांत जरासा रागाचा अंश असावा, अशी मला शंका आली.

ह्या सर्व प्रकारानंतर मला थोडंसं वाईट वाटलं. पाच रुपये जाऊन वर पेनहि गेलं, ह्याचं तें दुःख नव्हतं, तर माझे आवडते लेखक र. गो. फाटक हे त्यांच्याविषयीच्या माझ्या कल्पनांशी तंतोतंत जुळणाऱ्या सकाळच्या

गृहस्थासारखे देखणे आणि उमदे नसून एक फाटके इसम असावेत ह्या वस्तुस्थितीचं मला दुःख झालं होतं. एकाद्या सुंदर स्वप्नाचा मध्येच भंग व्हावा, तसं मला त्या वेळी वाटलं.

आणि म्हणूनच जें पेन फाटकांची आठवण म्हणून मीं सकाळी मोठ्या हौसेने स्वतःजवळ ठेवून घेतलं होतं. तें पेन खऱ्या फाटकाना परत देतांना मला मनाचा जरासुद्धा हिरमोड झाल्यासारखं वाटलं नाही.

● ● ●

५

# रंगरावांची गैशा !

[ एका वेगळच्या निवेदन तंत्राने श्री. वर्टी ही कथा सांगतात. अकारण संशय हा कथेचा परिचित विषय. परंतु जपानी गैशाच्या तोंडून वदविलेल्या हकीकतीने ही कथा रंगदार वातावरणांत आपल्याला चाळवते आणि शेवटच्या अनपेक्षित अखेरीने रंगरावांच्या रंगेल स्वभावाचा एक नवा ऋजु कोपरा उजळून स्तिमित करते.]

● ● ●

" मोहननं म्हणे क्लब सोडला ?" मी रंगरावांना विचारलं

" हो. खरं आहे तें. गेल्या आठएक दिवसांपासून तो क्लबांत कधी दिसला नाही." रंगराव म्हणाले.

" आश्चर्य आहे !" मी म्हणालों. " त्याला ब्रिजचं एवढं वेड ! तहान-भूक सारं विसरून — "

" आणि बायकोहि !" मध्येच रंगराव म्हणाले

" हो, आणि बायकोहि विसरून, रात्रीच्या रात्री ब्रिज खेळत क्लबांत बसणारा मोहन—तो कधी क्लब सोडील असं नव्हतं वाटलं मला !" मी म्हणालों.

" हं कोणालाच कल्पना नव्हती ती !" रंगराव म्हणाले. " बायकोनं भरला असेल दम बहुतेक !"

" बायकोच्या दमाला भीक घालतोय् तो !" मी म्हणालों. " किती तरी वेळां मंजूवहिनींनी माझ्यादेखत खरडपट्टी काढलीय् त्याची."

" हं. तेंहि खरंच. माझ्याकडेहि वहिनींनीहि तक्रार आणली होती," रंगराव म्हणाले, " पण मोहन अशा बाबतींत कुणालाच दाद देत नव्हता."

" मग काय करतो मोहन आता संध्याकाळचा ?"

" घरींच बसतो, वाचत नाहीतर रेडिओ लावत !"

" बाकी हा मोठाच चमत्कार झाला ! नाही ?"

" अगदीच मोठा चमत्कार !" रंगराव कोट चढवीत म्हणाले, " डॉक्टर, जरा बसा हं. मी आत्ता बाहेर जाऊन येतों."

" मग मी इथं बसून काय करूं ? मीहि जातों." मी म्हणालों.

" बसाहो." रंगराव आग्रहाच्या स्वरांत म्हणाले. " कांही काम नाही ना ?"

" काम तसं नाही – "

" मग बसा तर, हा मी आता आलोंच. बसूं थोडावेळ गप्पा मारीत नाही तर जाऊं मग क्लबांत. हो. ही घ्या एक नवी कादंबरी. प्रथितयश लेखकाची आहे ती."

एवढं म्हणून त्यांनी एक पुस्तक माझ्या हातांत ठेवलं आणि ते घाईघाईनं बाहेर पडले. मुंबईच्या एका विशिष्ट कंपूतील 'प्रथितयश' टीकाकारांनी आणि इंग्रजी टीकाशास्त्रावरील पुस्तकांची पोपटपंची करणाऱ्या 'प्रथितयश' प्राध्यापकांनी वर्तमानपत्रांतून आणि मासिकांतून स्तंभच्यास्तंभ त्या नेत्र-दीपक कादंबरीच्या स्तुतीनं भरून काढले होते. ती कादंबरी अशी अनपेक्षित-पणें माझ्या हातांत आल्यावर मला आनंद वाटणं साहजिकच होतं. मी आरामखुर्चींत रेलून बसलों आणि ती कादंबरी वाचूं लागलों.

दोनतीन पानं मीं कशीबशीं वाचलीं. मग हळूहळू पापण्यांवर मणामणाचं ओझं ठेवल्याचा मला भास होऊं लागला. माझे डोळे उघडे ठेवणं मला महत्प्रयासाचं वाटूं लागलं. मीं एक मोठी जांभई दिली आणि पुस्तक मिटून समोर पहात बसून राहिलों.

समोर रंगरावांचा रेडिओ होता आणि त्याच्यावर त्यांची ती 'गैशा' होती.

तांबड्या रंगाचा पायघोळ फरॉक घातलेली, पाठीशीं उशी बांधलेली, चपट्या नाकाची पण हसऱ्या मुद्रेची, कांहीतरी विशिष्ट आकर्षण असणारी अशी ती बाहुली होती. म्हणजे प्रथम पाहाणाऱ्याला ती शोभेची बाहुली असावी असा भास होई. पण ती बाहुली नसून विजेरी होती. गेल्या लढाईत रंगराव जपानांत असतांना एका गैशानं ती आपणाला भेट म्हणून दिल्याचं

रंगराव मोठ्या ऐटींत सांगत. तिच्या पाठीच्या पिशवीवरील एक बटन दाबलं की तिचे डोळे एकदम चमकूं लागत आणि तिच्या डोक्यावरच्या हॅटमधून सर्वसामान्य विजेरीप्रमाणं प्रकाश पडे. कुणीतरी कुशल आणि कल्पक जपानी कारागिरानं ती एका सरदाराकरता खास बनवली होती. त्या सरदारानं ती त्या गैशाला प्रेमानं दिली होती. आणि अखेरीस टोकियोंतल्या त्या गैशानं रंगरावांना ती प्रेमाची भेट म्हणून दिली होती, असा रंगराव तिचा इतिहास सांगत. रंगराव तिला थट्टेनं 'माझी गैशा' म्हणत व आमच्यांतहि ती 'रंगरावांची गैशा' म्हणून ओळखली जात असे.

"काय कंटाळवाणी कादंबरी आहे बुवा!" कादंबरी मिटून ठेवता ठेवता मी स्वतःशींच उद्गारलों. त्या गैशावर माझी नजर थोडा वेळ स्थिर झाली आणि मग मीं डोळे मिटले.

"मग मी सांगूं का तुम्हांला एक गोष्ट?" कुठून तरी माझ्या कानांवर एक कोमल स्वर येऊन पडला आणि मी डोळे उघडून पाहूं लागलों.

रंगराव तर विधुर होते. मग हा कोणाचा आवाज असावा? रंगरावांचं एखादं पात्र तर त्यांच्याकडे आलेलं नसेल? रंगरावांची त्या बाबतींत मोठीच ख्याती होती! ते स्वतःहि आपल्या फटकळ स्वभावाला अनुसरून आपले हे 'पराक्रम' मोकळेपणानं सांगत. आणि म्हणूनच ते त्यांच्या मित्र-मंडळींत प्रिय असले तरी माजघराचा उंबरठा त्यांना कोणी ओलांडूं देत नसे. मीं आजूबाजूला पाहिलं; पण एखादी स्त्री तर काय, चिटपाखरूं-देखील मला कुठे दिसलं नाही. मला वाटलं कदाचित् मला भास झाला असावा. त्या प्रथितयश लेखकानं लिहिलेल्या 'अत्यंत' परिणामकारक कादंबरीचा परिणाम अजूनहि माझ्या मनावर कायम होता. माझ्या पापण्या हळूहळू खाली येऊं लागल्या. एवढ्यांत पुन्हां तेच शब्द माझ्या कानांवर येऊन पडले, "मी सांगूं का तुम्हाला एक गोष्ट? गमतीची आहे ती आणि कदाचित् मोहननं क्लब कां सोडला, ह्याचाहि उलगडा होईल ती तुम्हांला गोष्ट ऐकून."

आवाजाच्या दिशेनं मीं पाहिलं. तो आवाज रेडिओच्या दिशेनं येत होता. प्रथम मला वाटलं, रेडियोवरच कुणीतरी बोलतंय्. पण रेडियोचं बटन तर बंद होतं. पाहतां पाहतां माझी दृष्टि रेडिओवरच्या गैशाकडे गेली.

" होय, मीच बोलतेंय्. " माझी दृष्टि तिच्यावर पडतांच हसून ती गैशा म्हणाली, " तुम्हांला कंटाळा आला असेल तर माझा एक अनुभव सांगतें मी तुम्हांला. "

" सांग तर. " ह्या गैशाला बोलतांहि येतं, ह्याचं मनांतल्या मनांत आश्चर्य करीत मी म्हणालों. " ऐका तर " ती म्हणाली, आणि तिनं गोष्ट सांगावयास सुरवात केली: –

रंगरावांच्या तावडींत मी सापडल्यापासून मला बरीच ' नाईट ड्युटी ' करावी लागते. त्यांच्या बरोबर रोज मला रात्रीचं क्लबांत जावंच लागतं– हो, तुम्हीं मला पुष्कळ वेळा पाहिलेलं आहे क्लबांत–पण पुष्कळदा मला रंगरावांबरोबर अंधाऱ्या गल्ल्याबोळांतून आणि जिन्यावरून जावं लागतं. किती तरी सुखी संसार रंगरावांनी मोडले आहेत आणि त्यांच्या ह्या कामांत माझी त्यांना अनिच्छेनं का होईना मदत झाली आहे. तरी पण एका घडी बिघडलेल्या संसाराची – मोहन आणि मंजूच्या संसाराची–घडी पुन्हा नीट बसवून देण्याचं कार्यहि – अजाणतेपणानं का होईना – माझ्या हातून झालं असावं असं मला वाटतं आणि त्याचा मला आनंदहि होत आहे.

साधारण आठदहा दिवसांपूर्वीची गोष्ट. दुपारची मी स्वस्थ झोप घेत उभी होतें. रंगराव एक पुस्तक वाचत बसले होते. पुस्तक वाचतां वाचतां झोप येऊं लागली की मग तेहि रात्रीच्या जागरणाची भरपाई करण्याकरितां खाटेवर जाऊन पडत. पण अजून त्यांना झोप आली नसावी. तुमच्या मांडी-वर पडलेली ही प्रथितयश लेखकाची ' मनोविश्लेषणात्मक, नेत्रदीपक आणि परिणामकारक ' कादंबरी तेव्हां रंगरावांनी आणलेली नव्हती–हीःहीःहीः !

माझा जरासा कुठं डोळा लागला असेल, येवढयांत एका बाईच्या आवा-जानं मी जागी झालें. पहातें तो वीसबावीस वर्षांची एक सुंदर तरुणी रंग-रावांच्या समोर उभी होती; आणि "या मंजूवहिनी, आज भलत्याच वेळेस ?– आणि मोहनराव कुठं आहेत ? अरे हो– ऑफिसांत गेले अस-तील नाही का ? बसा बसा–" असं म्हणत रंगराव तिचं स्वागत करीत होते.

अत्यंत शालीनतेनं मंजूवहिनी एका खुर्चीवर बसली. तिचा चेहरा सुंदर असला तरी तजेलदार दिसत नव्हता. कुठल्यातरी दुःखानं आंतल्या आंत ती कुढत असावी. ती रंगरावांकडे आली होती; पण त्यांच्या दृष्टीला

दृष्टि मात्र ती कधीच भिडवीत नव्हती. ती खाली मान घालून रंगरावांना म्हणाली,

"माझं एक काम आहे तुमच्याकडे, कराल का ?"

"वा वहिनी ! हें काय विचारणं झालं !" रंगराव म्हणाले "तुमचें कुठलंहि काम – अर्थात् मला करतां येण्यासारखं असल्यास– मी मोठ्या आनंदानं करीन !"

इथं मला एक गोष्ट सांगितली पाहिजे, नाहीतर तुमच्या मनांत भलत्याच कल्पना येतील. रंगराव कितीहि चंगीभंगी असले, तरी त्यांनी ज्यांना मित्र म्हटलें आहे, त्यांच्या बायकांशीं त्यांनी कधीहि फाजीलपणाचं वर्तन केलेलं नाही. तुम्ही मित्र जरी ह्या बाबतींत त्यांना भिऊन असला तरी तुमची ती भीति अगदीच निराधार आहे. तुम्हीं तुमच्या बायकांना रंगरावां-बरोबर अगदी खुशाल मध्यरात्रीदेखील एकटं पाठवावं अगदी भाऊ करील तशी जपणूक रंगराव तुमच्या बायकांची करतील. मित्रांच्या घरीं कधी फाजीलपणा करायचा नाही, हें तत्त्व त्यांनी एकदा ठरवून टाकलं आहे, आणि त्या तत्त्वाचं पालन ते अगदी कांटेकोरपणें करीत आले आहेत.– हो, कुठपर्यंत आलें होतें मी ?– हो. रंगराव म्हणाले, "मंजवहिनी, हें काय विचारणं झालं ? तुमचं कुठलंहि काम– अर्थात् मला करतां येण्यासारखं असल्यास– मी मोठ्या आनंदानं करीन !"

ह्यावर मंजूवहिनी एकदम कांही बोलली नाही. थोडंसं अडखळत अड-खळत मग ती म्हणाली, "इकडे ब्रिजचं फारच वेड लागलंय्. तुमच्या नादानं ते रात्रीं ब्रिज खेळत असतात क्लबांत."

"हं, खरं आहे !" रंगराव म्हणाले.

"त्यांची तुम्ही जरा कानउघाडणी करा." मंजूवहिनी आपल्या बोलण्याचा रंगरावावर काय परिणाम झाला आहे, हें पाहाण्याकरितां डोळे किंचित् वर करून म्हणाली.

"वा ! छान ! वहिनी, त्यापेक्षा असं सरळ सांगा ना, की तुम्ही माझी कानउघाडणी करण्याकरितां आला आहांत म्हणून !" दिलखुलासपणानं कौतुकाच्या स्वरांत रंगराव म्हणाले, "बोला, काढा आतां आमची खरडपट्टी !"

रंगरावांनी आपल्या मनांतला हेतु अचूक हेरलेला पाहून मंजूवहिनी खजील झाली. गोंधळून ती म्हणाली, "नाही तसं नाही. पण तुम्ही त्यांना जरा समजावून सांगावं. घरीं मी आणि बेबी एकटीच असते. हे असतात तुमच्यावरोबर क्लबांत पत्ते कुटत. पण इकडे बेबी झोपीं गेली की, सारी रात्र मला कशी खायला उठते ! अन् शिवाय अशीं सारखीं रात्रीचीं जागरणं प्रकृतीला तरी बरी का ? पुष्कळदा ते रात्रीं फार उशिरा येतात अन् मग थंड झालेलं अन्न खातात. कधी कधी तर रात्रीचं जेवणहि चुकतं त्यांचं. रंगूभावोजी, तुम्ही पुष्कळ देश फिरला आहांत, चांगले समजूतदार आहांत." आपला विनय कायम ठेवून वहिनी म्हणाली, "इकडच्या ह्या वेडामुळं आमच्या संसारांत किती कडवटपणा आला आहे ह्याची तुम्हांला कल्पना येईलच. तुम्ही त्यांना खेळायला घेत जाऊं नका. नाहीतर तुम्हीहि घरीं लवकर येत जा."

रंगराव स्तब्ध बसून राहिले होते. त्यांच्या मनांत त्या वेळीं काय विचार चालले होते, हें अचूकपणें सांगायला मी कांही त्या पुस्तकाच्या लेखकासारखी " प्रथितयश ' कादंवरीकार नाही. तरीपण रंगराव मनांत काय विचार करीत असतील, ह्याविषयीचा माझा तर्क सांगतें. ते बहुधा मनांतल्या मनांत म्हणत असतील, "आपल्या नवऱ्याला आपणच सांभाळावं, तिथं आम्ही काय करणार ? " पण मग ते मोठ्यानं म्हणाले, " खरं आहे. सांगेन मी त्यांना. किंवा जमलं तर आम्हीच लवकर घरीं येत जाऊं ! "

" तुम्ही काय सडेफटिंग ! पण इतरांना संसार आहेत. कांही तरी करा, नाहीतर क्लबाच्या प्रेसिडेंटकडे मला ह्याविषयी तक्रार करावी लागेल ! " वहिनीनं धमकी दिली.

रंगराव थोडेसे चपापले. मग ते म्हणाले, " बरं वहिनी, चहा घेता कां थोडा ? येवढया उन्हांत आल्या ? "

" नको. जातें मी आता ! " वहिनी म्हणाली.

" वा ! मग मोहनराव काय म्हणतील आम्हाला ! म्हणतील की मंजूवहिनींना चहासुद्धा न देतां पाठवलं तुम्ही घरीं ? हो, आता आमच्या चहाला तुमच्या हातच्या चहाची लज्जत यायची नाही हें खरं. नाहीतर जपानला चहा कसा करतात तें दाखवूं का तुम्हाला ? मी टोकियोंत असतांना मला एका गैशानं शिकवली आहे जपानी चहाची पद्धत. "

" गैशा म्हणजे काय ? "

" त्या जपानांतल्या नर्तकी असतात; पण त्या शिकल्यासवरलेल्या असतात. हो—ही पहा एक गैशा ! " असं म्हणून रंगरावांनी माझ्याकडे बोट दाखवलं.

मंजूवहिनीनं माझ्याकडे कौतुकानं पाहिलं आणि ती उद्गारली, " वा ! किती सुंदर आहे ही बाहुली ! "

" ह्यँऽह्यँऽह्यँऽ ! " रंगराव मनापासून हसले. मला बाहुली समजून कुणी फसलं की त्यांना फार गंमत वाटे त्यांचं तें हसणं ऐकून गोंधळांत पडलेल्या वहिनीला ते म्हणाले, " घ्या पाहूं जरा ती गैशा हातांत. "

मंजूवहिनी माझ्याजवळ आली. तिच्या रेशमासारख्या मऊ हातांचा मला स्पर्श झाला. तिनं मला उलटीसुलटी करून माझं निरीक्षण केलं.

" तिच्या पाठीवरच्या पिशवीवर एक छोटंसं बटन आहेना—हं तेंच. " रंगराव म्हणाले, " तें दाबा पाहूं जरा. "

मंजूवहिनीनं बटन दावलं. त्याबरोबर माझे डोळे चमकूं लागले आणि माझ्या हॅटमधून प्रकाशाचा झोत बाहेर आला. तें पाहून वहिनी उद्गारली " अग बाई ! ही तर बॅटरी आहे ! "

नंतर रंगराव चहा करण्याकरिता आंत गेले. मंजूवहिनी एका खुर्चीवर अस्वस्थपणानं बसून होती. रंगरावांच्या घरीं अधिक वेळ बसणं प्रशस्त वाटत नसावं तिला. मधूनमधून तिचे ते काळेभोर डोळे माझ्यावर स्थिरावत. ती जरासं उठल्यासारखं करी आणि मग पुन्हा खुर्चीवर बसे.

रंगराव आंतल्या खोलींत जपानी चहा बनवीत होते. स्टोव्हचा आवाज बाहेर ऐकूं येत होता. मधूनच एखाद्या वेळीं हवेच्या लाटेवर वहात आलेला चहाचा सुगंध मला सुखवत होता. इतक्यांत वहिनी आपल्या जागेवरची उठली. तिनं कावऱ्याबावऱ्या नजरेनं आजूबाजूला पाहिलं आणि मग झटकन उचलून तिनं मला आपल्या छोट्या पर्समध्यें बंदिवान करून टाकलं.

मंजूवहिनीसारख्या सभ्य, कुलीन आणि सच्छील दिसणाऱ्या स्त्रीनं अशी चोरी करावी, ह्याचं मला आश्चर्य वाटलं.

थोड्या वेळानं रंगरावांनी बनविलेला जपानी चहा पिऊन झाल्यावर

वहिनीनं रंगरावांचा निरोप घेतला आणि तिच्या पर्सच्या अंधाऱ्या कोठडीं-तून माझाहि प्रवास सुरू झाला.

" तुम्हाला कंटाळा तर नाही ना आला माझ्या गोष्टीचा ? हो. मी कांही त्या लेखकासारखी ' प्रथितयश ' नाही ! " ती रंगरावांची गैशा मिस्किलपणानं मला म्हणाली, " मनोविश्लेषण वगैरे मला कांही कळत नाही, म्हणून विचारतें. "

" छे छे ! मला मुळीच कंटाळा आला नाही. उलट, पुढं काय झालं हें जाणण्याबद्दल मला फारच उत्सुकता वाटूं लागली आहे. " मी म्हणालों, " आता उगाच विषयांतर न करतां आपली गोष्ट पुढं चालू कर पाहूं. रंग-राव परत येण्याच्या आंत पुरी केली पाहिजे गोष्ट. हो. आणि मनोविश्ले-षण मात्र करूं नकोस ! "

माझं हें बोलणं ऐकून त्या गैशाला आनंद वाटलेला दिसला आणि विशेषच उत्साहानं तिनं आपली गोष्ट पुढे चालू केली :

मंजूवहिनीनं घरीं गेल्यावर आपली पर्स एका खुटीला टांगून ठेवली आणि ती स्वेटर विणत बसली.

पर्सच्या अंधारकोठडींत बसल्या बसल्या, मला तिनं कां आणलं असावं, ह्याविषयी मी आश्चर्य करीत होतें. त्याचप्रमाणें माझ्या अभावीं आज रात्रीं रंगरावांची किती अडचण होईल, ह्या विचारानं मला गंमतहि वाटत होती.

साडेपांचच्या सुमाराला बेबी शाळेंतून आली आणि थोड्याच वेळांत तिचे " बाबा आले, बाबा आले " हे शब्द माझ्या कानावर पडले. स्वयं-पाकघरांत त्याच सुमाराला स्टोव्ह पेटला होता. मला आणल्याचं मंजू-वहिनी मोहनरावांना सांगते की काय, हें पाहण्याच्या दृष्टीनं मी कान टवका-रून बसलें. पण नवराबायकोंत संभाषण असं फारसं होतंच नव्हतं. जें होई तें एकतर्फी असे. मोहनराव मंजूवहिनीला कांहीतरी सांगत किंवा कांही प्रश्न विचारीत. पण मंजूवहिनी तोंडांतून ब्रदेखील काढीत नसे.

साडेसहा–साताच्या सुमाराला मोहनरावांचे शब्द मला ऐकूं आले, " मी जातों ग क्लबांत." अर्थात् मंजूवहिनीनं कांहीच उत्तर दिलं नाही.

मोहनरावांनी जिना उतरल्याचा आवाज आला आणि त्याच्या पाठोपाठ मंजूवहिनीचा एक सुस्कारा माझ्या कानावर आला.

जिन्यावरचा मोहनरावांचा पावलांचा आवाज संपला आणि मंजूवहिनीनं बेबीला सांगितलं, "त्यांना सांग–उद्या सकाळीं या" मंजूवहिनीच्या आवांजात उपरोध आणि चीड होती. बेबी दुडूदुडू खिडकीशीं धावत गेली आणि तिथून ती ओरडली, "बाबा. बाबा, आता उद्या सकाळीं या ! —"

रात्र पडल्यावर मंजूवहिनीनं बेबीला भरवलं, आपणहि जेवली आणि तिला झोपवलं. मग थोडा वेळ तिनं रेडियो लावला. रेडियोवर सिनेमांतली छान छान गाणीं लावलीं होतीं. पण मध्येच मंजवहिनीनं रेडियो बंद केला आणि ती बिछान्यावर जाऊन पडली.

तिनं बेडस्विच दाबून दिवा काढला. पण किती तरी वेळ झाला ती ह्या कुशीवरची त्या कुशीवर होत होती. एकदोनदा तर तिचे हुंदके ऐकल्याचा देखील मला भास झाला. थोड्या वेळानं तिनं बेडस्विच दाबूनं पुन्हा दिवा लावला. मी असलेली पर्स खुटीवरून काढून घेतली. तिच्यांतून मला काढलं थोडा वेळ माझ्याकडे तिनं कौतुकानं पाहिलं. मलाहि तिच्याविषयीं सहानुभूति वाटूं लागली होती आणि तिची थोडीफार सेवा करण्याकरिता मी उत्सुक होतें. पण तिनं माझ्या पाठीवरचं बटन दावलं नाही. मला तिनं एका खुर्चीवर टाकून दिलं.

नगरपालिकेच्या मनोऱ्यावरच्या घड्याळाचे ठोके दर तासाला ऐकूं येत होते. मोहनराव अजून आले नव्हते. मंजूवहिनी झोपीं गेली होती· पण झोपेंत मध्येच ती जी कण्हे त्यावरून तिला गाढ झोप लागलेली नसावी हें उघड होतं

दोनाचे ठोके पडले, अडीचहि होऊन गेले. सिनेमांची गर्दी रस्त्यावरून कधीच ओसरली होती आणि सर्वत्र शुकशुकाट झाला होता. तीनाचे ठोके पडले आणि खिडकीशीं हाका ऐकूं येऊं लागल्या, "बेबी, ए बेबी, दार उघड."

मंजूवहिनी हाकांनी जागी झाली होती. पण तिनं दिवा लावला नाही, की दार उघडण्यास ती पटकन् उठलीहि नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, ...
अनुक्रमांक ..२८३२६.. दि: ......
क्रमांक



अखेरीस बाहेर पंधरा वीस मिनिटं मोहनरावांना कोकलत ठेवून झाल्यावर मंजूवहिनीनं दिवा लावून दार उघडलं.

मोहनराव आले ते रागांतच होते. ते म्हणाले, " लवकर दार उघडायला काय झालं होतं ? किती हाका मारल्या मीं ! "

" होय ! " मंजूवहिनी हसून म्हणाली. " मीं तर आताच ऐकली तुमची हाक."

काय असेल तें असो, मंजूवहिनीचा घुस्सा आता नाहीसा झाला होता आणि ती आता हसतमुख होती.

मोहनरावांनी हातपाय धुतले. स्वतःच जेवून घेतलं आणि आपल्या खाटेवर येऊन झोपी गेले.

सकाळ झाली तरी मी तशीच खुर्चीवर पडून होतें. सकाळीं मी बेबीच्या तावडींत सापडलें. मोहनराव अजूनहि घोरतच होते. थोड्या वेळानं ते जागे झाले. बेबी त्यांना आपणांला सापडलेली बाहुली उड्या मारीत दाखवूं लागली.

" अरेच्या ! ही तर रंगरावांची गैशा ! " मला पाहून मोहनरावांच्या तोंडून शब्द बाहेर पडले. मग त्यांनी बेबीला विचारलं, " कुठून आणलीस ग ही बावली तूं ? "

" इथं सापडली मला—त्या खुर्चीवर ! " बेबी उड्या मारीत म्हणाली.

" विसरून गेले वाटतं रंगराव ! आता पार्टी काढूं हं आपण त्यांच्याकडून ! " आनंदानें मोहनराव म्हणाले. पण मग एकदम त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद मावळला. ते एकदम विचारमग्न दिसूं लागले. लवकर लवकर आंत जाऊन त्यांनी मंजूवहिनीला विचारलं.

" काग ? ही रंगरावांची विजेरी इथं कशी आली ? "

" रंगरावांची विजेरी ! " आश्चर्य दाखवून मंजूवहिनी म्हणाली. तिचा तो आश्चर्याचा धडधडीत अभिनय होता आणि मोहनरावांच्यादेखील तें लक्षांत आलं. मग जरा अडखळत मंजूवहिनी म्हणाली " कशी आली कोण जाणे ! "

" त्या खुर्चीत होती म्हणे—बेबीला सापडली. " मंजूवहिनीच्या चेहेऱ्याकडे आपली नजर रोखून मोहनराव म्हणाले.

" हो. आज सकाळीं मींहि पाहिली होती ती खुर्चीत. " मग एकदम एखाद्या अवघड प्रश्नाचं उत्तर सुटल्यासारखं करून मंजूवहिनी म्हणाली–

" हं. आत्ता आलं ध्यानांत, ही विजेरी इथं कशी आली ती ! "

" कशी ? " मोहनरावांनी उत्सुकतेनं विचारलं, " रात्रीं क्लबांतून येतांना तुम्हीच आणली असेल ! खूप अंधार असतोना तुम्हीं येतांना. "

" पण मीं आणली असती तर ही विजेरी इथं कशी आली म्हणून मीं विचारलं असतं कशाला ? " मोहनरावांचा स्वर चिडीचा होता. " शिवाय काल रंगराव क्लबांतहि आले नव्हते. "

" मग कशी आली रंगरावांची गैशा इथं कोण जाणे ! "

गैशा ! हा शब्द मंजूवहिनीच्या तोंडून ऐकताच मोहनराव एकदम चमकले. त्यांचा चेहरा विचारमग्न, अस्वस्थ दिसू लागला.

मोहनरावांनी निरनिराळ्या प्रकारांनी प्रयत्न करून पाहिला. पण त्यांना कांहीच पत्ता लागला नाही. त्यानंतर त्यांनी आपले सर्व कार्यक्रम मनाच्या उद्विग्न अवस्थेंतच उरकले. त्यांना धड जेवण गेलं नाही. त्यांचा चेहेरा उतरून गेला होता. कधी ते मंजूवहिनीकडे रागाने पहात, कधी केविलवाणेपणानं. ज्या वेळीं ते ऑफिसांत गेले तेव्हा तर त्यांचा उदास चेहेरा पाहवत नव्हता.

बेबीहि शाळेंत गेली होती. मंजूवहिनीनं मला पुन्हा पर्समध्यें घातलं आणि ती मला इथं घेऊन आली.

" ओहो हो! या वहिनी. या, बसा. " रंगरावांनी तिचं स्वागत केलं आणि ते लवकर लवकर बोलूं लागले, " काल मला मोहनराव भेटले नाहीत–नाही-तर त्यांना मीं सारं समजावून सांगितलं असतं... "

" त्याकरता नाही आलें मी. "

" मग ? "

" ही तुमची गैशा परत आणली आहे. " असं म्हणून मंजूवहिनीनं मला बाहेर काढून रेडियोवर ठेवलं.

" ओ ! " रंगराव आश्चर्यानं म्हणाले, " म्हणजे तुमच्याकडे कशी आली ती ? "

" मला क्षमा करा. काल जातांना मी ती घेऊन गेलें होतें बेबीला दाखवायला. तिला बाहुल्या फार आवडतात ! "

" छे छे ! त्यांत क्षमा कसली आली ! पण ह्या माझ्या गैशेची सोबत नसल्यामुळें मी काल क्लबांतहि गेलों नाही. "

" तुम्हाला त्रास झाला. बरं, मी जातें आता. "

" थोडा चहा घ्याना—जपानी. "

" नको, मला काम आहे ! "

" बरं तर. हो. आज मोहनरावांना सांगेन मी. "

रंगराव बोलत असतांनाच मंजूवहिनी घराबाहेर पडली होती.

झाली माझी गोष्ट. पुढं काय घडलं......

बोलतां बोलतां एकदम थांबून ती रंगरावांची गैशा म्हणाली, " अगबाई ! आले वाटतं ते ! " आणि एकदम गप्प झाली.

रंगरावांनी दणदण पाय आपटीतच खोलींत प्रवेश केला. त्या आवाजानं मी भानावर आलों. कोटटोपी काढून ठेवतां ठेवतां ते म्हणाले, " ही दुनिया म्हणजे अजब आहे ! "

" कां बुवा ? " मी विचारलं.

" काय चक्कर लोक भरलेत ह्या जगांत ? आपला मोहन रस्त्यांत भेटला होता. त्याला मीं आपलं सहज म्हटलं, ' काय मोहनराव, क्लबांत नाही येत अलीकडे ? तुम्ही क्लबांत आल्याशिवाय मजा नाही ! ' मीं एवढं म्हटलं मात्र, तो जो एकदम चिडला आणि अद्वातद्वा बोलूं लागला, ' मजा ! हो ! मी क्लबांत रात्रीचा बसलों की तुम्हांला मजा मारायला ठीक पडतं. नीच ! हलकट! पाजी इसमा, तुला काय वाटतं, तुझ्या मित्रांच्या बायका म्हणजे काय जपानी गैशा आहेत ? खून पाडीन खून; परत कधीं मंजूशीं चावटपणा केलास तर ! " रंगराव खिन्नपणानं हसून म्हणाले, " आणि मी तर मित्रांच्या बायकांशीं किती आदरानं आणि सभ्यपणानं वागतों हें सर्वांना ठाऊकच आहे ! "

• • •

६

# नवकथाकाराची हॅट

[श्री. वर्टींची ही गाजलेली कथा म्हणजे प्रच्छन्नपणें नवकथेवर केलेली टीका आहे. आजच्या नवकथेचें भ्रष्ट अनुकरण करणाऱ्यांच्या-वर ही टीका आहे. त्या नवकथाकाराची हॅट जशी उंचावरून पाण्यांत पडून वाहून गेली तसें कांहीसें नवकथेबद्दल वर्टी मार्मिकतेने सूचित करतात. ]

* * *

वसंताच्या वागणुकीचा आम्हांला अर्थंच कळेना.

वसंताला मी लहानपणापासून ओळखत होतों. वसंता हा एक सुशील, सद्‌गुणी, विचारशील आणि घुम्या स्वभावाचा तरुण म्हणून आम्हां सर्व मित्रमंडळींत ओळखला जात होता. कधी कोणाच्या अध्यांत ना मध्यांत. कधी कोणाला तो कटु शब्द बोलत नसे. शिवीगाळ, एखादा असभ्य शब्द त्याच्या तोंडांतून कधी चुकूनहि निसटत नसे. स्त्रियांकडे त्याने कधी वर दृष्टि करून पाहिलें नव्हतें. कोठलीहि स्त्री–अर्थात् त्याला ओळखणारी–त्याच्या सहवासांत बिनधोकपणें वावरत असे. अशा ह्या आमच्या वसंताचें त्या दिवसाचें तें विचित्र वर्तन पाहून आम्ही दिङ्मूढ होऊन गेल्यास नवल नव्हतें.

वसंता, मी, प्रभाकर व त्याची बहीण शालन असे आम्ही चौघे सुरुंग-वाडीला सहलीला गेलों होतों. सुरुंगवाडी हें कांही तसें विशेषसें प्रख्यात स्थळ नाही. परंतु त्याच्याजवळच एक साधारण मोठासा धबधबा आहे. तो पाहण्याकरितां थोडेफार हौशी लोक मधून मधून येत असतात. अर्थात् गोकाकचा किंवा गिरसप्पाचा धबधबा ज्यांनी पाहिलेला आहे, त्यांना सुरुंग-

वाडीच्या धबधब्यांत विशेषसें पाहण्यासारखें कांहीच नाही. सुरुंगवाडीचा धबधबा पाहण्यास आम्ही जे गेलों त्यांत तेथील धबधबा पाहण्याच्या इच्छेपेक्षा आमचे इतरच उद्देश अधिक प्रभावी होते. आम्हांला दोनच दिवसांची रजा होती. येवढ्या अवधींत आम्हांला अधिक लांबची सफर काढणें शक्य नव्हतें. सुरुंगवाडीला माझा आतेभाऊ डॉक्टर होता. त्याच्याकडे राहण्याची व जेवण्याखाण्याची उत्तमपैकी सोय होण्यासारखी होती. दोन दिवस जरा हवाफेर व नेहमीच्या दगदगींतून विश्रांति येवढाच आमचा ही 'ट्रिप' काढण्यांत उद्देश होता.

शालनचा मी दूरचा भाऊ होतों. प्रभाकर तर तिचा सख्खाच भाऊ होता. वसंतलाहि ती ओळखत होती. त्याचें सभ्य, सुसंस्कृत वागणें तिच्या चांगलेंच परिचयाचें होतें. त्यामुळे आम्हां तिघां पुरुषांबरोबर ट्रिपला येण्यांत तिला संकोच वाटण्याचें कांहीच कारण नव्हतें.

सुरुंगवाडीपर्यंतचा आगगाडी नि बसचा पांच-सहा तासांचा प्रवास आम्हीं चांगलाच हसतखेळत केला, आणि संध्याकाळच्या सुमारास आम्ही सुरुंगवाडीला डॉक्टरांच्या घरीं जाऊन पोहोचलों. अर्थात् अवखळपणा करण्याचा मक्ता प्रभाकरकडेच होता. मी आणि शालनहि अधूनमधून विनोद करीत असूं. वसंता मात्र क्वचितच एखादा शब्द बोले. आमच्या थट्टामस्करीवर तो किंचित् हसे, तेंहि क्वचितच. तो स्वतः जरी बोलत नसला आणि फारसा हसत नसला तरी प्रवासाची मौज आमच्याइतक्याच हौशीने तोहि लुटीत होता, हें मात्र स्पष्ट दिसत होतें.

रात्रीचा मुक्काम आम्ही डॉक्टरांकडेच केला. प्रवासाचा शीण झालेला असल्यामुळे आणि सकाळीं लवकर उठून धबधबा पहावयास जावयाचें असल्यामुळें आम्ही रात्रीं लवकरच झोपीं गेलों. आम्ही जो धबधबा पहावयास जाणार होतों त्याचें नांव जरी 'सुरुंगवाडीचा धबधबा' असें असलें तरी तो सुरुंगवाडीपासून चांगलाच आठदहा मैल लांब आहे. तेथे जाण्याकरतां चांगलासा रस्ताहि नाही. तेव्हां उन्हाचा विशेषसा त्रास होऊं नये म्हणून भल्या पहाटेस निघणेंच अधिक सोयीस्कर होतें.

दुसऱ्या दिवशीं पहाटे आम्ही चारालाच उठलों. सुरुंगवाडीला वीज नव्हती. एक मिणमिणती चिमणी लावून आम्ही आमचे कार्यक्रम उरकून

घेत होतों. शहरी जीवनांतून खेड्यांतील स्वच्छ, शांत, निर्मळ वातावरणांत आल्यामुळे आणि सारा दिवस स्वच्छंदाने घालावयाचा आहे या कल्पने-मुळे आम्हां सर्वांना उत्साह वाटत होता. त्या उत्साहाच्या भरात प्रभाकरने भिंतीवर विजेचें बटन दाबल्यासारखें करून, " अरेच्या ! वीज गेली वाटतं ! " म्हणून विनोद केलाच, व आम्हीहि त्याच्या ह्या पोरकट विनोदाला पोरकटपणानं पोट धरून हसलों. वसंताच्या तोंडावरदेखील एक स्मिताची रेषा उमटलेली आम्हांला दिसून आली.

पाण्याची पिशवी, कॅमेरे, जेवणाचा डबा वगैरे सर्व सामुग्री घेऊन आम्ही धबधब्याकडे निघण्याकरितां सज्ज झालों. तेवढ्यांत आमच्या गडबडीने डॉक्टरहि जागे झाले होते, ते आमच्याकडे येऊन म्हणाले, " दुपारचं ऊन मोठं कडक पडतं, तरी छत्र्या, हॅटी वगैरे घेऊन जा ! "

" त्याचा सारा बंदोवस्त आम्हीं करून ठेवला आहे ! " मी म्हणालों. सुरुंगवाडीच्या धबधब्याच्या एका सफरीकरितां आफ्रिकेच्या अरण्यांतील यात्रेकरतां करावी तेवढी तयारी करून आम्ही आलेलों होतों.

" वरं तर मंडळी, चहा तयार आहे. चहा घेऊन लवकरच निघा. म्हणजे उन्हाचा त्रास व्हायचा नाही. नाहीतर इथल्या उन्हामुळें सन्स्ट्रोक होण्याची फार भीति असते ! " डॉक्टर म्हणाले.

उन्हाच्या भीतीने शालनने आपली बायकी छत्री आणलेली होती. आम्ही पुरुषांनी हॅटस् आणलेल्या होत्या. वसंता सहसा हॅट वापरीत नसे. ऐन वेळेवर त्याच्या डोक्याला बरोबर बसणारी कोणाची हॅट न मिळाल्यामुळें त्यानं आपली एक जुनीच दोनतीन वर्षांत न वापरलेली हॅट आणली होती. तिचें कापड एकदोन ठिकाणीं फाटलेलें होतें. वरच्या एकदोन पट्ट्या गायब झालेल्या होत्या व तिच्यावर पिवळट रंगाचे नकाशेहि उत्पन्न झालेले होते. " काम चालेल हिच्यावर ! नाही तरी सुरुंगवाडीच्या जंगलांत कोण पाहायला येणार आहे माझी हॅट म्हणा ! " असें किंचित् ओशाळलेल्या स्वरांत म्हणून वसंताने मोठ्या नाईलाजाने ती जुनी हॅट आपल्याबरोबर घेतलेली होती.

डॉक्टरांबरोबर हसत खिदळत आमचा नास्ता झाला. मग आम्ही पुन्हा आमचें सामान असलेल्या खोलींत गेलों. खोलींतील चिमणी विझलेली होती.

अंदाजानेच आम्ही आमचें सामान उचलून घेतलें आणि डॉक्टरांचा निरोप घेऊन बाहेर पडलों.

बाहेरहि अजून किंचित् अंधारच होता. एखाद्या घरांतून जात्याची घर-घर आणि ओव्यांचे शब्द कानांवर येऊन पडत होते. कुठे झोपेंतून जागे झालेल्या बैलांच्या गळ्यांतील घंटांची किणकिण कानावर येऊन पडत होती. सुरुंगवाडीचें खेडें आस्ते आस्ते एका नव्या दिवसाला सुरवात करीत होतें.

थोड्याच वेळांत आम्ही गावांतून बाहेर पडलों. अद्याप सूर्य उगवला-देखील नव्हता, मग ऊनाची गोष्ट कशाला ? तरी वसंता डोक्यावर हॅट घालून चालत होता. त्याची थोडीशी गंमत करावी म्हणून मी त्याच्याजवळ गेलों आणि म्हणालों, " वसंता, भारीच ऊन पडलंय् नाही ? "

" ऊन ? ऊन कसचं आलंय् ? आकाशाचं नाक चोंदलंय् आणि दूर पलीकडे क्षितिज वितळतंय् ! " वसंता उद्गारला. त्याचे हे उद्गार ऐकून आणि त्याच्या डोळ्यांत खेळणारी एक विचित्रच चमक पाहून मी जरा चमकलोंच. पण मला वाटलें, वसंता विनोद करीत असावा. प्रभाकरच्या विनोदाचा संसर्ग त्यालाहि झाला असावा. म्हणून मी त्याच्या ' विनोदा'ला हसलों आणि म्हणालों, " आता काढ की ती हॅट ! निव्वळ शिमग्यांतलं सोंग दिसतोस ! "

" माझ्या मनांत अर्थशून्य वादळें निर्माण होत आहेत ! सुरेल रात्रीच्या स्वप्नांचा हिरवापिवळा द्रव काळी मांजरी चाटीत आहे– " बोलता बोलता वसंताने डोक्यावरची हॅट काढली आणि त्याचें तें वाक्य तेवढ्यांतच तुटलें. त्याचे डोळे पूर्ववत् शांत गंभीर दिसूं लागले. मग आपण क्षणापूर्वी कांही-तरी विचित्र अर्थशून्य बोलत होतों हें जणू विसरूनच, हॅटचें निरीक्षण करीत तो नेहमीच्या स्वरात म्हणाला, " ही हॅट विचित्रच दिसतेय् ! निघतांना डोक्याला घालून पाहिली होती, तेव्हा बरोबर होत होती नि आता पहातों तो डोक्याला जरा घट्टच होते ! एका, रात्रीत ही हॅट एवढी आकुंचन पावावी, ही जरा आश्चर्याचीच गोष्ट आहे ! "

खरें होतें त्याचें म्हणणें. त्याच्या डोक्यावर ती हॅट नुसती वरवर ठेवल्या-

सारखी मघा दिसत होती. जरासादेखील वारा लागला तरी ती त्याच्या डोक्यावरून उडून जाईल असें तिच्याकडे पाहतांना वाटत असें

"कांहीका असेना ! " वसंता म्हणाला, " आजचं भागलं म्हणजे पुरे ! सनस्ट्रोक होण्यापेक्षां असली हॅट वापरलेली बरी ! उद्या घरीं गेल्यावर तुकडे तुकडे करून बंबांत घालून देतों हिला ! " वसंता म्हणाला.

प्रभाकर आणि शालन आमच्या जरा पुढून चालत होते. मी वसंता-बरोबर चालत होतों. आमच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हिरवीगार शेतें होतीं. मधून मधून आम्हांला मोठमोठे वृक्ष लागत. त्या वृक्षांवर पाखरांचा एकच किलबिलाट चालू असे. जणू त्यांच्या नगरपालिकेच्या सभाच चालू होत्या !

थोडा वेळ आम्ही दोघे कांहीं न बोलता चालत होतों. पण माझ्या मनांत मात्र मघा वसंताने उच्चारलेल्या त्या विचित्र वाक्याविषयी कुतूहल उत्पन्न झालें होतें. अखेरीस न राहून मीं विचारलें, " वसंता, मघा तू काय म्हणत होतास ?"

" कुठं काय ?"

" आकाशाचं नाक चोंदलंय्–आणि क्षितिज वितळतय् ! आणि कस-लासा द्रव–"

" छट् ! उगाच कांहीतरी काय आरोप करतोस माझ्यावर ?" वसंता किंचित् आश्चर्याने म्हणाला, " असं कशाला मी बोलेन ? आकाशाला कुठे नाक असतं ? आणि क्षितिज वितळेल कशाला ?"

" तू असं म्हटलंस खरं ! " मी म्हणालों.

" मला तरी कांही आठवत नाही ! " वसंता म्हणाला. तो विषय आम्ही तिथेंच सोडून दिला आणि जरा झपझप चालत प्रभाकर शालनला गाठलं, प्रभाकर तर एखाद्या लहान मुलाप्रमाणें हसत खिदळत होता. मध्येच एखादी गाण्याची लकेर हवेवर सोडून देत होता. बुटांनी रस्त्यावरची ढेकळं दूर उडवून देत होता. आजूबाजूच्या सृष्टिसौंदर्याचें प्राशन करीत शालनहि संतुष्ट वृत्तीने चालत होती.

हास्यविनोदांत वेळ एवढा भरभर जात होता आणि सृष्टिसौंदर्य पाहून निरागस आनंदाचा आम्हांला एवढा कैफ चढलेला होता की, ऊन केव्हा पडलें, आम्ही आमच्या डोक्यांवर आमच्या हॅटस् केव्हा चढवल्या आणि शालनने आपली इवलीशी छत्री केव्हा उघडली, हेंदेखील आम्हांला कळून आलें नाही. आता उष्माहि बराच जाणवूं लागला होता. सकाळच्या थंडीकरता आम्ही स्वेटर्स घेतले होते. ते हळूहळू अंगांतून काढणें आम्हांला भाग पडलें. थोड्याच वेळांत ऊन चांगलें रखरखूं लागलें.

' आकाशातून मेघ लोंबतो आहे ! प्रभाकर हा एक लिवलिवणारा डोंगळा आहे आणि शालन ही एक वळवळणारं कोकरूं आहे ! —मी प्रामाणिकपणानं चालतों आहे. प्रामाणिकपणानं मी कपडें घातले आहेत ! माझी हॅटहि मी प्रामाणिकपणानं डोक्यावर ठेवलेली आहे ! गोठलेल्या भविष्यकाळाचें बर्फ तोंडांत टाकून तुम्ही मिटक्या काय मारता ? मी शूर आहे. मीं प्रामाणिक आहे ! मला भकड भूतकाळाच्या भव्य मिशा ओढायच्या आहेत ! मी नामर्द नाहीं ! ..."

माझ्याबरोबर चाललेला वसंता एकाएकी बोलूं लागला. प्रथम मला वाटलें वसंता कांहीतरी गंमत करीत असावा, म्हणून मी थोडासा हसलोंहि. पण माझें हास्य माझ्या मनांतच जिरून गेलें. वसंताच्या डोळ्यांत मघाची ती विचित्र लकाकी पुन्हां खेळूं लागली होती. त्याच्या तोंडावर कांही विचित्र भाव खेळूं लागले होते. त्या भावांचें मला नीटसें वर्णन करतां यावयाचें नाही. परंतु कोठली तरी वैफल्याची भावना, कसली तरी चीड, कसला तरी कैफ, ह्या साऱ्यांचे विचित्र मिश्रण त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतें. त्याचा चेहरा जरा भयानक दिसत होता. मी किंचित् काळजीच्या स्वरांत त्याला म्हणालों, " वसंता, उगाच कांहीतरी काय बडबडतोस ?"

" ह्या यंत्रयुगाने माणसाला लंबा केला आहे. डाफरून, टवकारून, टरटरां फाडून टाकलें आहे ! हे लिवलिवणारे, कोकलणारे, कुस्करलेले जंतु—" वसंता बोलूं लागला. पण त्याला मध्येच अडवून मी म्हणालों, वसंता, उगाच कांहीतरी काय बडबडतोस ? आपण धबधबा पाहायला निघालों आहोंत ना ? तो बघ तो धबधब्याचा आवाजदेखील ऐकूं येऊं लागला ?"

'आवाज ! –आवाज ! –धबधब्याचा आवाज ! –हिरवा पिवळा –बहिरा पांगळा आवाज–मंजुळ आवाज–शालनचा मंजुळ आवाज ! शालनचे नितंब डुचमळताहेत–मला आव्हान देताहेत–साऱ्या जगाला आव्हान देताहेत ! विजिगीषु वृक्षांनी अर्थपूर्ण मौन धारण केलें आहे आहे आणि मूर्ख डोंगर खदखदा हसत आहेत ! शालनचा झंपर खालपर्यंत आलेला आहे –त्याचा गळा जें दाखवीत आहे आणि जें दिसावें अशी आतुरता निर्माण करीत आहे, आणि जें दिसूं नये म्हणून हालचाल करीत आहे. तिच्या डोळ्यांच्या चोचीची उपडी उघडमीट चालली आहे ! आणि आपलीं उरलीं सुरलीं पिसें तो सापसूफ करीत आहे !"

"वसंता तूं शुद्धीवर आहेस ना ?" मीं किंचित् भेदरलेल्या स्वरांत विचारलें.

"शुद्ध आणि – अशुद्ध ! मी अशुद्ध आहें – सारें जग अशुद्ध आहे. मला माझी भयंकर दया येत आहे. माझ्या आत्म्यांतून ठिबकणाऱ्या लाचार जिव्हाळ्यात सारा मार्ग थिजून गेला आहे ! तो प्रभाकर पंढ आहे ! जगांतले सारे नवरे षंढ आहेत ! ... ..."

वसंताची वटवट चालूच होती. वसंता गंमत करीत नव्हता हें तर निश्चितच ? त्याच्यासारख्या गंभीर प्रवृत्तीचा माणूस इतका वेळ सारखी गंमत करीत राहणें केवळ अशक्य होतें. त्याला काय झालें आहे हेंच मला कळेना. वात झाल्याप्रमाणें तो अर्थशून्य बडबड करीत होता. अचकट विचकट–अश्लील बोलत होता. स्वप्नांतल्याप्रमाणें त्याचें बोलणें असंबद्ध होतें. त्याच्या चेहऱ्यावरील चिडीचा, कडवटपणाचा भाव क्षणाक्षणाला वाढतच चालला होता. त्याच्या डोळ्यांतील चमक क्षणोक्षणीं उग्रतरच होत चाललेली होती.

मी गोंधळून गेलों. काय करावें हें मला कळेना. प्रभाकरला बोलवावें असा विचार मनांत येऊन मी प्रभाकरकडे पाहिलें. याच वेळीं शालनने आपला रुमाल नाकाला लावला होता. त्याबरोबर वसंता म्हणाला, "मला वाटतें तो शालनचा रुमाल व्हावें आणि तिच्या आव्हान देणाऱ्या नाकाशीं झोंबी घ्यावी. रुमाल हा परमेश्वर आहे. मला वाटतें टुवाल व्हावें आणि शालनने

आपला उरोभाग पुसून झाल्यावर त्या टुवालाचा चोळामोळा करून फेकून द्यावें! रुमाल व्हावें, परमेश्वर व्हावें, टुवाल व्हावें आणि हें मादक भर्जरी सुख लुटावें! तिच्या उन्नत अंगप्रत्यंगाकडे नेत्रांनी व वखवखलेल्या नजरेने पाहावें–त्या भुरक्या करड्या रंगाच्या सुखांत डुचमळावें! त्या सुखाने गुदमरावें! ... ..."

" वसंता! वसंता! " मी ओरडलों, " काय झालंय् तुला? असं भलतं सलतं तूं काय गडबडतोस? "

" माझ्या वृत्ति चेकाळून उठल्या आहेत! " वसंताने आपली बडबड चालूच ठेवली, " माझ्या भावनांचा डोंब पेटलेला आहे! माझ्या शरीरांतील कणनकण कोकलतो आहे–विवळतो आहे! माझ्या शरीरांतील प्रत्येक कणाचे हेंच आक्रंदन आहे! हुळहुळणाऱ्या केसांची ती छानदार कुत्री आहे! आणि तुम्ही दोन मरतुकडीं कुत्रीं आहांत. माझ्या प्रेमाची कुत्र्याची तंगडी मी शालनच्या डोसक्यांत घालणार. तिला बेहोश करणार—"

ऊन रखरखलें होतें. अंगांतून घामाच्या धारा वाहात होत्या आणि वसंताची भयानक बडबड चालूच होती. तो एकसारखा शालनकडे पाहात होता. आजूबाजूला येवढे सृष्टिसौंदर्य होतें, पण शालनखेरीज त्याचें दुसऱ्या कशाकडे लक्ष नव्हतें. तो सारखा शालनकडे एकटक पाहात होता! जणू शालन-खेरीज–स्त्रीखेरीज–कामवासनेखेरीज ह्या जगांत दुसरें कांहीच नव्हतें.

त्याच्या वटवटीला मी कंटाळलों होतों. माझ्या जागी त्याला न ओळखणारा दुसरा कोणी असता तर हॉस्पिटलांतून पळून आलेला हा एखादा वेडाच आहे असें त्याला वसंताकडे पाहून वाटलें असतें. काय करावें हें मला कळेना. म्हणून मीं प्रभाकरला हाक मारली. त्याच्याबरोबर शालनहि आली.

" तूं षंढ आहेस! " वसंता प्रभाकरला म्हणाला, " शालनचा मादक उरोज तुला आव्हान देतो आहे तरी तूं षंढासारखा तिच्याबरोबर बुळबुळीत गप्पा मारीत चालला आहेस! ... ..."

" वसंता, काय बोलतोस रे हें? " प्रभाकरने आश्चर्याने नि किंचित् रागाने विचारलें.

" त्याला काय झालंय् कोणास ठाऊक! " मी म्हणालों, " मघापासून असंच कांहीतरी विचित्र बडबडतो आहे तो! "

" तुम्ही यंत्रयुगाचे बळी आहांत ! क्षुद्र जंतु आहांत–गांडूळ आहांत—

वसंताकडे भीतीमुळें विस्फारलेल्या डोळ्यांनी शालन पाहात होती. ती म्हणाली, " ह्यांना सनस्ट्रोक तर झालेला नाही ना ? डॉक्टर म्हणाले होते. ह्या उन्हामुळे सनस्ट्रोक होण्याची भीति असते म्हणून ! "

वसंता तिच्याकडे एखाद्या काळ्या भुरक्या लांडग्यानें पिवळ्या मेंढऱ्याकडे पाहावें त्या काळ्या दृष्टीने पाहात राहिला. मग तो म्हणाला, " तुझ्या मनोवृत्तींना भीतीची खमंग फोडणी उत्तेजित करीत आहे ! किती भयंकर ! किती छान ! शालन, मी तुला कवटाळीन. तुला जपीन. माझ्या उदात्तपणाचें मला कौतुक वाटतें. त्यागाच्या आडव्यातिडव्या कल्पना माझ्या मनांत मळत आहेत. "

येवढें बोलून वसंता एकदम पिसाटासारखा शालनच्या अंगावर धावून-गेला आणि त्यानें तिला आपल्या बाहुपाशांत घट्ट कवटाळली. तो ओरडू लागला, " मी जगाला कसलें तरी आव्हान देतों आहें ! मी जगाला धक्के देतों आहें ! जगाला आग लावतों आहें ! मी ह्या षंढ नामर्द जगाला तडे पाडतों आहें !–मला माझी भयंकर दया वाटते आहे ! मला माझा अभिमान वाटतो आहे; माझ्या मनांत अर्थशून्य वादळें निर्माण होत आहेत ! संसारांत कोंडलेल्या साऱ्या नामर्द स्त्रियांना मोकळें करावें आणि क्षुब्ध, उदात्त, विकृत, नीच अशा कामवासनेचा डोंब पेटवून द्यावा. कणाकणाने साखर गोळा करणाऱ्या यांत्रिक डोंगळ्यांना चाबकाने फोडून काढावें, त्यांच्यावर बंदुकीच्या गोळ्या झाडाव्या ! अधकच्चें मांस खावें ! दुसऱ्याला लुवाडावें ! स्त्रीला कवटाळावें. जगांतल्या साऱ्या नवऱ्यांच्या स्त्रियांना कवटाळावें व त्यांच्याकरता लढावें ! साऱ्या नवऱ्यांच्या मृत मूर्ख शरीरांवरून स्त्रियांना टराटरां ओढीत न्यावें. त्यांचें मोकळे केस कुस्करावे–"

वसंताची बडबड आणखी किती वेळ चालली असती कोणास ठाऊक ! शालन किंकाळ्या मारीत होती आणि तिच्या त्या किंकाळ्यांत त्याची पुष्कळशी बडबड बुडून जात होती. प्रभाकर एकदम पुढें झाला आणि वसंतानें जगांतील साऱ्या नवऱ्यांना मारण्यापूर्वीच त्याने वसंताच्या थोबाडींत भडकावून दिली. त्या धक्क्याने वसंताच्या डोक्यावरची हॅट दूर उडून गेली आणि वसंता कोलमडून खालीं पडला.

आपल्या तोंडांतून रक्त येतें आहे की काय हें पाहात वसंता उभा राहिला. मग त्याने आपले धुळीने माखलेले कपडे साफसूफ केले आणि आश्चर्याच्या स्वरांत त्याने विचारलें, " मी चालतां चालतां पडलों वाटतं ! "

" तूं पडला नाहीस, प्रभाकरनं तुझ्या मुस्काटांत मारून तुला खाली लोळवलं ! " मी कठोर स्वरांत म्हणालों.

" प्रभाकरनं माझ्या थोबाडींत दिली ? कां ?" वसंताने विचारलें.

" कां म्हणून विचारतोस आणखी निर्लज्जासारखा ?" प्रभाकर म्हणाला. " दोनच मिनिटांपूर्वी तूं काय करीत होतास, काय बडबडत होतास, काय तुला ठाऊक नाही ?"

" तूं शालनला धरलं होतंस–वसंता, तूं असं कांही करशील असं स्वप्नांतहि वाटलं नव्हतं !" मी म्हणालों.

" स्वप्न !" वसंता म्हणाला, " होय, असं कांहीतरी विचित्र स्वप्न पडल्यासारखं मला वाटलं खरं !"

" स्वप्न नव्हे गाढवा !" प्रभाकर म्हणाला, तूं खरोखरीच मूर्खासारखा वागलास !"

हा सारा प्रकार काय आहे मला कांहीच कळेना. केव्हा वसंता अगदी शहाण्यासारखा बोलतो काय नि एकदम अंगात आल्यासारखें बडबडूं लागतो काय ? सारेंच विचित्र होतें. मीं म्हणालों, " बरं, आता ह्या झाडाखाली थोडी विश्रांति घेऊं या. थोडं कांही खाऊन घेऊं या. "

माझी कल्पना सर्वांना आवडली. वसंताने जाऊन आपली मातींत लोळणारी हॅट आणली आणि एका मोठ्या झाडाच्या शीतल छायेखाली बसून आम्ही फराळ करूं लागलों.

फराळ करतांना मीं वसंतावर बारीक नजर ठेवली होती. पण त्याची आताची वागणूक अगदी पूर्वीसारखी होती. दहाच मिनिटांपूर्वी ह्या माणसाने एवढा तमाशा केला होता ह्याची कुणाला कल्पनाहि आली नसती. आपण थोड्याच वेळापूर्वी कांही वेडेचार केले ह्याची त्यालाहि कांही जाणीव असल्यासारखी दिसत नव्हती. शालनचा आपण कांहीच अपराध केलेला नाही अशा रीतीने तो शालनशीं वागत होता. त्याच्या ह्या वागणकीने मी तर दिङ्मूढच होऊन गेलों होतों.

फराळ आटोपून आणि थोडी विश्रांति घेऊन आम्ही धवधव्याचा रस्ता आक्रमूं लागलों. ऊन चांगलेंच रखरखलें होतें. शालनने आपली छत्री उघडून डोक्यावर धरली होती. मीं आणि प्रभाकरने डोक्यावर हॅट ठेवल्या होत्या. वसंता मात्र हॅट हातांत घेऊन गुपचूप चालला होता.

" वसंता, हॅट घाल ना डोक्यांत." मी म्हणालों. " खूपच ऊन आहे ! "

" नको ! ती हॅट डोक्यावर ठेवली की कांही विचित्रच वाटतं." वसंता म्हणाला, " डोक्याला अगदी आवळ होते ती ! "

त्याने हॅट घातली नाही तर उन्हाचा परिणाम होऊन तो आणखी कांही प्रकार करायचा, ह्या भीतीने मीं त्याला हॅट्स् घालण्याचा आणखी थोडा आग्रह केला; परंतु त्याने डोक्यांत हॅट घातली नाही.

लवकरच आम्ही एक छोटासा डोंगर चढून धबधब्याजवळ आलों. साधारण तीस एक फूट उंचीच्या कड्यावरून एक चांगला जाड पाण्याचा प्रवाह उडी घेत होता. हवेंत तुषार उडत होते. आणि अनेक इंद्रधनुष्यें दिसत होती. जेथें पाणी पडत होतें, तेथें एक मोठा भोवरा झालेला होता. आणि कानठळ्या बसविणारा आवाज सतत कानावर येऊन पडत होता.

डोंगरावर वाराहि चांगला जोराचा सुटला होता. डोक्यावर हॅटस् ठेवता ठेवता माझी आणि प्रभाकरची पंचाईत होत होती. आपली छत्री उघडी ठेवता ठेवता तर शालनची अगदीच तिरपीट उडत होती. वसंता बोडकाच होता-आणि वाऱ्याच्या झोतावरोवर त्याच्या डोक्यावरील लांब केसांच्या बटा उडत होत्या.

थोडा वेळ धबधव्याची शोभा पाहून मी वसंताला म्हणालों, "वसंता, डोक्याला हॅट घाल पाहू. ऊन किती कडक पडलं आहे ! "

वसंता हॅट घालण्यास तितकासा उत्सुक दिसला नाही. तेव्हा जरा दम भरल्यासारखे करूनच मी त्याला हॅट घालण्यास सांगितलें. हो वसंताला उन्हाचा मार बसून मवाच्या प्रसंगाचो पुनरावृत्ति व्हवयास नको होती

परंतु माझ्या सूचनेचा कांहींच उपयोग झाला नाही. मी ज्याला भीत होतों तें अखेरला झालेंच ! वसंताने बगलेंत धरलेली हॅट काढून डोक्यावर ठेवली मात्र, तो एकदम बोलूं लागला, " हें सारें निराळेंच जग आहे. ह्या जगांत एकसारखा हिरवा चिरूट ओढणारा एक डिटेक्टिव आहे काळेनिळे

पोशाख घातलेले वेटर पुन्हा पुन्हा सलाम करीत ऐटबाज लाचारी दाखवीत आहेत. रक्ताच्या थारोळयांत एक भेकड प्रेत पडलेलें आहे. आणि केस सोडलेली शालन तें रक्त चाटीत आहे. . . मी ओरडून सांगतों–आक्रंदून सांगतों–हें जग अजिबात निराळें आहे. हें जग खोटें आहे–फक्त तो हिरवा चिरूट आणि ते डाफरलेले वेटर तेवढे खरे आहेत–"

बोलतां बोलतां वसंताचा आवाज चढूं लागला होता. त्याच्या डोळयांत ती मद्याची चमक अधिकाधिक गडद होऊं लागली होती. त्याला त्वेष चढलेला होता. दोन्ही हातांनी हातवारे करीत तो बोलत होता.

"अरे यशवंत–यशवंत–' मला पाठीमागून हाक ऐकू आली म्हणून मीं मागे वळून पाहिलें पहातों तो घामाघूम झालेले डॉक्टर हातांत एक हॅट घेऊन धावतपळत येत होते. वसंताच्या अशा परिस्थितींत डॉक्टर आलेले पाहून मलाहि जरा बरें वाटलें.

"यशवंत–हॅट ! ती हॅट !" डॉक्टर सारखे ओरडत आणि हातवारे करीत डोंगराची चढण शक्य तेवढया गडबडीने चढत होते. मला त्यांचे शब्द अस्पष्टसे ऐकू येत होते, परंतु ते असे ' हॅट हॅट ' करून ओरडत कां होते आणि त्यांनी एवढे धडपडत येण्याचें कारण काय असावें, हें मला कळत नव्हते.

"यशवंता–हॅट–वसंताची हॅट–" जरा जवळ आल्यावर डॉक्टरांचे शब्द मला स्पष्ट ऐकू आले मीं वळून वसंताकडे पाहिलें वसंता हातवारे करीत त्वेषाने बडबडत होता. जगांतल्या साऱ्या नवऱ्यांना तो पुन्हा आव्हान देऊं लागला होता. मीं त्याच्या हॅटकडे पाहिलें. वाऱ्याने सरकत सरकत ती अगदी त्याच्या डोक्यावरून पडायला आली होती. आपलें व्याख्यान चालू असतांना मधूनमधून वसंता हॅट सारखी करण्याचा प्रयत्न करीत होता.

"ती हॅट – काढून घे लवकर–" आता आणखी जवळ आलेल्या डॉक्टरांचे शब्द मला ऐकूं आले. मी वसंताच्या डोक्यावरची हॅट काढून घेण्याकरिता जरा पुढे सरकलों. पण येवढयांत सोसाटयाच्या वाऱ्याची एक झुळुक आली आणि माझा हात हॅटवर पडण्यापूर्वीच हॅटने वाऱ्यावर उड्डाण सुरू केलें.

हॅट वसंताच्या डोक्यावरून जी उडाली ती एकदम गिरक्या घेत खालच्या पाण्याच्या भोवऱ्यांत जाऊन पडली. तिने एकदोन प्रदक्षिणा घातल्या आणि मग ती अदृश्य झाली.

"घात झाला !" कपाळावर हात मारून घेत एकदम डॉक्टर म्हणाले.

"कां ? काय झालं ?" वसंताने नेहमीच्या स्वरांत आश्चर्याने विचारलें.

"ती हॅट गेली !" डॉक्टर म्हणाले.

"गेली तर जाऊं द्या !" वसंता म्हणाला, "नाहीतरी जुनीच होती ती !"

वसंताच्या या शहाणपणाच्या वागणुकीकडे मी आता आश्चर्याने आणि कौतुकाने पाहात होतों.

"पण ती तुमची हॅट नव्हती !" डॉक्टर वसंताला एक जुनाट हॅट देत म्हणाले, "ही पहा तुमची हॅट !"

वसंताने हॅट हातांत घेतली आणि तिच्यावरून नजर फिरवीत तो म्हणाला, "खरंच की ! ही माझी हॅट आहे ! म्हणजे पहाटेच्या अंधारांत मी भलतीच हॅट घेऊन आलों होतों तर !"

"पण डॉक्टर, वसंताची हॅट बदलली असली तरी त्याची हॅट घेऊन धावत पळत यायची एवढी कांही जरूर नव्हती !" मी म्हणालों.

"त्या हॅटीत एक अद्‌भुत गुण होता," डॉक्टर म्हणाले, "तुम्हांला त्याचा अनुभव आलाच असेल !"

"होय ! चांगलाच अनुभव आला !" मी आश्चर्याने म्हणालों, "असा काय गुण होता त्या हॅटींत ?"

"ती हॅट एका नवकथाकाराची होती." डॉक्टर म्हणाले, "मागे माझ्याकडे एक नवकथाकार पाहुणा म्हणून आला होता. जातांना तो ही हॅट विसरून गेला. नवकथाकाराच्या डोक्यांत सतत राहून ह्या हॅटीला एक विचित्र गुण प्राप्त झाला होता. एखाद्याच्या डोक्यावर तिला ठेवलं की त्या माणसाचं अंतर्मन एकदम जोरांत काम करूं लागे. माणसाच्या प्रकटमनाला दावून टाकून त्याचं अंतर्मन बाहेर येई–मला या हॅटचा मानसिक रोग्यांचं निदान करतांना पुष्कळच उपयोग होई !"

एवढें बोलून खालच्या भोवऱ्याकडे डॉक्टर विषण्ण नजरेने पहात राहिले.

★ ★ ★

७

# फत्तर

[वर्टींच्या लेखनशक्तीचा नवा प्रत्यय देणाऱ्या ज्या दोन कथा या संग्रहांत आहेत त्यांतील ही एक. भारताच्या फाळणीच्या निमित्ताने ज्या रोमहर्षक घडामोडी होऊन मानवतेचें रौद्र स्वरूप प्रकट झालें त्याचें प्रभावी चित्रण वर्टींनीं केलेलें आहे. गंमत अशी की लेखक कोठेंहि अतिवास्तवतेचा अगर अद्‌भुताचा आश्रय न करतां मानवी मनाची नितळ तडफड बोलकी करतात. या कथेंतील मन्मथनाथ आणि राणी यांच्या भाव-विश्वांत निर्माण झालेलें वादळ तुम्हाला खचित बेचैन करील.]

★ ★ ★

—" बाबूजी मुझे बचावो ! "

आपल्याच तंद्रींत रस्त्याने चाललेल्या मन्मथनाथने ह्या शब्दांनी भानावर येऊन एकदम बाजूला पाहिलें, तो त्याला आपल्या शेजारी एक तरुणी उभी असल्याचें दिसून आलें.

खादीचा लांब सदरा त्यावर एक बंडी, सोगा सोडलेलें स्वच्छ धोतर आणि डोक्यावर खादीचीं पांढरी शुभ्र परीटघडीची टोपी, अशा पोषाखात मन्मथनाथ ऑफिसांतून आपल्या घरीं चालला होता. रस्त्यावर विशेषशी रहदारी नव्हती. अशा धोक्याच्या दिवसांत सहसा घराबाहेर पडणार कोण? देशाला स्वातंत्र्य मिळून नुकताच कुठे महिना दीड महिना झाला होता, आणि दिल्लींत हिन्दुमुसलमानांच्या दंग्याने पेट घेतला होता. मिश्र वस्तींतून लुटालूट, जाळपोळ, कत्तली चालू होत्या. घराच्या बाहेर पडणें धोक्याचें होतें. परंतु मन्मथ रोजच्याप्रमाणे आजहि ऑफिसांत गेला होता. एक तर ऑफिस त्याच्या

घरापासून जवळच होतें आणि दुसरें म्हणजे घरापासून ऑफिसपर्यंतचा सारा रस्ता निर्भेळ हिन्दु वस्तींतूनच गेला होता. त्यामुळे त्या रस्त्याने ऑफिसमध्ये जाण्यायेण्यात निदान मन्मथला तरी कांही धोका नव्हता. मन्मथ कधी राजकारणांत वगैरे भाग घेत नव्हता. आला दिवस आपलें काम करावें, पुस्तकवाचनाने किंवा क्लबात जाऊन करमणूक करावी, वाटलेंच तर सिनेमाला जाऊन मोठी 'चैन' करावी आणि पगार मिळाला की त्यातले थोडे पैसे अलाहाबादला म्हाताऱ्या आईबापांना पाठवावेत, असा त्याचा साधा सरळ जीवनक्रम होता. राजकारण वगैरे नसत्या भानगडींवर विचार करून तो कधी आपल्या डोक्याला त्रास देत नसे. तरी पण अलीकडे जे साऱ्या उत्तर हिंदुस्थानभर हिन्दुमुसलमानांचे दंगे पेटले होते, ते त्याला एकदम नापसंत होतें. तो म्हणे, "अरे लेकांनो आपसांतच भांडतां कशाला? दोघेहि आपले गोडीगुलाबीनं मजेंत रहा की!"

आताहि तो मनांतल्या मनांत दिल्लींतील हिन्दुमुसलमानांचा असाच निषेध करीत आणि त्यांना गोडीगुलाबीने रहाण्याचा उपदेश करीत रस्त्याने चालला होता. ऑफिसपासून तो थोड्याशाच अंतरावर आला होता, आणि येवढ्यांत त्याच्या कानावर त्या तरुणीचे शब्द येऊन पडले होते.

त्याने त्या तरुणीकडे पाहिलें. तिचें गोरेपान मुख धावण्याच्या श्रमांनी आरक्त झालें होतें. तिला धाप लागली होती, आणि प्रत्येक श्वासांबरोबर तिच्या नाजूक आणि सुबक नाकाच्या पाकळ्या विस्फारित होत होत्या. अंगांत लांब खमीज आणि पायांत सलवार असा तिचा पोषाख होता. तिचा दुपट्टा तिच्या डोक्यावरून ढळून तिच्या पाठीवर अस्ताव्यस्त पडला होता.

"बाबूजी, मला वाचवा. नाहीतर ते मला मारून टाकतील, नाहीतर पळवून नेतील!" ती तरुणी मन्मथला पुन्हा म्हणाली. तिचा स्वर आर्त होता. तिचे काळेभोर डोळे त्याला विनवणी करीत होते.

"घाबरूं नकोस!" तिला धीर देत मन्मथ म्हणाला, "माझ्याबरोबर चल!"

भीतभीतच ती तरुणी मन्मथबरोबर चालू लागली. चालता चालता त्याने विचारलें, "तू मुसलमान आहेस का?"

"हो!" ती तरुणी त्याच्या अंगाला न खेटता, पण शक्य तेवढ्या त्याच्या

जवळ सरकून म्हणाली, " हिन्दुशीख माझ्या मागं लागलेत. कदाचित् आता येवढ्यांत इथं येतीलच ते माझा पाठलाग करीत ! "

तिचा आवाज कांपरा होता. तिचा चेहरा कावराबावरा झाला होता.

" कुठं रहातेस तूं ? " मन्मथने चालता चालता विचारलें.

" रहातेस ! " एक सुस्कारा टाकून ती तरुणी म्हणाली, " दोन गल्ल्या सोडून पलीकडच्या गल्लींत रहात होतें ! आमच्या गल्लीवर आज हल्ला झाला· त्यांनी आमच्या घराला आग लावून दिली आहे. दंगेखोरांचा डोळा चुकवून मी पळून आलें. पण...पण कांहींनी मला पाहिलं असलं पाहिजे. बाबूजी ते जर आता इथं आले...."

" चल तर, लवकर लवकर पाय उचल," स्वतःचा वेग वाढवीत मन्मथ म्हणाला.

पण तीं पंधरावीस पावलेंहि गेलीं नसतील, तोच त्यांच्या कानांवर दंगेखोरांचा गलका येऊन पडला. तो गलका ऐकताच ती तरुणी मन्मथला भयविव्हल स्वरांत म्हणाली, " बाबूजी, वो आ गये ! "

" अशी घाबरूं नकोस. शांतपणानं माझ्याबरोबर चल. " मन्मथ म्हणाला, " मी तुझ्या केसालाहि धक्का लागू देणार नाही ! "

" पण ते मला ओळखतील. ते इतके लोक आहेत—पागल बनलेले आहेत. . " ती तरुणी भीतीच्या स्वरांत बोलूं लागली, पण तिचे शेवटचे शब्द जवळ आलेल्या दंगेखोरांच्या गलक्यांत बुडून गेले.

" वो देखो, वही है लवंडी ! "

" तीच—तीच ती पोरगी ! पकडा तिला ! "—

जमावांतले लोक ओरडत होते आणि त्यांच्या दिशेने धावत येत होते.

" बाबूजी ऽऽ ! " असें म्हणून ती तरुणी तर मटकन् खालीच बसली.

" ऊठ, असा धीर सोडूं नकोस. " तिला उठवीत मन्मथ म्हणाला.

ती तरुणी उठून उभी राहिली, पण तिचे हातपाय लटपटतच होते.

मन्मथने क्षणभर विचार केला. मग त्याने हातांनी आपल्या अंगरख्याचे लांबलचक खिसे तपासले आणि त्यांतून त्याने एक छोटसा चाकू बाहेर काढला.

" बाबूजी, हें काय ? तुम्ही त्यांच्याशीं ह्या चाकूनं लढणार ? " त्या तरुणीने निराशेने आणि आश्चर्याने मन्मथला विचारलें.

"होय! लढणार!" चाकूचें पातें उघडत मन्मथ म्हणाला, "पण तें ह्या चाकूनं नव्हे—डोक्यानं!"

असें म्हणून त्याने आपल्या डाव्या हाताच्या बोटाची एक बारीकशी खपली चाकूने उडवून दिली. त्या जखमेंतून रक्त वाहूं लागलें. उजव्या हाताची, तर्जनी त्याने त्या रक्तांत बुडविली, आणि तर्जनीला लावलेलें ते रक्त त्याने चटकन् त्या तरुणीच्या कपाळाला लावलें.

"वा! छान!" बोट काढून घेऊन तिच्या कपाळाकडे पहात मन्मथ म्हणाला "तुझ्या कपाळाला आता कुंकवाचा टिळा लागला. आता तूं हिन्दु झालीस!......"

दोघंहि पुन्हा रस्ता चालूं लागलीं. पण थोडयाच वेळांत दंगेखोरांनी त्यांना गराडा घातला.

"काय तुम्हांला कांही आहे की नाही? का तुम्ही अगदीच पशू बनला आहांत?" सात्विक संतापाने मन्मथ ओरडला.

"बाबूजी, ही औरत मुसलमान आहे. तिला आम्ही घेऊन जाणार!" एकदोन दंगेखोर ओरडले आणि ते त्या तरुणीच्या दिशेने पुढे सरसावले.

"खबरदार, माझ्या बायकोच्या अंगाला कुणी हात लावला तर!" मन्मथ एकदम मध्ये पडून ओरडला. "स्वतःला हिन्दु म्हणवतां आणि एका सभ्य हिन्दु स्त्रीची भर रस्त्यावर विटंबना करायला कांहीच वाटत नाही तुम्हांला?"

"पण ही बाई मुसलमान आहे!"

"होय, आम्हीं तिला पळून येतांना पाहिलं आहे!"

"बाबूजी, तुम्ही बाजूला व्हा."

दंगेखोर ओरडले, आणि त्यांनी पुन्हा त्या तरुणीवर झेप घातली. ती तरुणी भयभीत होऊन एकदम मन्मथला बिलगली.

"काय पागल झालांत काय तुम्ही?" रागाने मन्मथ म्हणाला, "ही माझीच बायको आहे–माझी धर्मपत्नी आहे–अस्सल कायस्थ कुळांतली आहे." बोलता बोलता त्याने तिच्या कपाळावरचा दुपट्टा बाजूला सारला, आणि तिच्या कपाळावरील रक्ताचा टिळा त्यांना दाखवून तो म्हणाला, "हें पहा हिच्या कपाळावरचं कुंकू. मुसलमान स्त्रिया कधी कुंकू लावतात का?"

दंगेखोरांनीं तो कुंकवाचा टिळा पाहिला, आणि ते गोंधळले. काय करावे हें त्यांना सुचेना. एवढ्यांत त्याच्यांतला एकजण म्हणाला, " बाबूजी, माफ करा. आमची कांही तरी चूक झाली असली पाहिजे. पण या अशा दिवसांत तुम्ही बायकोला घेऊन फिरायला कशाला निघतां ? "

" चल ग लवकर ! " मन्मथ त्या तरुणीला म्हणाला, " घरीं अजून स्वयंपाक करावयाचा आहे ! "

तिचा हात धरून मन्मथ त्या दंगेखोरांच्या विस्फारलेल्या डोळ्यां-समोरून निघून गेला आणि तिला आपल्या घरीं घेऊन आला.

" हें माझं घर. " घरीं आल्यावर मन्मथ तिला म्हणाला, " सुदैवानं मला तीन खोल्यांचा ब्लॉक मिळालेला आहे. आंतल्या खोलींत तूं रहा. हो ! कांहीं दिवस, सर्व स्थिरस्थावर होईपर्यंत तुला इथंच रहावं लागेल, नाही ? "

हळूहळू त्याने तिची सर्व माहिती काढून घेतली, आईबापांची ती एकुलती एक लाडकी मुलगी होती. त्यांच्या गल्लीवर हल्ला झाला तेव्हा त्यांची पांगा-पाग झाली होती. तिचें अनवरशीं लग्न ठरलें होतें. अनवर एक सुंदर, हुषार, शिकलेला तरुण होता. त्यांचें लग्न ह्या महिन्याभरांतच होणार होतें; पण हें नसतेंच विघ्न मध्यें उपस्थित झालें होतें. तिने घरून पळून येतांना अनवरचा फोटो मात्र बरोबर न विसरतां आणला होता. मन्मथने तो फोटो पाहिला आणि तो म्हणाला. " वा ! खूपच खुपसुरत आहे की हा अनवर. मोठी नशीबवान दिसतेस तूं ! "

ती तरुणी जराशी लाजली; मग तिने एक सुस्कारा टाकला. तें पाहून मन्मथ म्हणाला, "तूं कांही काळजी करू नकोस. मी तुझ्या आईवडलांचा तलास करतों–हो, आणि अनवरचाहि. पण शादीला मात्र मला बोलावलं पाहिजे हं ! "

चारसहा दिवसांत दिल्ली बरीच शान्त झाली. दुकानें उघडूं लागलीं. त्या दिवशीं मन्मथ ऑफिसांतून घरीं आला तो दोनचार मोठालीं बोचकीं घेऊनच.

" काय आणलं हें ? " त्या तरुणीने विचारलें.

" राणीकरता कपडे ! " मन्मथ म्हणाला. " अजून कुणाचाच पत्ता लागत नाही. रेडिओला कळवलंय्. सरकारकडेहि सर्वांचीं नावंगांवं दिलींत..

पण अजून कुठंच कांही पत्ता लागत नाही कुणाचा. म्हटलं, तुला आता आणखी कांही दिवस इथं रहावं लागणार मग कपडे नकोत का तुला ?—हीं पातळं–" कपाळावरचा घाम पुसून घेऊन बोचकीं सोडीत मन्मथ म्हणाला, " हें ब्लाऊज-करता कापड ! पसंत आहे ना ? "

" पण मीं सांगितलेलं आणलं का ? "

" काय ? "

" कुंकू ! "

" हो हो ! आणलं तर. कुंकू नसलं तर राणीचं कपाळ कसं सुनं सुनं दिसतं ! "

" कुंकू मला नेहमीच लावलं पाहिजे. नाहीतर शेजारपाजारच्या बायका येतात आणि खोदूनखोदून प्रश्न करतात ! "

" होय तुला आणखी कांही दिवस तरी माझी बायको म्हणून— 'राणी' म्हणून राह्यलं पाहिजे. त्या दिवशीं मवाल्यांना तूं माझी बायको आहेस म्हणून थाप मारली, तीच थाप चालू ठेवली पाहिजे ! "

राणीच्या कपोलांवर रक्तिमा पसरला.

" आपलं खोटंखोटं ! थोडे दिवस–लुटुपुटूने नवरावायको ! " मन्मथ घाईघाईने म्हणाला. कदाचित् आपले नवरावायकोचें नातें–खोटें का होईना– तिला आवडायचें नाही असें त्याला वाटत होतें. तो पुढें म्हणाला. "लोक तरी काय विचित्र असतात पहा ! उठलासुटला मला विचारतो, ती घरीं आहे ती पोरगी कोण म्हणून ? असेल कुणीहि ! यांना काय करायचंय् ? पण नाही. स्त्रीपुरुषांमध्यें नक्की नातं काय आहे, हें जाणण्याची ह्या जगाला मोठी उत्सुकता असते ! मग मला सांगावंच लागतं, की ती माझी बायको आहे म्हणून. नाहीतर त्यांच्या शंकाचं समाधान होत नाही ! तरी बरं, मी नुकताच घरांत राहायला आलों आहें, आणि माझी कुणाला विशेषशी माहिती नाही म्हणून ! "

तो हें बोलत असतांना राणीने तिच्याकरता मन्मथने आणलेले कपडे पाहून झाले होते आणि त्याने आणलेल्या कुंकवाच्या करंड्यांतले कुंकू ती आपल्या कपाळावर लावीत होती.

कुंकू लावून झाल्यावर आरशासमोरून ती वळली आणि किंचित् लाजून मन्मथकडे पाहूं लागली.

अनुक्रम 21326 दि:



“ राणी ! ” मन्मथ म्हणाला, “मी...तुला...राणी म्हणतो...म्हणून...तुला राग तर नाही ना येत ? पण करणार काय ? तसं म्हणावंच लागतं. आणि तसं म्हटल्यावर तूं जी थोडीशी चिडतेस, तें पहाण्यांतहि मोठी गंमत असते ! ”

“ आता तुमच्या तावडींत सापडलें आहें, तुम्ही कांहीहि म्हणूं शकता ! ” राणी फणकाऱ्याने म्हणाली.

“ पहा. आता किती सुंदर दिसतेस तूं ! तुला ‘ राणी ’ म्हटलेलं आवडत नसलं तरी एवढ्याकरताच मला तुला ‘ राणी ’ म्हणून हाक मारायची हुक्की येते, ”

राणी फुरंगटून बसली.

“ बरं बुवा, नाही म्हणत ‘ राणी ’ ! ” मन्मथ गंभीर होऊन म्हणाला, “ बिबी म्हणेन, मग तर झालं ! ”

आता मात्र राणी खुदकन् हसली.

मन्मथ म्हणाला, “ तूं भांगातहि कुंकू लाव ना, सुदर दिसेल तें तुला ! ”

“ तुम्हांला सुंदर दिसण्याची खटपट करायला मी काही तुमची खरीखुरी बायको नाही ! ” राणी म्हणाली.

मन्मथ एकदम गप्प झाला. थट्टेच्या भरांत आपण फारच वाहवलों असें त्याला वाटलें. किती तरी वेळ कुणीच कांही बोललें नाही.

“ आणि जेवणाचं काय ? ” राणी थोड्या वेळाने म्हणाली.

“ अरे हो ! विसरलोंच होतों. खाणावळीत जाऊन डबा घेऊन येतों. ” डोक्यावर टोपी चढवीत मन्मथ म्हणाला.

“ मला नाही आवडत खाणावळींतलं नि हॉटेलातलं ! ” राणी म्हणाली.

“ पण मग करणार काय ? नाही तर काय मग उपाशी रहायचं ? ” मन्मथने विचारलें.

“ आजच्या एक दिवस मी खाणावळींतलं जेवीन. ” राणी म्हणाली, “ उद्या घरांत एक शेगडी आणा. भांडीकुंडी आणा. उद्यापासून मी घरींच स्वयंपाक करीन. ”

दुसऱ्या दिवशीं राणीने घरींच स्वयपाक केला. मन्मथला तो फार आवडला. तिने त्याला खूप आग्रह करकरून जेऊं घातलें. वाढता वाढता

राणीचा दुपट्टा जरा मागे गेला होता. मन्मथने पाहिलें, राणीने आपल्या भांगांत कुंकू लावलें होतें.

राणी रोजच स्वयंपाक करू लागली. हळूहळू तिने ब्रह्मचारी मन्मथच्या घराचें स्वरूपहि पालटून टाकलें. खिडक्यांना तिने सुंदर पडदे लावले. नवीन खुर्च्याटिबलें, कपाटें आणविलीं. ऑफिसांतून घरीं आल्यावर मन्मथला कसें प्रसन्न वाटे.

पुष्कळदा घरीं आल्यावर त्याला दिसून येई की राणी अनवरच्या फोटो-कडे उदास दृष्टीने पहात बसलेली आहे. अजूनहि तिच्या कुठल्याच नातेवाई-काचा किंवा अनवरचाहि कांहीच पत्ता लागला नव्हता. मन्मथने खूप खटपट केली होती, परंतु तींत त्याला मुळीच यश आलें नव्हतें. दु:खित चेहऱ्याने अनवरच्या फोटोकडे पहात बसलेल्या राणीकडे पाहिलें की त्याच्या हृदयांत कालवाकालव होई, आणि मग तो तिचें मन प्रसन्न करण्याकरता धडपड करी. ती जे काय थोडे दिवस आपल्या घरांत राहणार आहे, ते दिवस आनंदांत जावेत, येवढीच त्याची इच्छा होती.

एक दिवस तो म्हणाला, " राणी, तूं दिवसभर घरांतच बसून रहातेस, तुला कंटाळा येत नाही का ? आपण आज सिनेमाला जाऊं या ! "

" नको ! " राणी म्हणाली, " मला सिनेमा आवडत नाही. "

" मग फिरायला जाऊं या ! "

" आणि कुणी ओळखीचं भेटलं तर ? "

" तर बरंच झालं ! तुझ्या माणसांचा पत्ता लागेल. "

" मी जावं म्हणून एवढे का उत्सुक झाला आहांत तुम्ही ? " राणीने विचारलें.

" तसं नव्हे, राणी. " मन्मथ समजावणीच्या स्वरांत म्हणाला, तुला तुझ्या घरच्या माणसांकडे गेलं पाहिजे ना ? तुझी अनवरशीं शादी व्हाय-चीय् ना ? "

होकारार्थी मान हलवून राणी गप्प बसली.

" मग कुणी तुझ्या ओळखीचं भेटलं तर बरंच नाही का व्हायचं ? "

" कुणास ठाऊक ! " राणी म्हणाली, " नाहीतर उगाच नांवं मात्र ठेवायचे ! "

मन्मथने तिला बरें वाटावें म्हणून घराच्या बाहेर काढण्याचा बराच प्रयत्न केला पण कांहीं काही सबबी काढून राणीने तो सफल होऊं दिला नाही. घराच्या बाहेर पडण्याला ती नाखूष आहे हें मन्मथला कळून चुकलें व मग त्याने तो प्रयत्न सोडून दिला,

" मला थोडी लोकर आणून द्या." एक दिवस राणी त्याला म्हणाली.

" हो, आणीन. कुठल्या रंगाची हवी ? " मन्मथनें विचारलें.

" तुम्हांला कुठला रंग आवडतो ? "

" तुझ्या पसंतीचा रंग सांग. लोकर तुला हवी आहे ! "

" पण स्वेटर तर तुम्हांला करणार आहे ना ? "

" मला ? "

" हो ! "

" तरी पण मग तुझ्याच आवडीचा रंग सांग. "

राणी कांही बोलली नाही. पण ती लाजली आणि तिच्या गालांवर थोडी लाली पसरली.

" सांग ना ! " मन्मथ म्हणाला.

" मी नाहीं सांगत जा ! "

" नको सांगूस ! " मन्मथ म्हणाला, " पण मला तुझ्या आवडीचा रंग तूं सांगितला आहेस ! "

" मीं कुठं सांगितला ? "

" सांगितला नाहीस—दाखवला आहेस ! कुठला, सांगूं ? " तिच्या आरक्त गालांकडे पहात मन्मथ म्हणाला, " गुलाबी ! "

दिवसामागून दिवस जात होते. राणी मन्मथसाठी स्वेटर विणण्यांत गढून गेली होती. तिचे दु:ख आता पुष्कळच कमी झालेलें दिसून येत होतें. मन्मथ तिला उर्दू पुस्तकें आणून देई. तीं वाचण्यांतहि तिचा वेळ अलिकडे मजेंत जाई.

एक दिवस तिची थट्टा करावी म्हणून मन्मथने हळूच अनवरचा फोटो काढून लपवून ठेवला. आता तिची कशी गंमत होईल, अनवरचा फोटो हरवला म्हणून तिच्या जिवाची तशी तगमग होईल, मग आपण तिला तो फोटो देऊन चिडवून कसे बेजार करूं, ह्या विचारांत मन्मथ मश्गुल होता. पण एक दिवस

झाला, दोन झाले, आठ दिवसहि होऊन गेले, तरी राणीने फोटोची शोधाशोध चालवलेली त्याला दिसून आली नाही, तिने त्याबद्दल त्याच्याकडे उल्लेखहि केला नाही ! मन्मथची विचाऱ्याची बरीच निराशा झाली, आणि तो फोटो तसाच त्याच्या बंडीच्या खिशांत पडून राहिला. अनवरचा फोटो तिने विसरून जावा, ह्याचें थोडें आश्चर्यहि वाटलें.

पावसाळा संपला, आणि एक दिवस दिल्लींत अकस्मात् थंडी प्रकट झाली. रात्रीं जेवणें झाल्यावर मन्मथने नेहमीप्रमाणे राणीची थट्टामस्करी केली आणि दोघेंहि आपआपल्या खोल्यांत जाऊन बिछान्यावर पडलीं.

पण मन्मथला झोप येईना. त्याला चांगलीच थंडी वाजत होती. पण करणार काय ? घरांत तर त्याचें एकच ब्लँकेट होतें, आणि तो तें राणीला देऊन बसला होता ! थंडी तर अशी पडली होती की त्याला चांगलीच हुडहुडी भरली होती. अखेरीस तो उठला. त्याने राणीने त्याच्याकरता केलेला स्वेटर चढवला, वरून दोनतीन सदरे घातले, त्यावरून एक गरम कोट चढवला आणि मग तो पुन्हा बिछान्यावर जाऊन पडला.

पण थंडीनेहि त्याची चांगलीच जिरवायची असा निश्चय केलेला दिसला. जसजशी रात्र पडूं लागली, तसतशी थंडी अधिकच कडक होऊं लागली. थंडीमुळें मन्मथला झोप येणें अशक्य झालें.

तो पुन्हा उठला आणि स्वयंपाकखोलींत गेला. त्याने शेगडी काढली आणि ती पेटविण्याची तो खटपट करूं लागला. त्याच्या गडबडीने राणी जागी झाली आणि तिने विचारलें, " काय करतां ?"

" शेगडी पेटवतोंय ! "

" कशाला ? "

" कशाला ! ही थंडी कोण पडलीय् ! तुझं आपलं ठीक आहे. ब्लँकेट घेऊन चांगली उबेंत झोपली आहेस तूं ! "

" खरंच, खूपच थंडी पडली आहे !" राणी म्हणाली, " घ्या हें तुमचं ब्लँकेट तुम्हांला. "

" का ! आणि तुला ? "

" मी घेईन शेगडी. "

" तें शक्य नाही ! "

" मला हें ब्लँकेट नको ! " खाटेवर उठून बसत राणी म्हणाली.

" मलाहि नको ! " मन्मथ म्हणाला.

" तुम्हीच घ्या तें ! " राणी म्हणाली.

" तूं माझं ऐकत नाहीस का ?"

" तुम्ही माझं ऐकत नाही का ? "

"पण ही गोष्ट दोघांनीहि ऐकणं कसं शक्य आहे ? "

" का ? " कांपऱ्या आवाजात राणी म्हणाली.——मन्मथला वाटलं थंडीमुळे हुडहुडी भरून तिचा आवाज कांपरा झाला आहे— " दोघांनीहि एकमेकांचं ऐकलं तर काय बिघडेल ? "

" वा ! हें कसं शक्य आहे ? " तिचें बोलणें किती मूर्खपणाचें आहे, असें दाखविणाऱ्या स्वरांत, हसून मन्मथ म्हणाला, " म्हणजे आपण दोघांनीहि काय एकाच ब्लँकेटांत झोपायचं ? " लाजलज्जा राणीकडे पाहून तो मोठमोठ्याने हसूं लागला आणि म्हणाला, " वा ! वा ! "

दिवसामागून दिवस चालले होते. मन्मथचे दिवस राणीच्या सहवासांत आनंदांत जात होते. फक्त त्याला एकच दु:ख होतें. तिच्या आईबापांचा अजून शोध लागला नव्हता—की अनवरचाहि. कुणी म्हणत तिचे आईबाप दंग्यांत मारले गेले, कुणी म्हणत ते पाकिस्तानांत पळून गेले. राणीहि आनंदांत होती. पण अलिकडचे त्याला दिसून येऊं लागले होतें की मधूनमधून ती विचार करीत बसते. तिचा चेहरा केव्हा केव्हा उदास दिसतो. तो तिच्याकडे पहात नाही अशी तिची समजूत असेल तेव्हा ती झटकन् आपले डोळे टिपून घेते. कधी कधी ती रात्रीची बिछान्यांत तळमळत पडते. तिला कसलें दु:ख होत असावें ? अर्थात, त्याला एकच कारण होते. तिला आपल्या आईबापांची आठवण येत होती. अनवरची आठवण येत होती. त्यांच्याकडे जाण्याविषयीं ती निराश झाली होती. त्याचेंच तिला दु:ख होत असलें पाहिजे. मन्मथला तिच्या दु:खाचें दुसरें कुठलेंच कारण सापडत नव्हतें.

तो तिच्याशीं पूर्वीप्रमाणेंच नवराबायको म्हणून थट्टामस्करी करी आणि तिला हसवण्याचा प्रयत्न करी. तिला तो सुंदर सुंदर पातळें आणी. त्याच्या कल्पनेप्रमाणे तिला आवडेल अशी कुठलीहि वस्तु त्याला बाजारांत दिसली की तो ती तिच्याकरता आठवणीने घेऊन येई. तिचें दु:ख कमी व्हावें,

ती मध्ये होती तशी पुन्हा आनंदांत असावी, म्हणून त्याची सारी खटपट चालली होती. पण दिवसगतीने राणी अधिकाधिक खिन्न होऊं लागली, तेव्हा तो जरा निराश झाला. तो विचार करी, राणीचं दुःख नाहीसं करण्याचं आपल्या हातीं कुठं आहे ? तिचं दुःख नाहीसं करणं आपल्या हातीं असतं तर त्याकरता आपण वाटेल तें केलं असतं ! काय करावं तिला सुखी करण्याकरता ?...

तिच्या आईबापांचा आणि अनवरचा शोध त्यानें दुप्पट जोराने सुरू केला.

महिनाभर गेला असेल. बसमधून एक दिवस मन्मथ बाजारात चालला होता. राणीला सुखी कसें करावें, ह्याविषयींच त्याचे विचार चालले होते. येवढ्यात त्याच्या पुढल्या जागेवर एक तरुण येऊन बसला आणि मन्मथ आपल्या विचारातून जागा झाला.

त्या तरुणाकडे पाहताच त्याला भास झाला की आपण त्याला कुठेतरी पाहिलें आहे. पण कुठे तें कांही आठवेना. त्याने खूप विचार केला,–पण छट् ! आपण त्याला कुठे पाहिलें आहे, किंवा त्याचें नांव काय,–त्याला कांहीच सुचेना. अखेरीस त्याने त्या तरुणाला विचारलें, " माफ करा, पण आपणाला मीं कुठंतरी पाहल्यासारखं वाटतं ! "

त्या तरुणाने त्याच्याकडे पाहिलें, त्याने कांहीच ओळख दाखवली नाही तो सहज म्हणाला, " पाहिलं असेल पूर्वी कधीतरी इथंच दिल्लींत ! "

मन्मथ थोडा वेळ गप्प बसला. पण त्याला सारखें वाटत होतें की हा तरुण आपल्या चांगलाच ओळखीचा आहे; आपण त्याला पुष्कळ वेळां पाहिलेलें आहे. पण कुठे तें त्याला आठवेना, की तो विचारहि त्याच्या मनांतून जाईना. अखेरीस न राहवून त्याने त्या तरुणाला विचारलें, " माफ करा, पण आपलं नांव जरा सांगाल का?"

'तूं वेडा तर नाहीस ना ?' असा प्रश्न विचारणाऱ्या दृष्टीने त्या तरुणाने मन्मथकडे पाहिलें. मग तो, ' नको ही ब्याद ' अशा स्वरांत, तुटकपणाने उद्‌गारला, " अनवर. "

" अनवर ? " आश्चर्याने मन्मथ म्हणाला. मग त्याचा चेहरा एकदम आनंदाने उजळला. त्याने आपल्या बंडीचे खिसे चाचपले, आणि त्यांतून राणीजवळचा अनवरचा फोटो बाहेर काढला. त्यानें दोघांमधले साम्य

ताडून पाहिलें आणि मग तो एखादा महान् शोध लागल्यासारखा ओरडला, "ओऽहो! अनवर" आणि त्याने अनवरचे हात आपल्या हातांत घट्ट दाबून धरले.

अनवरला वाटले, आपण एका वेड्याच्या तावडींत सापडलों आहोंत. मन्मथ त्याला म्हणाला, "भाई, माझ्याबरोबर माझ्या घरीं चल. तुला एक अत्यंत आनंदाची बातमी देईन मी !"

अनवर त्याच्याकडे शंकायुक्त दृष्टीने पाहात राहिलेला पाहून मन्मथ म्हणाला, "खरंच, पागल झालोंय् मी !–आनंदानं ! तुम्हांला माझी ओळख आधी करून द्यायला पाहिजे होती, नाही का ?"

नंतर तो फोटो अनवरला दाखवून मन्मथ म्हणाला, "हा फोटो पहा. आपलाच आहे ना हा ?"

अनवरला बाहेरच्या खोलीत बसवून मन्मथ धावतच राणीकडे गेला आणि तिला म्हणाला, "राणी, मी आज तुझ्याकरता काय आणलंय् सांग !"

"मला काय ठाऊक !" राणी जरा रागांतच म्हणाली.

"अगदी तुझ्या आवडीची वस्तु आहे. तीं पाहून तूं आनंदानं नाचायला लागशील !"

"माझ्या आवडीची वस्तु मला तुमच्याकडून कधीच मिळणं शक्य नाही !" राणी म्हणाली. तिच्या स्वरांत मूर्तिमंत निराशा भरून राहिली होती.

"पण तें माझ्या हातीं कुठं होतं ? असतं तर मी दिलं नसतं का ?" मन्मथ म्हणाला.

"तुमच्या हातीं नाही, तर दुसऱ्या कुणाच्या हातीं होतं ?"

"बरं तें राहूं दे. आज मी तुला काय देणार आहें ओळख ! अगदी तुझ्या आवडीची वस्तु ! जिचा तूं इतके दिवस ध्यास घेतला होतास ती!"

"होय ?" किंचित् खुलून राणीने विचारलें, "मला कसला ध्यास लागला होता, हें अखेरीस कळलं तर तुम्हांला !"

"अलबत !"

"होय ? मग माझ्याइतकी भाग्यवान् मीच !" राणी लाजून म्हणाली.

ताडून पाहिलें आणि मग तो एखादा महान् शोध लागल्यासारखा ओरडला, " ओऽहो! अनवर " आणि त्यानें अनवरचे हात आपल्या हातांत घट्ट दाबून धरले.

अनवरला वाटले, आपण एका वेडयाच्या तावडींत सापडलों आहोंत. मन्मथ त्याला म्हणाला, "भाई, माझ्याबरोबर माझ्या घरीं चल. तुला एक अत्यंत आनंदाची बातमी देईन मी ! "

अनवर त्याच्याकडे शंकायुक्त दृष्टीने पाहात राहिलेला पाहून मन्मथ म्हणाला, "खरंच, पागल झालोंय् मी !—आनंदानं ! तुम्हांला माझी ओळख आधी करून द्यायला पाहिजे होती, नाही का ? "

नंतर तो फोटो अनवरला दाखवून मन्मथ म्हणाला, "हा फोटो पहा. आपलाच आहे ना हा ? "

अनवरला बाहेरच्या खोलीत बसवून मन्मथ धावतच राणीकडे गेला आणि तिला म्हणाला, " राणी, मी आज तुझ्याकरता काय आणलंय् सांग ! "

" मला काय ठाऊक ! " राणी जरा रागांतच म्हणाली.

" अगदी तुझ्या आवडीची वस्तु आहे. तीं पाहून तूं आनंदानं नाचायला लागशील ! "

" माझ्या आवडीची वस्तु मला तुमच्याकडून कधीच मिळणं शक्य नाही ! " राणी म्हणाली. तिच्या स्वरांत मूर्तिमंत निराशा भरून राहिली होती.

" पण तें माझ्या हातीं कुठं होतं ? असतं तर मी दिलं नसतं का ?" मन्मथ म्हणाला.

" तुमच्या हातीं नाही, तर दुसऱ्या कुणाच्या हातीं होतं ? "

" बरं तें राहूं दे. आज मी तुला काय देणार आहें ओळख ! अगदी तुझ्या आवडीची वस्तु ! जिचा तूं इतके दिवस ध्यास घेतला होतास ती! "

" होय ? " किंचित् खुलून राणीने विचारलें, " मला कसला ध्यास लागला होता, हें अखेरीस कळलं तर तुम्हांला ! "

" अलबत ! "

" होय ? मग माझ्याइतकी भाग्यवान् मीच ! " राणी लाजून म्हणाली.

"खरंच, तुझं नशीब उजळलंय् आता? बाहेर चल म्हणजे तुझ्या मनांतली गोष्ट दिसेल तुला."

"बाहेर कशाला? इथंच द्या!" सकंप आवाजांत ती म्हणाली.

"काय करावं? कांहीच कळत नाही तुला!" मन्मथ म्हणाला, "अग वस्तु अशी सहजासहजी उचलून आणतां येण्यासारखी नाही. चांगली पावणेसहा फूट उंच आणि दीड फूट रूंद आहे ती वस्तु. वजन तर असेल पावणे-दोनशे पौंड!" आपल्याच विनोदावर खूष होऊन मन्मथ मोठ्याने हसला. पण त्याचें हसणें हळूहळू बंद पडलें. राणी उदास झाली होती!

"राणी, अशी दु:खी का होतेस? आता तुझं दु:ख संपलं आहे. मी आज कुणाला घेऊन आलोंय् सांगू?....." ती कांहीच बोलत नाही असें पाहून मन्मथ पुढे म्हणाला, "अनवर! बाहेर अनवर आलाय्! आता तरी हसशील?"

त्याला वाटलें होतें, ही बातमी ऐकून राणी एकदम आनंदाने वेडी होईल म्हणून. पण पाहतो तो प्रकार वेगळाच झाला होता. राणीचा चेहरा एकदम पांढराफटक पडला होता. सुकलेल्या, दबलेल्या आवाजांत तिने विचारलें, "कोण? अनवर?"

"होय!" तिच्याकडे पाहात शक्य तेवढ्या आनंदी स्वरांत बोलण्याचा प्रयत्न करीत मन्मथ म्हणाला, "होय, तुझा अनवर. मला अकस्मात् भेटला. आणि तुला आताच्या आता घेऊन जाण्याच्या तयारीनेच तो आलाय्!"

राणी कांहीच बोलली नाही. तिने भिंतीचा आधार घेतला. मग अंगांत कांहीच शक्ति नसल्याप्रमाणे ती खाटेवर बसली. तिने भकासपणाने विचारलें, "मी जाऊं?"

"हो." मन्मथ म्हणाला, "आता तुला गेलंच पाहिजे. आपलं माणूस, तुला मिळालं——"

"आपलं माणूस!" त्याच्याकडे आर्त दृष्टीने पाहत ती म्हणाली. मग तिने त्या घरावरून आपली आसुसलेली दृष्टि फिरविली आणि विचारलें, "खरंच मी जाऊं?"

"राणी, नाहीतर काय मी तुझी थट्टा करतोंय्?——अशी भयंकर थट्टा?" मन्मथ म्हणाला.

"पण मग हें घर कोण संभाळील ?" राणीने दाटलेल्या कंठाने विचारलें, "तुम्हाला स्वयंपाक कोण करून घालील ?"

"मी जाईन पूर्वीप्रमाणेच खानावळींत !" मन्मथ सहजगत्या म्हणाला, "चल आटप आता लवकर. अनवरला घाई आहे. ही ट्रंक घे. हिच्यांत तुझे सर्व कपडे भर...."

बोलता बोलता मन्मथ एकदम थांबला. राणी एकदम ओक्साबोक्शीं रडूं लागली होती. मन्मथ वेड्यासारखा उभा राहिला. थोड्या वेळाने ती एकदम रडायची थांबली. मग तिने खसकन् आपल्या कपाळावरचें कुंकू पुसून टाकलें, आणि ती एकदम उठून बाहेर जाऊं लागली.

"राणी ! पण तुझे कपडे—" मन्मथ म्हणाला.

ठेवा ते कपडे इथंच !" बाहेर जाताजाता राणी उसळून म्हणाली "बेवकूफ ! फत्तर !"

थोड्याच वेळांत अनवर राणीला घेऊन निघून गेला, आणि त्यांना निरोप देण्याकरता म्हणून दरवाजांत जाऊन उभा राहिलेला मन्मथ, राणीच्या विचित्र वागणुकीचें आश्चर्य करीत कितीतरी वेळ तसाच तिथे उभा राहिला

● ● ●

८

# नवा संसार !

[नोआखलीख्या रक्तलांछित भूमींत घडलेली ही गोष्ट. भयंकर हत्याकांडांत मृणालचा पति तिला सोडून गेला आणि ती परधर्मीयाच्या घरची बटीक झाली. योगायोगाने तुषार परत येऊन नव्या संसाराचीं चित्रें रंगवूं लागला. या मानी मृणालने ज्या नव्या संसारांत पदार्पण केलें तो क्षण तुम्हाला स्त्रीजीवनाचें एक अबोध सामर्थ्य साकार करील.]

* * *

" मृणाल ! "

कालीच्या देवळांतून आलेल्या ह्या हाकेने मृणाल दचकून उभी राहिली.

तो आवाज तिच्या ओळखीचा होता. त्या आवाजांतील प्रेमाची आर्द्रता तिच्या हृदयाला चिरपरिचित होती. गेल्या कित्येक दिवसांत तिने तो आवाज ऐकलेला नव्हता. पुन्हा तो आवाज आपण कधी ऐकूं ह्याविषयींची आशा तिने सोडून दिलेली होती.

ती हाक ऐकताच तिच्या हृदयांत आनंदाच्या लहरी खेळून गेल्या. क्षणकाल ती स्वतःला विसरली. साऱ्या जगाला विसरली. मग तिचे ओठ किंचित् आवळले गेले. तिच्या नाजूक नाकपुड्या किंचित् विस्फारल्या गेल्या. तिचे पुष्ट उरोज खालीवर होऊं लागले....

तुषार ! भ्याड ! कशाला आला आहे आता तो ?....ती स्वतःशींच रागाने उद्गारली.

रोजच्याप्रमाणे आजहि मृणाल आपल्या घरांतून बाहेर पडली होती.

तिच्या कडेवर पाण्याचा घडा होता. रोज सकाळची ती आपल्या घरून निघून तळ्यावर पाणी भरण्याकरता जाई. ती ज्या पायवाटेनें जात असे ती पायवाट नारळीपोफळीच्या उंचउंच झाडींतून जात असे. आजूबाजूला भाताचीं शेतेंच शेतें क्षितिजापर्यंत पसरलेलीं असत. नोआखलीची ती सुजला सुफला भूमि दोन्ही हातांनी मानवावर निसर्गसौंदर्याची आणि समृद्धीची बरसात करीत होती.

भारताच्या त्या हिरव्यागार शेतांतून, नारळीपोफळीच्या झाडांच्या शीतल छायेंतून, मृणाल रोज पाणी भरण्याकरता जात असे. साधारण अर्ध्या वाटेवर ते कालीचें देऊळ होतें. त्या देवळाकडे पाहिलें की तिचे हात जुळूं लागत. पण ती लगेच मनाला आवरी आणि त्या देवळाकडे तुच्छतेचा एक कटाक्ष टाकून पुढे निघून जाई.

काली ! शक्तीची देवी ! कुठे गेली ती शक्ति ? येवढ्या लोकांचे संसार उध्वस्त झाले–येवढ्या लोकांच्या कत्तली झाल्या–येवढ्या बायाबापड्यांची अब्रू गेली–कितीतरी बिचाऱ्या परधर्मीयांच्या रखेल्या होऊन राहिल्या–त्या वेळी कां नाही ह्या कालीमातेने आपल्या अष्टभुजा शत्रूवर उगारल्या? शक्तीची उपासना करणारे तिचे भक्त न लढता कां पळून गेले ? उभे राहून त्यांनी लढाई कां दिली नाही ? रजपूताप्रमाणे आपल्या बायकामुलांना आपल्या हातांनी कंठस्नान घालून, मग लढता लढता आपणहि कां मेले नाहीत ? भ्याडांसारखे, आपल्या बायकामुलांना त्या क्रूर लांडग्याच्या तोंडात सोडून ते कां पळून गेले ?. . . .

रोज जातायेताना ती कालीच्या देवळाकडे पाही. त्या देवळाभोवती झाडेंझुडपें मन मानेल तशीं वाढलेलीं होतीं. देवळांत कोळ्यांच्या जाळ्यांचीं जळमटें वाढलेलीं होतीं. कित्येक दिवसांत देवळांत झाडलोट झालेली नव्हती. कित्येक दिवसांत देवळांत नंदादीप लागलेला नव्हता. घंटा वाजलेलीं नव्हती. देऊळ भ्रष्ट करण्याचा एकहि मार्ग मुसलमानानी बाकी ठेवलेला नव्हता. त्या देवळाजवळून जातांना किती दुर्गंधी येई ! नाकाला पदर लावल्याशिवाय तेथून जाणेंदेखील अशक्य झालें होतें––

एके काळीं–वर्षभरापूर्वीच––पूजेच्या दिवसांत ह्याच देवळांत मोठा उत्सव होई. घंटानिनादाने आणि शंखांच्या पवित्र ध्वनीने सारें आसमंत निना-

दून जाई. नारळीपोफळीचे वृक्ष आनंदाने माना डोलावून नाचूं लागत. कालीच्या जयघोषाने सर्वत्र आनंदाचें आणि समृद्धीचें वातावरण पसरलेलें असें....

आणि आज त्या कालीची ही काय विटंबना झाली आहे! कालीचीच काय–तिच्या साऱ्या भक्तांचीहि–आपलीहि––

मोठा दंगा पेटला होता. घरें पेटत होतीं. रक्ताच्या चिळकांड्या उडत होत्या. किंकाळ्या आकाशाचा भेद घेत होत्या....

आणि लोक पळत होते–जीव घेऊन पळत होते–बायकामुलांना तसेंच सोडून देऊन पळत होते—

आपणाला सोडून तुषारहि असाच पळून गेला होता आणि आता आपण फझलूलबरोबर राहात आहों. त्याची पत्नी म्हणून–त्याची रखेली म्हणून–त्याची बटीक म्हणून––

"मृणाल!" तिच्या कानावर पुन्हा तीच कातर आवाजांतली हाक येऊन पडली. ती विचारांच्या तंद्रींतून भानावर आली. तिने देवळाच्या ओसरीकडे पाहिलें. तेथल्या घाणींतून भिंतीच्या आडोशाने लपून बसलेल्या तुषारचें तोंड तिला दिसलें––

तुषार! आपला पति! ज्याच्यावर आपण जिवापलीकडे प्रेम केलें–जो आपला स्वामी होता–जो पति जन्मोजन्मीं मिळावा म्हणून आपण व्रतें केलीं होतीं आणि ज्याचें आपणावरहि प्राणांतिक प्रेम होतें–ज्याच्या सहवासांत तीन वर्षें आपण स्वर्गतुल्य आनंदात काढलीं–तो तुषार!

एखाद्या पटांगणावर दोन मस्त हत्तींची साठमारी सुरू व्हावी, तशी तिच्या मनाची स्थिति झाली. एका बाजूने तुषार आलेला पाहून तिच्या मनांत आनंदाच्या ऊर्मि उठूं लागल्या; तर त्याचवेळीं दुसऱ्या बाजूने भित्र्या तुषारविषयींचा त्वेष तिच्या मनांतून उफाळून आला. ती तशीच निश्चल उभी राहिली.

"मृणाल, मी तुला भेटायला आलों आहें–" तुषार म्हणाला.

तोच तो आवाज! ज्या आवाजाने तिच्या कानांत प्रेमाच्या अमृताचे शब्द ओतले होते! तीच ती भावनावशता–तीच ती प्रेमाची आर्द्रता!......

"मृणाल! जरा माझ्याशीं बोल ना! मला तुझ्याशीं खूपखूप बोलायचं आहे!" तुषार म्हणाला.

मृणालच्या हृदयांत कालवाकालव झाली. क्षणभर ती त्याच्यावरचा राग विसरून गेली. थरथरतीं पावलें टाकीत ती देवळाजवळ गेली.

तुषार तेथे बसला होता, शिकारी कुत्रा मागे लागलेल्या एखाद्या सशाप्रमाणे भयभीत होऊन लपून बसला होता. त्याच्या डोळ्यांत प्रेम होतें—आणि भीतिहि होती.

मृणालला वाटलें, कंबरेवरचा घडा फेकून द्यावा, एकदम धावत जावं आणि तुषारच्या गळ्यांत मिठी मारावी. त्याच्या डोक्यावरील केसांमधून हळूवारपणाने आपलीं बोटं फिरवावीं—

पण ती जागची हलली नाही. डोळ्यांच्या पापण्या न हलवता ती तुषारकडे पाहात निश्चल उभी राहिली.

तिच्या डोळ्यांतील भकासपणा पाहून तुषारच्या हृदयांत कालवाकालव झाली. तो भावनावेगाने म्हणाला, "मृणाल, मी तुला न्यायला आलों आहें. तुला कलकत्त्याला न्यायला आलों आहें!"

"मला न्यायला?" मृणालने विचारलें. "मग मला सोडून पळून कां गेलां होतां? तेव्हाच मला कां नाही नेलं?"

"मृणाल, क्षमा कर. त्या वेळीं काय झालं नि कसं झालं हें मला कांहीच कळत नाही! मला एवढंच आठवतं की मला त्या वेळीं खूप भीति वाटली—सर्व लोकांना त्या वेळीं भीतीनं घेरून टाकलं होतं, तसंच मलाहि घेरून टाकलं होतं. माझी विचारशक्ति त्या वेळीं नाहीशी झाली होती! मी काय करतों आहें, त्या वेळीं मला कळत नव्हतं. इतर लोक पळूं लागले आणि त्यांच्याबरोबर मीहि पळूं लागलों!"

"त्या वेळीं तुम्हांला माझी आठवण झाली नाही?" मृणालने विचारलें.

"नाही झाली!" तुषार भावनाकुल आवाजांत म्हणाला, "मृणाल, तेव्हा मी भ्याड बनलों होतों. त्याची माझी मलाच आता शरम वाटते! हा जीवदेखील मी ठेवला नसता; पण मला आशा वाटत होती—तूं मला केव्हातरी भेटशील—आणि आपण पुन्हा नव्या संसाराला सुरवात करूं. ह्याच आशेवर मीं जीव टांगून ठेवला आहे. मृणाल, चल माझ्याबरोबर कलकत्त्याला.

मृणाल खिन्नपणें हसली. ती म्हणाली, तें आता कसं शक्य आहे!"

"कां? तुझं माझ्यावर अजूनहि प्रेम नाही का?"

" तें मी काय सांगूं ?" त्या वेळीं जो वणवा पेटला होता, त्या वणव्यांत माझ्याहि मनांतल्या प्रेमाची राख होऊन गेली असेल ! मला कांहीच कळत नाही ! त्या वेळीं मी जें भोगलं-त्याच्यापुढे कोठलीहि पवित्र वस्तु, भावना, जिवंत राहणं कसं शक्य आहे !" मृणाल म्हणाली. तिची दृष्टि कालीच्या मंदिराकडे गेली. जणूं अभावितपणें ह्या मंदिरासारखीच आपल्या मनाचीहि स्थिति झालेली आहे असें ती सुचवीत होती.

" असं म्हणूं नकोस मृणाल ! माझं तुझ्यावर अजूनहि पूर्वीसारखंच प्रेम आहे-आणि तुझंहि माझ्यावर पूर्वीइतकंच प्रेम आहे ! मला ठाऊक आहे ! तुझं माझ्यावरचं प्रेम कधीहि कमी होणं शक्य नाही !"

" कुणास ठाऊक ! परिस्थिति बदलली आहे. लोक बदलले आहेत. भावनाहि बदलेल्या आहेत !" विषण्ण स्वरात मृणाल म्हणाली. मग तिचा स्वर किंचित् क्रोधायमान झाला. ती म्हणाली, " तुम्ही मला सोडून गेलांत-त्या कसायांच्या हातांत एकटीला सोडून गेलांत !-मला तुम्ही तळहातावरच्या फोडासारखं वागवीत होतां-हें झालं तरी कसं तुमच्याच्यानं ?"

तुपारच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु वाहूं लागले. तो म्हणाला, " मृणाल, मघां मीं सांगितलं ना की मी भ्याड बनलों होतों. मी काय करत होतों हेंच मला कळत नव्हतं !-पण मृणाल झालं गेलं तें जाऊं दे -कलकत्त्यांत मीं दुकान थाटलं आहे. थोडाफार जमहि बसला आहे. थोडी स्थिरस्थावर होताच तुला-माझ्या मृणालला-घेऊन जाण्याकरता मी आलों आहें ! चल, येतेस ना माझ्या बरोबर ?"

" तुमच्या बरोबर मी येऊं ?" क्षणभर तिचा आवाज आनंदाच्या भावनेनें खळखळला. मग ती रुद्ध स्वरांत म्हणाली, " तें आता कसं शक्य आहे? मी आता फजलूलची बटीक आहें ! आपलं घर-आणि तिथली गृहिणीहि-ह्यांचा फजलूल आता उपभोग घेतो आहे. तोच आता आमचा स्वामी आहे !"

" मृणाल, तुला इथंच रहावंसं वाटतं का ?"

" होय ! इथंच ह्या नरकांतच राहणं मला आता भाग आहे ! माझ्या नशिबीं आता तेंच लिहिलेलं आहे !"

" नाही ! मृणाल-असं कधी होणार नाही. तूं माझ्याबरोबर चल. हे मधले दिवस आपण विसरून जाऊं आणि पुन्हा नव्या संसाराला सुरवात

करूं. कलकत्त्याला माझं छोटंसं बिऱ्हाड आहे. तें आपल्या मालकिणीची किती आतुरतेनं वाट पाहातं आहे!"

"पण तें आता कसं शक्य आहे? ह्या भ्रष्ट देहाने मी तुमच्या गृहिणीची भूमिका कशी सजवूं? ...मी...मी...जिवंतदेखील राहिलें नसतें. मला कित्येकदा वाटे जीव द्यावा—पण मग वाटे–कशाला मीं जीव द्यायचा! जो माझा पति मला सोडून भिऊन पळून गेला, कदाचित् तो आता भारतांत कुठंतरी मजेंतहि असेल–त्याच्याकरता मीं जीव द्यायचा?–आणि म्हणूनच मी अजूनपर्यंत ह्या नरकांतहि जिवंत आहें."

"मृणाल, तूं जीव दिला नाहीस हें फार बरं केलंस! तूं जीव दिला असतास तर मलाहि जगतां आलं नसतं–पण तें राहूं दे! तूं परत येशील ह्या एकाच आशेवर जीव टांगून मीहि अजून जिवंत आहें. तेवढ्याचकरता अनेक संकटांना तोंड देऊन मी आज इथं आलों आहें. मी अगदी गुप्तपणानं आलों आहें. आपण आज संध्याकाळीं अंधार पडल्याबरोबर गुप्तपणानं इथनं निघून जाऊं!"

तुषार बोलत होता. त्याचा शब्दन्‌शब्द प्रेमाच्या भावनेने ओथंबलेला होता. मृणालला त्याचे शब्द अतिशय मधुर वाटत होते. भविष्यकाळाविषयीं आशा फुलविणारे ते शब्द होते. मध्यंतरीचा काळाकुट्ट कालखंड लुप्त करण्याचें सामर्थ्य त्या शब्दांत होतें. त्या शब्दांची विलक्षण मोहिनी मृणालच्या मनावर पडत होती. तिच्या करपून गेलेल्या मुद्रेवर क्षणकाल तजेला पसरला. तिचे भकास डोळे आनंदाच्या भावनेने चमकूं लागले. तुषार म्हणत होता,

"मृणाल आज संध्याकाळीं तूं इथं ये. ह्या देवळांत मी तुझी वाट पाहात राहीन. तूं येताच आपण इथनं निघून जाऊं-कलकत्त्याला जाऊं-आपल्या जीवन-पटांत हा जो खंड पडला आहे तो पुन्हा एकदा सांधूं–मृणाल, येशील ना?..."

"येईन!" मृणालच्या तोंडांतून शब्द बाहेर पडले.

"येशील ना?" आनंदाच्या उत्सुकतेच्या स्वरांत तुषार उद्‌गारला, "नक्की येशील ना?"

"हो येईन!" मृणाल म्हणाली, "मी जातें आता. फार उशीर झाला. कोणाला संशय येईल!"

तिने तुषारकडे एकदा प्रेमार्द्र नजर टाकली आणि ती झपझप पावलें

टाकीत घराच्या दिशेने चालू लागली. थोडें अंतर चालून गेल्यावर तिने एकदा मागे वळून पाहिलें. तुषार मान उंच करून तिच्याकडे वेड्यासारखा पाहात होता.

मृणाल घरापाशीं आली. फजलूलचा अवाढव्य देह दरवाजांतच उभा होता. मृणाल कसल्या तरी तंद्रींतच रस्ता चालत होती. फजलूलला पाहाताच ती एकदम भानावर आली. जणूं तिची स्वप्नसृष्टि भंग पावली आणि वस्तुस्थितीची तिला जाणीव झाली.

"इतका वेळ कां लागला आज पाणी आणायला ?" फजलूलने किंचित् संशयाच्या आणि किंचित् रागाच्या स्वरांत प्रश्न केला.

"अं ?" मृणाल गोंधळून म्हणाली, तळ्यावर रोशनबी भेटली होती, तिच्याबरोबर थोडा वेळ बोलत होतें !"

"रोशनबी बिशनबी कुछ नही !" फजलूल तिच्याकडे आपली क्रूर दृष्टि रोखून म्हणाला, "कोणाशीं एक शब्दहि बोलावयाचा नाही म्हणून तुला ताकीद दिली आहे ना मी ?"

मृणालच्या मनांत फजलूलविषयीं तिरस्कार भरून राहिलेला होता. फजलूलचे हात निरपराध जीवांच्या रक्ताने माखलेले होते. त्याचे डोळे राक्षसी कामवासनेने ओथंबलेले होते. तिला त्याची किळस येई. त्याने तिला स्पर्श केला की तिला मळमळल्यासारखें होई. पण ती त्याची 'बिबी' होऊन राहिली होती तुषारच्या रागामुळें ती हें जीवन कंठीत होती. भ्याड, पळपुट्या तुषारवर आपण सूड उगवितों आहोंत असें विचित्र समाधान ह्या नरकयातना भोगतांना तिच्या मनाला वाटत होतें.

"तूं खोटं बोलते आहेस !" फजलूल गरजला. मृणालच्या तोंडावर आज कांही निराळेंच समाधान दिसतें आहे, हीं गोष्ट त्याच्या तीव्र शिकारी दृष्टीतून निसटली नव्हती. ती येत असताना कोठल्यातरी सुखस्वप्नांत असल्या-प्रमाणें रस्ता चालत होती, आजूबाजूच्या जगाची तिला शुद्ध नव्हती. हें त्याने ओळखलें होते. त्याने दरडावून विचारलें, "कोण भेटलं होतं तुला, सांग– कोणाशीं गुलगुल गोष्टी करीत होतीस !"

मृणाल एकदम दचकली. आपण तुषारशी बोलत असतांना फजलूलने पाहिलें तर नाही ना ? अशी शंका तिच्या मनाला चाटून गेली. कालीचें मंदिर

तिच्या घरापासून फर्लांगभरच अंतरावर होतें आणि तेथे आपण कोणाशीं तरी बोलत होतों हें फजलूलने पाहिलें असणें अगदी शक्य होतें. तसें असेल तर तो तुषारच्या शरीराचीं खांडोळीं केल्याशिवाय राहणार नाही. आपलेहि अनन्वित हाल केल्याशिवाय राहणार नाही...एक क्षणभरच मृणालच्या मनांत मोठी वावटळ उठली. मग ती वावटळ एकदम शांत झाली. तिचा एक विचार ठाम झाला होता. स्त्री-चरित्र अतर्क्य असतें हेंच खरें !

मनाचा धीर करून ती म्हणाली, "काय सांगू तुम्हांला ? मला कोणी रस्त्यांत हटकील–तुमच्या बिबीला कोणी रस्त्यांत हटकील–असं नव्हतं वाटलं मला ! "

" काय ? काय म्हणालीस ? ह्या फजलूलमियाच्या बिबीला रस्त्यांत कोणी हटकलं ? कोणी हटकलं ?–"

" तुषारबाबू आले आहेत ! "

" तुषारबाबू ? तुझा नवरा ? तुला टाकून भिऊन पळून गेला तो डरपोक ? "

" होय, त्यांनीं मला हटकलं ! "

" मुडदा पाडतों त्याचा ! ह्या फजलूलमियाची बिबी म्हणजे काय तो एखाद्या पळपुट्या बाबूची औरत समजला काय !—काय म्हणाला तो ?" मुठी आवळत फजलूलने विचारलें.

" ते म्हणाले, आपण कलकत्याला पळून जाऊं !"

" आणि मी जिवंत असताना ! सारी दुनिया पालथी घालीन–पण तुला मी परत खेचून आणीन ! काय सांगितलंस तूं त्याला ? "

" मी येईन म्हणालें ! "

" काय ? " ओरडून फजलूल म्हणाला. " तू पुन्हा त्या हिजड्याकडे जाणार ? आणि मग तूं जिवंत राहशील ? "

" पण ऐका तरी ! " मृणाल त्याच्याकडे एक प्रेमाचा कटाक्ष टाकून म्हणाली, " त्यांना जाळ्यांत अडकवण्याकरता मी तसं कबूल केलं ! आज संध्याकाळीं कालीच्या देवळांत ते मला भेटणार आहेत. "

" शाबास रे मेरी बिबी ! " फ़जलूल खूष होऊन म्हणाला, " मोठी

हुषार आहेस तूं. कालीसभोर आज संध्याकाळीं त्या बोकडाचा बळी देतों पहा ! ”

फजलूलने आपला सुरा बाहेर काढला. तो बोटावरून फिरवून त्याला धार आहे की नाही ह्याची परीक्षा केली. धार चांगली तीक्ष्ण आहे अशी खात्री करून घेऊन त्याने तो सुरा आपल्या खिशांत ठेवून दिला आणि तो अस्वस्थपणानें येरझाऱ्या घालूं लागला.

संध्याकाळीं फजलूल सुरा घेऊन बाहेर पडला. मृणालने त्या राक्षसास घरांतून बाहेर पडतांना पाहिले. तिच्या मुखावर समाधान झळकत होतें. फजलूल परत केव्हा येतो ह्याची ती वाट पहात राहिली.

सूर्य झपाट्याने अस्ताला चालला होता. नारळीपोफळीच्या छाया क्षणाक्षणाला ताणल्या जात होत्या आणि अस्पष्ट होत होत्या. बाजूच्या घरांच्या छपरांतून संध्याकाळच्या स्वयंपाकाचा धूर शांतपणाने गिरक्या घेत आकाशात चढत होता. मृणाल दरवाजांत उभी होती आणि देवळाकडे जाणाऱ्या फजलूलच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात होती.

फजलूल दिसेनासा झाला. सायंकाळचे रूपांतर रात्रींत होत होतें. नारळीपोफळीच्या झाडांतून भेसूर छाया पळाल्याचा भास होत होता......

येवढ्यांत कालीमंदिराच्या दिशेने एक अस्पष्टशी किंकाळी आल्याचा मृणालला भास झाला...

थोड्याच वेळात फजलूल परत आला. त्याच्या हातांत सुरा होता. त्यांतून रक्त ठिबकत होतें.

“ बरोबर छातीतच मारला सुरा ” छाती पुढे काढून फजलूल म्हणाला. “ कलेजांतच घुसला असेल–मिनिटभरांतच सारा मामला खलास झाला ! ”

मृणालने त्याच्याकडे पाहिलें. तिच्या दृष्टींत त्याला आपल्या पराक्रमाविषयींचे कौतुक दिसलें. औरत मर्दावरच भाळणार, तो मनांतल्या मनांत म्हणाला आणि खूष झाला.

“पाहूं ! पाहूं तो रक्तानें भरलेला सुरा–” मृणाल एकदम वेड्यासारखी धावत त्याच्याकडे गेली आणि त्याला समजण्यापूर्वींच तिने तो सुरा त्याच्या हातांतून काढून घेतला. तिनें तो सुरा वर उचलला आणि ती वेड्या-

सारखी हंसून म्हणाली, " त्यांच्या कलेजांत गेला ! हें रक्त त्यांच्या कलेजांतलं आहे ! ..."

तिच्या डोळयांत कांहीतरी विचित्र तेज चमकूं लागलें. त्या तेजानें फजलूलदेखील जागच्याजागीं खिळून उभा राहिला. मृणाल म्हणाली, "मला घेऊन जाणार होते ते ! ह्या भ्रष्ट स्त्रीला घेऊन जाऊन पुन्हा संसार थाटणार होते. पण आता कसं शक्य होतं ? पुन्हा आमचा नवा संसार पूर्वीसारखा कधीतरी झाला असता का ? छे छे ! ते कधीच शक्य नव्हतं ! आणि एकमेकांवाचून आम्हांला जगताहि आलं नसतं ! .. त्यांचं माझ्यावर प्रेम होतं—पूर्वीसारखंच प्रेम होतं ! ".

तिनें तो रक्तानें थबथबलेला सूरा वर उचलला आणि क्षणार्धात आपल्या हृदयांत खुपसून घेतला...आणि अशा विचित्र रीतीनें त्या दोन हृदयांचें पुनर्मीलन झालें !

" आपला नवा संसार ! " मृणालच्या मुखावर असीम शांति नांदत होती. ती पुटपुटली, " आता आपला नवा संसार पुढल्या जन्मीं—तुमच्या मागोमाग आलेंच मी ! "

● ● ●

१

# किलबिल

[सुलु ही वर्टींनी कल्पनेने रेखाटलेली रमणीय व्यक्तिरेखा त्यांच्या पुष्कळ कथांची नायिका आहे. चाळींतल्या कृष्णरावांच्या अनंतची 'किलबिल' छापून आल्यावर सुलू आणि तिचे पति यांनीं त्यांच्या जयंताच्या 'किलबिली' साठी केवढा आटापीटा केला हें खुमासदार-पणें सांगतांना वर्टी अलीकडील प्रवृत्तींवर नेमकें बोट ठेवतात. नर्म विनोदाने आणि उपहासाने रंगून गेलेली ही कथा वर्टींच्या अप्रतिम कथाकौशल्याचा हा एक अविस्मरणीय दाखला आहे.]

* * *

आमच्या चाळींत आमच्या बिऱ्हाडापासून चार बिऱ्हाडं सोडून कृष्ण-रावांचं बिऱ्हाड आहे. पावणेनवाच्या सुमारास आज नेहमीप्रमाणं पोस्टमन येऊन गेल्यानंतर त्यांच्या बिऱ्हाडांत एकच खळबळ उडाली. लवकरच ही खळबळ आजूबाजूच्या बिऱ्हाडांतूनहि पसरली आणि चाळींतल्या वातावरणांत एकदम फरक पडला.

नेहमी ह्या वेळेला सर्वजण आपापल्या कामांत असायचे. पुरुष माणसांना ऑफिसं आणि मुलामुलींना शाळा-कॉलेजं वेळेवर गाठतां आलीं पाहिजेत, हें एकच ध्येय डोळ्यासमोर ठेवून ह्या वेळेला चाळींतील सर्व व्यवहार चालू असत, परंतु आज कृष्णरावांकडे पोस्टमन येऊन गेल्यानंतर आस-पासच्या बिऱ्हाडामधील रोजच्या कार्यक्रमांत एकदम खंड पडला. कृष्ण-रावांचे शेजारीपाजारी त्यांच्या बिऱ्हाडांत जात. थोड्या वेळाने त्यांच्या बिऱ्हाडांतून हशाचा मोठा ध्वनि ऐकूं येई. मध्येच कोणी कृष्णरावाच्या

अनंताला उचलून घेत आणि त्याचं कौतुक करीत. कृष्णरावाच्या बिऱ्हाडांत सर्वत्र ‘ आनंदी आनंद गडे ’ असल्याप्रमाणं दिसून येत होतं.

अर्थातच मला आणि सुलूला ह्या साऱ्या प्रकाराविषयी मोठंच कुतूहल वाटूं लागलं. मी ऑफिसांत जाण्याची, छोटा जयंता शाळेंत जाण्याची व सुलू स्वयंपाकाची तयारी करीत होती; पण आमचं सारं लक्ष कृष्णरावाच्या बिऱ्हाडाकडे लागलेलं होतं. हा काय प्रकार असावा, ह्याविषयी आम्ही तर्कवितर्क करू लागलों.

“ त्यांना कोडयांत बक्षिस तर नाही मिळालं ? ” मी एकदम घोगऱ्या आवाजांत विचारलं, “ चांगल पंचवीस तीस हजाराचं बक्षिस मिळाल्यासारखं दिसतंय ! ”

“ बक्षिस मिळालं असतं तर अनंताचं गोडकौतुक कशाला ? ” सुलूनं शंका व्यक्त केली.

“ अनंताच्या नांवावरच कोडयाचे चौकोन भरून पाठवले असतील आणि तो पहिल्या बक्षिसाचा मानकरी ठरला असेल ! ” मी म्हणालों

“ पण पहिलं बक्षिस मिळण्याइतके कृष्णराव कुठं हुशार आहेत ? ” सुलू म्हणाली, “ ते तर मॅट्रिक देखील नाहीत ! ”

“ कोडयांत बक्षिस मिळायला थोडीच अक्कल लागते ? ” मी म्हणालों.

कृष्णरावाचा नि आमचा तसा कांहीच संबंध नव्हता, त्यांचे पंचवीस हजार रुपये गेले असते काय किंवा त्यांना शब्दकोडयांत पंचवीस हजार रुपये मिळाले असते काय, त्याचं आम्हाला कांहीच सोयरसुतक नव्हतं; परंतु दुसऱ्याला असा कांहीच काम न करता घरबसल्या पैसा मिळाला तर तें माणसाला आवडत नाही. तो मनुष्यस्वभावच आहे.

आम्ही आमचे नित्य नैमित्तिक कार्यक्रम पार पाडीत होतों; परंतु आमचं सारं लक्ष कृष्णरावाच्या बिऱ्हाडाकडे आणि त्यांतून बाहेर पडणाऱ्या आनंदनिदर्शक विविध प्रकारच्या ध्वनींकडेच होतं. काय प्रकार घडलेला आहे आणि कृष्णराव एवढा आनंदोत्सव का साजरा करीत आहेत, हें जाणून घेण्याकरिता आम्ही अतिशय उत्सुक झालों होतों.

आणि आम्हाला फार वेळ ताटकळत बसावं लागलं नाही. एका हातांत अलीकडे मराठींत जे पाचकांचें (डायजेस्ट–टाईप मासिकाचें) पीक निघालेलं आहे, त्यातील एका मासिकाचा जादा अंक घेऊन आणि दुसऱ्या हातानं अनंताला धरून कृष्णराव शेजारपाजारच्या बिऱ्हाडांना भेटी देऊन अखेर आमच्याकडे आले.

कृणरावाच्या तोंडावर विजयोन्माद ओसंडत होता. ह्या चाळींत राहणाऱ्या ह्या भुक्कड लोकांपेक्षा आपण कोणीतरी विशेष आहोंत हा भाव त्यांच्या तोंडावर आणि त्यांच्या प्रत्येक पावलात दिसत होता. एखाद्या रेस जिंकलेल्या घोडयाचा हातांत लगाम धरून त्याचा मालक ज्या ऐटीनं रेसकोर्सवर फिरतो, तशी ऐट त्यांच्या अनंताचा हात धरून फिरण्यात होती. अनंतानं कांही तरी मोठी बहाद्दरी गाजवलेली होती, हें अगदी स्पष्ट दिसत होतं.

"या, या!" मी त्यांचं स्वागत केलं.

"कांही नाही. जरा बाहेर चाललों होतों, म्हटलं तुम्ही आहात का सहज डोकावून पाहावं!" कृष्णराव म्हणाले.

"या–या कीं!" मी म्हणालों.

कृष्णराव खुर्चीवर बसले. त्यांनी आपल्या हातांतील 'पाचक' मुद्दाम माझ्या नजरेंत भरेल अशा रीतीनं धरलं होतं. मी त्याविषयीं कांहीतरी विचारावं, अशी त्यांची इच्छा दिसत होती.

"काय आहे तें?" मी विचारलं.

"का? ठाऊक नाही का तुम्हाला हे नवं मासिक? फार सुरेख असतं तें!" कृष्णराव म्हणाले.

कोणत्या कारणामुळे कृष्णरावाच्या बिऱ्हाडांत आज एवढा आनंद साजरा होत होता, तें विचारण्याकरता सुलू मला आतल्या खोलींतून सारखी खुणावीत होती म्हणून मी कृष्णरावांना विचारलं, "आज काय तुमच्या घरीं विशेष गडबड दिसते?"

"कांही नाही हो. ह्या पाचकांत आमच्या अनंताची एक किलबिल छापून आली आहे." कृष्णराव सहज म्हणाले; परंतु ह्या बातमीनं आम्ही विस्मयचकित होऊन जावं, अशी त्यांची अपेक्षा स्पष्ट दिसत होती.

"किलबिल?" मीं विचारलं.

"हो किलबिल म्हणजे, ह्या चिमण्या पाखरांची, म्हणजे लहान मुलांची किलबिल. लहान मुलं पुष्कळदा गमतीदार बोलतात. ती वाक्यं आपण ह्या मासिकाकडे पाठवली कीं, त्यांतील निवडक वाक्यं ही मासिकं छापून काढतात आणि आपणाला एक रुपया आणि एक अंक मिळतो." कृष्ण-रावांनी स्पष्टीकरण केलं.

"मग अनंताची एखादी किलबिल आली आहे की काय छापून?" मी विचारलं

"होय तर!" कृष्णराव छाती फुगवून म्हणाले, "आमचा अनंता नेहमी मजेशीर बोलतो. तें ऐकून आमची हसून हसून मुरकुंडी वळते. असेच एकदा दिलं आम्ही सहज एक वाक्य पाठवून–नि आज पाहतों तर तें छापून आलंय्!"

कृष्णरावांचा आनंद कोडयांतल्या बक्षिसाचा नसून ह्या साध्या किल-बिलीकरताच आहे, हें कळल्यावर मला जरा बरं वाटलं. सुलूनं सोडलेला. एक समाधानाचा सुस्काराहि मला आंतील खोलींतून स्पष्ट ऐकू आला.

"पाहूं काय किलबिल केलीय तुमच्या अनंतानं?" मी म्हणालों. कृष्ण-रावांनीं मोठया आनंदानं तें पाचक माझ्या हातांत दिलं. मी तें सहज उघडलं, तर किलबिलीचंच पान बरोबर उघडलं, इतक्या वेळां तें पान उघडून कृष्णरावांनीं लोकांना दाखवलं होतं. अंकांतील बाकीची सारी पानं कोरी करकरीत दिसत होती. किलबिलीचं पान मात्र सारखं हाताळून त्याच्यावर डाग पडले होते.

कृष्णरावांच्या अनंताची किलबिल कोणती असावी हें मी पाहूं लागलों, एवढयांत कृष्णराव म्हणाले, "ते 'देवाघरची टयूबलाईट!' वाचा–तिसरी किलबिल."

'देवाघरची टयूबलाईट!' मी मनांतल्या मनांत वाचूं लागलों. तेव्हां कृष्णराव म्हणाले, "मोठयानं वाचा की, म्हणजे सुलूवहिनींनाहि ऐकायला मिळेल."

मग मी घसा खाकरून मोठयानं वाचूं लागलों.

"देवाघरची टयूबलाईट!

आमचा अनंता चार वर्षांचा आहे. तो नेहमी फार मजेदार बोलतो. त्याच्या एक, एक कल्पना ऐकल्या की मन चकित होऊन जातें.

एकदा मी अनंताला घेऊन एका मित्राकडे गेलों होतों. पावसाळ्याचे दिवस होते. वेळ संध्याकाळीं सातच्या सुमाराची होती. त्या मित्रानं त्याच्या घरीं नवी ट्यूबलाईट घेतली होती. ती मित्रानं पेटवली. एकदोनदा चमकून ती पेटली.

थोड्या वेळानं आम्ही घरीं जावयाला निघालों. माझा मित्र अंगणांत पोहोचवावयास आला होता. एवढ्यांत आकाशांत वीज चमकली. त्याबरोबर अनंता म्हणाला, 'बाबा, ती पाहा देवाघरची ट्यूबलाईट!'

त्याच्या ह्या बोलण्यानं आम्ही पोट धरून हसलों."

"वाऽवा! सुरेख!" मी म्हणालों.

"किती गमतीचं बोलतो हो अनंता!" आंतून सुलू म्हणाली.

"अहो, फारच हुशार आहे तो!" कृष्णराव म्हणाले, "आमचा राम म्हणतो, पुढं त्याला मिलिटरींत घालावा, मिलिटरीत अशा हुशार माणसांची जरूर असते, तर 'ही' म्हणते, मिलिटरींत नको, त्याला आपला कलेक्टरच करूं. पण मी म्हणतों, हें दोन्हीही नको. आता तुम्हीच सांगा. एवढी तल्लख कल्पनाशक्ति असलेल्या मुलाला पुढं काय करावं?"

कृष्णरावांना ह्या प्रश्नाचं नक्की काय उत्तर अपेक्षित आहे हें ध्यानीं न येऊन मी गोंधळून गेलों, मग मी जरा विचार केला आणि म्हणालों, "तो बहुतेक एखादा कवि होईल! कालिदास, वर्ड्स्वर्थ, शेली ह्यांच्या तोडीचा."

मी एखादी 'किलबिल' केली असती तरी कृष्णराव जेवढ्या मोठ्यानं हसले नसते, तेवढ्या मोठ्यानं ते हसले आणि हसून झाल्यावर मग म्हणाले, "काय म्हणता? कवि? कवि होऊन काय मिळणार आहे त्याला? फार तर न खपणाऱ्या एकदोन कवितासंग्रहांच्या पुस्तकांचे गट्ठे! छे छे! एवढी कल्पकता असलेल्या मुलाला पुढं मंत्रीच केलं पाहिजे. आता मुंबईचा की दिल्लीचा एवढाच प्रश्न आहे!"

त्यानंतर अनंताचं आम्ही आणखी कौतुक केलं, आणि मग एखादा नंदीवाला एका घरासमोरचा कार्यक्रम आटोपून आपल्या नंदीला दुसऱ्या

घरासमोर घेऊन जातो, तसे कृष्णराव अनंताला घेऊन आमच्या शेजारच्या बिऱ्हाडी गेले.

"गमतीची होती नाही अनंताची किलबिल !"

ते गेल्यावर मी सुलूला म्हणालों.

"पण अनंताचं वय चोरलंय त्यांनीं !" सुलू म्हणाली. "आपल्या जयंतापेक्षा दीड वर्षानं मोठा आहे तो. चांगला सात वर्षांचा आहे !"

"खुजट आहे म्हणून लहान दिसतो !" मी म्हणालों.

"अन् काय ध्यान ! नाकच नाहीं–चिनी बरे दिसतात !"

"कालिदासाच्या बापानं तरी केली होती का अशी किलबिल ?"–मी.

"कृष्णरावांनीच बनवून पाठवली असेल ! अनंता तर मठ्ठोबा आहे म्हणून बाई सांगत होत्या !"

"कृष्णराव काय कमी मठ्ठोबा आहेत ! त्यांची तरी काय एवढी कल्पनाशक्ति चालणार आहे ?"

"आणि म्हणे मंत्री करणार त्याला–"

थोडा वेळ कृष्णरावांवर व त्यांच्या घरच्या मंडळींवर अशी टीका करून मीं ऑफिसांत निघून गेलों. आमचा जयंता शाळेंत निघून गेला.

"म्हटलं, ऐकलं का ?" चार-पांच दिवसांनीं स्वयंपाक करतां करतां सुलू आतून म्हणाली.

"काय ?" मी विचारलं.

"आपल्या जयंताचीही एखादी किलबिल पाठवली पाहिजे त्या मासिकाकडे. त्या कृष्णरावांचीच मेली एवढी ऐट नको !"

"पाठवूं की !" मी म्हणालों.

खरं म्हटलं तर त्या दिवशी कृष्णराव येऊन गेल्यापासून हा विचार माझ्याहि डोक्यांत घोळत होता. आमचा जयंता कृष्णरावांच्या अनंतापेक्षां निश्चितच जास्त हुशार होता. त्याची ग्रहणशक्ति चांगली आहे आणि त्याला समजतंहि फार, असं त्याचं कौतुक मॉंटेसरीच्या इंदूताई आमच्याकडे वारंवार करीत. अनंतापेक्षां अनेक पटींनी हुशार असणाऱ्या आमच्या जयंताची एखादी किलबिल सहज पाठवून देतां येईल, अशी माझी कल्पना होती.

गेल्या चारपांच दिवसांपासून आमच्या चाळींत सर्वत्र एकच विषय चर्चिला जात होता. कृष्णरावांच्या अनंताला मुंबईचा मंत्री करायचा की दिल्लीचा ? ह्या प्रश्नावरून चाळींत दोन तट पडले होते. परंतु सर्वांचं एका गोष्टीबाबत मात्र एकमत होतं, कृष्णरावांचा अनंता हा एक विलक्षण बुद्धीचा, कल्पनाशक्ति असलेला व ज्याचा भावी काळ अति उज्ज्वल आहे असा असामान्य मुलगा आहे; ही गोष्ट साऱ्या चाळीनं मान्य करून टाकलेली होती.

आमच्या जयंतासारखीं अनंताच्या बरोबरचीं जीं इतर चारपांच मुलं होतीं, त्यांच्याकडे आता कोणी ढुंकूनहि पहात नव्हतं. जो उठे तो आपला अनंताच्या किलबिलीचं कौतुक करी. हें पाहून आपल्याहि जयंताची एखादी किलबिल पाठवून द्यावी, अशी कल्पना माझ्या मनांत मधून मधून डोकावून जात होती, आणि आतां सुलूनंहि तेंच सुचवल्यानंतर मी ह्या गोष्टीवर गंभीरपणानं विचार करूं लागलों.

थोडा वेळ मी डोकं खाजवून पाहिलं; पण जयंताची एकहि किलबिल मला आठवेना. म्हणून सुलूला म्हणालों, "तूंच सांग बघू एकादी जयंताची किलबिल !"

"त्याच्या आजोबांच्या श्राद्धाच्या वेळीं केली होती ना त्यानं एक किलबिल ? ती द्या पाठवून" सुलू म्हणाली.

"कोणती किलबिल ?" मीं विचारलं.

"अहो, तो नव्हता का म्हणाला–" सुलू मध्येंच थांबली, आणि मग म्हणाली, "माझं श्राद्ध !"

"तुझं श्राद्ध ?" मीं गोंधळून विचारलं.

"अहो, हा त्याच्या किलबिलीचा मथळा आहे ! एवढं हो कसं नाही कळत तुम्हांला ? ऐका. माझं श्राद्ध. आमच्या घरीं जयंताच्या आजोबांचं श्राद्ध होतं. आमचा जयंत चार वर्षांचा आहे. तो नेहमीं फार मजेदार बोलतो. श्राद्धाच्या दिवशीं जेवणाला लाडू केले होते. दोनतीन दिवसांनीं जयंता मला म्हणाला, "आई, माझं श्राद्ध कर ना !" त्याच्या बोलण्याचा अर्थ न कळून मीं विचारलं, 'कशाला रे तुझं श्राद्ध ?' तेव्हां तो म्हणाला कसा, 'म्हणजे मग आपल्याला लाडू खायला मिळतील ना !' त्याच्या ह्या

उत्तरावर आम्ही पोट धरधरून हसलों ! का, आहे का नाहीं छान किलबिल ?" सुलूनं विचारलं.

सुलूनं मनांतल्या मनांत किलबिल तयार करून ठेवलेली दिसत होती.

"असं बोलला होता आपला जयंता ?" मीं विचारलं.

"बोलला नव्हता का—आपण किती तरी दिवस हसत होतों नंतर. तुमच्या मेलं लक्षांतच राहत नाही कांही !"

"मला नाही आठवत तो कधी असं बोलल्याचं. शिवाय ही कल्पनाहि तितकीशी वरी वाटत नाही."

"कां? त्या अनंताच्या किलबिलीपेक्षां ही किलबिल काय वाईट आहे का ?" पोळी लाटतां लाटतां थांबून सुलूनं जरा रागानं विचारलं.

"नाही—वाईट नाही—तिच्यापेक्षां चांगलीच आहे—पण जरा अभद्र वाटते आणि खरं सांगू—जयंतानं ही किलबिल केलेली मला तरी आठवत नाही बुवा !"

"तुम्ही अगदीच 'हे' आहांत !" सुलू म्हणाली.

"अनंतानं तरी तीं छापून आलेली किलबिल केली होती कशावरून ? पण आलीच ना ती छापून आणि अनंताचा भाव वाढलाच की नाही ?"

"मला नाही हें पटत," मी म्हणालों. "त्यांतून आपला जयंता त्या मठ्ठोबापेक्षा किती तरी हुशार आहे. नेहमी पहिला नंबर असतो त्याचा. तो चांगल्या चांगल्या किलबिली नक्कीच करील !"

"मग पहा तर आणि पाठवून द्या एखादी त्या मासिकाकडे. भामाबाईचा एवढा तोरा नको !" भामाबाई इति सौ. कृष्णराव.

"उद्याच पाठवतों. आज जयंतानं एखादी किलबिल केली की उद्यां पोस्टांत टाकलीच बघ !" मी म्हणालों.

"जयंताची किलबिल पाठवणं ही गोष्ट मला अगदी सोपी वाटत होती. अनंतासारखा मठ्ठ मुलगा एवढी किलबिल करूं शकतो, तर आमचा जयंता नक्कीच दिवसांतून दोनतीन तरी सुरेख किलबिली करीत असणार, असा माझा हिशोब होता. नंतर मी त्या दृष्टीनं जयंतावर पाळत ठेवू लागलों.

परंतु सांगण्याला दुःख होतं की, जयंतानं माझी फार निराशा केली. आठ दिवस होऊन गेले, तरी त्याने एकहि किलबिल केली नाही. तो अगदी

गेल्या चारपांच दिवसांपासून आमच्या चाळींत सर्वत्र एकच विषय र्चचिला जात होता. कृष्णरावांच्या अनंताला मुंबईचा मंत्री करायचा की दिल्लीचा ? ह्या प्रश्नावरून चाळींत दोन तट पडले होते. परंतु सर्वांचं एका गोष्टीबाबत मात्र एकमत होतं, कृष्णरावांचा अनंता हा एक विलक्षण बुद्धीचा, कल्पनाशक्ति असलेला व ज्याचा भावी काळ अति उज्ज्वल आहे असा असामान्य मुलगा आहे, ही गोष्ट साऱ्या चाळीनं मान्य करून टाकलेली होती.

आमच्या जयंतासारखीं अनंताच्या बरोबरचीं जीं इतर चारपांच मुलं होतीं, त्यांच्याकडे आता कोणी ढुंकूनहि पहात नव्हतं. जो उठे तो आपला अनंताच्या किलबिलीचं कौतुक करी. हें पाहून आपल्याहि जयंताची एखादी किलबिल पाठवून द्यावी, अशी कल्पना माझ्या मनांत मधून मधून डोकावून जात होती, आणि आतां सुलूनंहि तेंच सुचवल्यानंतर मी ह्या गोष्टीवर गंभीरपणानं विचार करूं लागलों.

थोडा वेळ मी डोकं खाजवून पाहिलं, पण जयंताची एकहि किलबिल मला आठवेना. म्हणून सुलूला म्हणालों, "तूंच सांग बघूं एखादी जयंताची किलबिल !"

"त्याच्या आजोबांच्या श्राद्धाच्या वेळीं केली होती ना त्यानं एक किलबिल ? ती द्या पाठवून" सुलू म्हणाली.

"कोणती किलबिल ?" मीं विचारलं.

"अहो, तो नव्हता का म्हणाला–" सुलू मध्येंच थांबली, आणि मग म्हणाली, "माझं श्राद्ध !"

"तुझं श्राद्ध ?" मीं गोंधळून विचारलं.

"अहो, हा त्याच्या किलबिलीचा मथळा आहे ! एवढं हो कसं नाही कळत तुम्हांला ? ऐका. माझं श्राद्ध. आमच्या घरीं जयंताच्या आजोबांचं श्राद्ध होतं. आमचा जयंत चार वर्षांचा आहे. तो नेहमीं फार मजेदार बोलतो. श्राद्धाच्या दिवशीं जेवणाला लाडू केले होते. दोनतीन दिवसांनीं जयंता मला म्हणाला, 'आई, माझं श्राद्ध कर ना !' त्याच्या बोलण्याचा अर्थ न कळून मीं विचारलं, 'कशाला रे तुझं श्राद्ध ?' तेव्हां तो म्हणाला कसा, 'म्हणजे मग आपल्याला लाडू खायला मिळतील ना !' त्याच्या ह्या

उत्तरावर आम्ही पोट धरधरून हसलों ! का, आहे का नाहीं छान किलबिल ?" सुलूनं विचारलं.

सुलूनं मनांतल्या मनांत किलबिल तयार करून ठेवलेली दिसत होती.

"असं बोलला होता आपला जयंता ?" मीं विचारलं.

"बोलला नव्हता का—आपण किती तरी दिवस हसत होतों नंतर. तुमच्या मेलं लक्षांतच राहत नाही कांही !"

"मला नाही आठवत तो कधी असं बोलल्याचं. शिवाय ही कल्पनाहि तितकीशी बरी वाटत नाही."

"कां ? त्या अनंताच्या किलबिलीपेक्षां ही किलबिल काय वाईट आहे का ?" पोळी लाटतां लाटतां थांबून सुलूनं जरा रागानं विचारलं.

"नाही—वाईट नाही—तिच्यापेक्षां चांगलीच आहे—पण जरा अभद्र वाटते आणि खरं सांगूं—जयंतानं ही किलबिल केलेली मला तरी आठवत नाही बुवा !"

"तुम्ही अगदीच 'हे' आहांत !" सुलू म्हणाली.

"अनंतानं तरी तीं छापून आलेली किलबिल केली होती कशावरून ? पण आलीच ना ती छापून आणि अनंताचा भाव वाढलाच की नाही ?"

"मला नाही हें पटत," मी म्हणालों. "त्यांतून आपला जयंता त्या मठ्ठोबापेक्षा किती तरी हुशार आहे. नेहमी पहिला नंबर असतो त्याचा. तो चांगल्या चांगल्या किलबिली नक्कीच करील !"

"मग पहा तर आणि पाठवून द्या एखादी त्या मासिकाकडे. भामाबाईचा एवढा तोरा नको !" भामाबाई इति सौ. कृष्णराव.

"उद्याच पाठवतों. आज जयंतानं एखादी किलबिल केली की उद्यां पोस्टांत टाकलीच बघ !" मी म्हणालों.

"जयंताची किलबिल पाठवणं ही गोष्ट मला अगदी सोपी वाटत होती. अनंतासारखा मठ्ठ मुलगा एवढी किलबिल करूं शकतो, तर आमचा जयंता नक्कीच दिवसांतून दोनतीन तरी सुरेख किलबिली करीत असणार, असा माझा हिशोब होता. नंतर मी त्या दृष्टीनं जयंतावर पाळत ठेवूं लागलों.

परंतु सांगण्याला दुःख होतं की, जयंतानं माझी फार निराशा केली. आठ दिवस होऊन गेले, तरी त्याने एकहि किलबिल केली नाही. तो अगदी

शहाण्यासारखा बोले. त्यांतून " पाठवली का किलबिल ?" म्हणून सुलू रोज आणखी माझ्याभागं सारखा लकडा लावी.

अखेरीस, दोन-तीन दिवस जयंतच्या किलबिलीची वाट पाहून थकल्यावर मीं एक योजना निश्चित केली. जयंताकडून एखादी किलबिल वदवून घ्यायची, त्याच्यासमोर अशीं दृश्यें आणायचीं की, त्याच्या तोंडांतून किल-बिल बाहेर पडलीच पाहिजे, असं मी ठरवलं आणि मग मीं त्या दृष्टीनं माझ्या हालचाली सुरू केल्या.

आज आयताच रविवार होता. मला सुट्टी होती आणि जयंतलाहि. जयंता-कडून किलबिल वदवून घेण्याकरितां आजचा दिवस मला योग्य वाटत होता. आमच्या देव्हाऱ्यांत विठोबाची एक मूर्ति होती. विठोबा कमरेवर हात ठेवून उभा होता. त्याच्याकडे पाहिलं की मला कंबरेवर हात ठेऊन कवा-यत करणाऱ्या मुलांची नेहमी आठवण होई व ही कल्पना मनांत आली की हसूंहि येई. जयंता बाहेर गॅलरींत खेळत होता. त्याला मीं बोलावून घेतलं आणि म्हणालों, " जया, हा बघ विठोबा."

जयंतानं जरा आश्चर्यानंच विठोबाकडे पाहिलं. तो किलबिल करीत नाही, असं पाहून मी सूचकपणानं म्हणालों, " त्यानं बघ कमरेवर हात ठेवले आहेत."

तरी जयंता आपला गप्पच ! तेव्हां मी म्हणालों, " देवबाप्पा कवायत करतो आहे, नाही? तुम्ही शाळेत कवायत करतांना कमरेवर हात ठेवून उभे राहतांना ? तशीच ही देवबाप्पाची कवायत !"

" अं ऽ हं देवबाप्पा कुठे कवायत करतो का ?" तो नेहमींच असा कंबरे-वर हात ठेवून उभा असतो. जयंता म्हणाला आणि पुनः खेळण्याकरता गॅलरींत पळून गेला.

माझा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला होता. मीं बराच वेळ डोकं खाज-वलं आणि पुन्हा त्याला बोलवून घेतलं. तो येताच मीं त्याला चित्र काढ-ण्याचा ब्रश दाखवला आणि म्हटलं, " ही बघ पेन्सील !"

" पेन्सिल ? " त्यानं आश्चर्यानं विचारलं.

" होय, मिशा असलेली पेन्सिल ! " मी म्हणालों.

" छट् ! ती काय पेन्सिल आहे का ? तो तर ब्रश आहे. " जयंता माझं डोकं ठिकाणावर आहे की नाही, असा संशय व्यक्त करणाऱ्या दृष्टीनं माझ्याकडे पहात म्हणाला आणि मग तो पुन्हा पळून गेला.

जयंताला सुरेख किलबिली करण्याकरता मी दोन संधि दिल्या होत्या; परंतु त्यानं माझ्याशी योग्य तें सहकार्य केलं नव्हतं. दोनदा अपयश आलं होतं; तरी धीर खचूं न देता मी पुन्हा डोकं खाजवीत गॅलरींत जाऊन उभा राहिलों. समोरच्या चाळींतील गॅलरींत एक गरोदर स्त्री उभी होती. मी जयंताला लवकर लवकर बोलावून घेतलं आणि त्याला ती बाई दाखवली.

" ती कुसुमची आई आहे. " तो म्हणाला.

" तिचं पोट बघ केवढं मोठं आहे ! " मी म्हणालों. जयंता गप्पच राहिला. तिचं पोट पाहून त्याला एकहि गमतीदार कल्पना सुचली नाही. तो म्हणाला, " ती गरवार आहे म्हणे ! "

" अरे, खूप खाऊन तिचं पोट फुगलं आहे ! " मी सूचक बोललों " ती खादाड आहे. "

" छट् ! खाऊन खाऊन का असं पोट फुगतं ? " दुढ्ढाचार्याचा आव आणून जयंता बोलला, " ती गरवार आहे ! "

जयंताविषयींच्या ह्या निराशांचा धक्का मला पुरा जाणवण्यापूर्वीच माझ्या सुदैवानं आमच्या चाळींतल्या गॅलरींतून एक ढेरपोट्या शेट्या जाताना मला दिसला. मी एकदम जयंताचं लक्ष तिकडे आकर्षित केलं आणि म्हणालों, " त्याचं पोट बघ ! "

" ढेरपोट्या आहे तो ! " जयंता म्हणाला.

" गरोदर आहे ना तो ? " मी विचारलं.

" अँ हँ हँ ! पुरुष कुठं गरवार राहतात का ? " दुढ्ढाचार्यांनी मलाच मूर्खांत काढलं.

आमचा जयंता फार हुशार आणि समजूतदार आहे, ह्याचा मला इतकें दिवस मोठा अभिमान वाटत होता. आमच्या चाळींतला कुठला एखादा मुलगा मंत्री व्हायला योग्य असेल तर तो आमचा जयंताच होय, अशी मनोमन खात्री होती; पण आज मात्र मला त्याच्या ह्या गुणाचा जरा रागच आला. मी एक निराशेचा सुस्कारा टाकला आणि आंत गेलों.

" पाठवली का जयंताची किलबिल मासिकाकडे ? " मी आंत जाताच सुलूनं प्रश्न केला. अलीकडे तर ह्या बाबतींत तिनं माझा पिच्छाच पुरवला होता. जागेपणीं, झोपेंत तिला जयंताच्या किलबिलीशिवाय दुसरं कांही दिसतच नव्हतं. जयंताची किलबिल मासिकाकडे पाठवण्याचा तिनं एकच ध्यास घेतला होता. मीं जरा रागातच उत्तर दिलं, " अजून एकहि किलबिल केली नाही त्यानं ! "

" मग ती त्या दिवशीची तरी किलबिल पाठवून द्या–श्राद्धाची ! " सुलू म्हणाली.

" अशी खोटीच पाठवायची का ? "

" मग बाकीच्या छापून आलेल्या किलबिली जशा खऱ्याच असतात ! " सुलू म्हणाली. " तसं नको. बहुधा जयंता आज किलबिल करील, असा माझा अंदाज आहे " मी म्हणालों. जयंतानं किलबिल करावी म्हणून मी आखलेली योजना अजून पूर्णपणें कार्यवाहींत आलेली नव्हती. त्याच्या किलबिलीची मला अजूनहि बरीच आशा होती.

म्हटलं, आतां जयंताला घरांतून बाहेर काढावं. बाहेर त्याला किलबिलीला स्फूर्ति देणारी अशी कांही दृश्येंहि दिसतील आणि शिवाय इथं त्याचं सारं लक्ष खेळात असतं, तेंहि त्याला किलबिल करण्याकरता एकाग्र करता येईल. मीं कपडे घातले. जयंतालाहि कपडे करायला लावले. मग आम्ही बाहेर पडलों.

जिन्याजवळच चाळीचा नळ होता. त्या नळाला पाणी गाळण्याकरता फडकं बांधलं होतं. मळल्यामुळं त्याला किंचित् भगवा रंग आलेला होता. तें फडकं पाहिलं की माझ्या मनांत नेहमी मजेदार कल्पना येई; पण पोरकट म्हणून मीं ती मनांतल्या मनांतच ठेवीत असें; पण आता ती मला आठवताच जयंताच्या किलबिलीकरिता ती बरी आहे असा विचार एकदम माझ्या मनांत आला. मी त्या नळाकडे बोट करून जयंताला म्हटलं, " तो बघ नळ ! " आणि मग मी त्याच्याकडे मोठ्या आशेनं पाहात राहिलों.

तो कांहीच बोलत नाही असं पाहून मी विचारलं, " परवा आपण कुठं गेलों होतों ? "

त्याला तेही आठवेना. तेव्हा मीच म्हणालों, " आपण आठवल्यांच्या बाळूच्या मुंजीला नव्हतों का गेलों परवा ? "

जयंतानं नुसती होकारार्थी मान हलवली. मी त्याच्या किलबिलीची मोठ्या आशेनं वाट पाहिली; पण तो कांहीच बोलला नाही.

" ह्या नळाची मुंज झाली आहे, नाही ? " अखेरीला मीच कंटाळून म्हणालों, " ही बघ त्याची लंगोटी आणि दंडा ! "

" नळाची कुठं मुंज करतात का ? " जयंता म्हणाला आणि जिन्याच्या पायऱ्या दाणदाण करून उतरून तो खाली गेला. त्याच्यामागून जड पावलानीं मीहि जिना उतरलों.

रस्त्यानं जाताना जयंता इकडची तिकडची गंमत पाहत होता आणि मी किलबिलीला एखादा योग्य विषय मिळतो का, हें धुंडाळीत होतों. एके ठिकाणीं मला एक म्हैस दिसली. तिच्या गळ्यात मण्यांची माळ होती. मी एकदम जयंताला म्हटलं, " अरे, ही बघ सौभाग्यवती. तिनं गळ्यात काय घातलं आहे ? "

मीं हा प्रश्न अशा रीतीनं विचारला होता की, कुठल्याहि मुलाच्या तोंडून ह्या वेळीं आपोआप किलबिल बाहेर पडली असती; परंतु आमचा जयंता कसला मख्ख ! तो म्हणाला, " तें कांही आईच्या गळ्यातल्या-सारखं मंगळसूत्र नाही कांही ! ती नुसती माळ आहे ! "

म्हणजे माझ्या त्या सूचक प्रश्नानं ती किलबिल त्याच्या ध्यानात आली होती तर ! पण तो पडला दीड शहाणा ना ? तो कशी किल-बिल करणार ?

मी मग त्याला राणीच्या बागेंत घेऊन गेलों. तेथील चित्रविचित्र प्राणी पाहून तरी जयंता नक्कीच किलबिल करील, अशी मला आशा होती. अगदी अखेरचीच आशा होती ती !

आम्हाला बागेंतले प्राणी दिसण्यापूर्वीच कांही फॅशनेबल मडमा दिसल्या. त्यांनी अंगावर अगदी आखूड झगे घातले होते. हाहि विषय मला किल-बिल करायला योग्य वाटला. म्हणून मी त्यांच्याकडे बोट दाखवून जयंताला म्हणालों, " अरे, त्या बाया बघ "

जयंतानं बघितलं. तो कांहीच बोलला नाही.

" त्या फार गरीब आहेत, नाही ? " ह्या किलबिलीला 'दारिद्र्य !' असा मथळा चांगला दिसेल असा मनांत विचार करीत मी म्हणालों, " त्यांच्याजवळ भरपूर कपडे घ्यायला पैसे देखील नाहीत, नाही ? "

" त्या मडमा आहेत ! त्यांचे कपडे असेच असतात, आखुड ! " आमचे बालबृहस्पति बोलले. जयंताच्या गालाची भेट घेण्याकरता माझा हात शिवशिवूं लागला, पण स्थळ आणि काळ प्रतिकूल असल्यामुळं मी तो मोह आवरला. शिवाय त्याला रडवून उपयोगी नव्हतं; गोडीगुलाबीनेच त्याच्याकडून एखादी किलबिल वदवून घ्यायला हवी होती.

त्या दिवशीं कृष्णराव आमच्याकडे येईपर्यंत जयंता म्हणजे माझा पंचप्राण होता. परंतु ह्या गेल्या आठदहा दिवसांत मात्र तो माझ्या मनांतून पार उतरला होता. ह्या वेळीं जर मागून एखादी मोटार आली असती आणि ती जयंताच्या अंगावर येण्याचा संभव असता, तर खरं पाहतां मीं त्याला बाजूला ओढलं देखील नसतं—इतका मला त्याचा राग आलेला होता. अर्थात् मी त्याला बाजूला ओढलंच असतं; कारण त्याच्या तोंडून एखादी किलबिल ऐकावयास मिळेल अशी मला अजूनहि अगदी किंचित् का होईना, पण आशा होती. ती आशा नसती, तर मात्र मी त्याला मोटारी खाली खुशाल सापडूं दिलं असतं !

आम्ही निरनिराळे चित्रविचित्र प्राणी पाहत फिरत होतों. पण जयंता कांही किलबिल करीत नव्हता की मलाहि एखादी सुंदर किलबिल सुचत नव्हती. एवढ्यांत खारे दाणे विकणारा एक माणूस ' खारे दाणे ऽऽ ' असं ओरडत असलेला मला दिसून आला तेव्हां मी जयंताला म्हटलं, ' जा खा त्याचे दाणे ! "

" तसे कसे खायचे ? ती चोरी होईल—चोरी कधी करूं नये ! " जयंता म्हणाला.

" अरे तो म्हणतोय ना ' खा रे दाणे ' म्हणून ! " मी म्हणालों.

जयंताने माझ्याकडे एका विचित्र नजरेनं पाहिलं हें बोलणारे तुम्हीच का बाबा ?—असाच प्रश्न जणूं तो मला आपल्या दृष्टीनं विचारीत होता ! मीं जरा शरमिंदा झालों, उगाच हसलों आणि आम्ही पुढं चालूं लागलों.

होता होता आम्ही हत्तीच्या आवारापाशी आलों. हत्तीविषयीची एका नाटकातली कोटी मीं ऐकलेली होती आणि ती मला आवडलेलीहि होती. नाटकांत ती कोटी म्हटली जाई, तेव्हा सर्व प्रेक्षकहि हसत. ह्यावरून ती लोकांनाहि आवडण्यासारखी होती. ती कोटीच आता किलबिल म्हणून 'खपवून द्यावी, असा मीं विचार केला. मीं म्हणालों, "ह्या हत्तीला किती शेपट्या आहेत रे जयंता ?"

एक !" तो म्हणाला, "ती दुसरी सोंड आहे !"

मी गारद झालों. हत्तीला जयंतानं, दोन शेपट्यांची म्हैस म्हणून गोड किलबिल केली नव्हती. 'अजब प्राणी !' ह्या मथळ्याखालीं मासिकांत आपलं आणि माझंहि–नांव छापून यायची त्यानं आणखी एक संधि वाया घालविली होती ! शिवाय एक अंक नि एक रुपयाचं नुकसान झालं होतं तें वेगळंच !

मी निराश, हताश होऊन एका बाकावर विचार करीत बसलों. जयंतानं माझा पूर्ण पराभव केला होता. लहान मुलांना किलबिल करायचीं असते, हें जणूं त्याच्या स्वप्नींहि नव्हतं ! तो आपण होऊन किलबिल करीत नव्हता म्हणून मी त्याला सूचक प्रश्न विचारीत होतों. पण त्यांनाही त्यानं दाद दिलेली नव्हती. बाकावर बसल्या बसल्या विचार करून अखेरीला मी ह्या निर्णयाप्रत येऊन पोहोंचलों; आतां आता आपण किलबिलच करायची–जयंतानं त्या किलबिलीला 'हो' म्हणून नुसती मान्यता दाखविली तरी पुरे ! मग तीच किलबिल मासिकाकडे पाठवून द्यायची !

आणि अशी संधीहि मला लगेच मिळाली बाकावर विचार करीत बसून माझ्या पायांत मुंग्या आल्या होत्या. मी बाजूला खेळणाऱ्या जयंताला जवळ बोलावलं आणि म्हणालों, जयंता, माझ्या पायाला मुंग्या आल्या आहेत. त्यांच्यावर आपण डी. डी. टी. टाकूं, म्हणजे त्या जातील, नाही ?"

आता माझ्या या प्रश्नाला जयंतानं नुसतं 'हो' म्हणून उत्तर दिलं असतं तरी ती त्याची किलबिल मी मानायला तयार होतो. बस्स ! त्यानं नुसतं हो म्हणायचं, की झाली किलबिल !

परंतु आमचे जयंतराव पडले जरा अधिक शहाणे ! ते म्हणाले, ह्या खऱ्या मुंग्या नसतात कांही ! पाय झटका म्हणजे जातील निघून ! काय हो बाबा, अलीकडे तुम्ही असं वेड्यासारखं काय हो बोलता ? त्याला एवढ्या लहान वयांत इतकं ज्ञान देणाऱ्या त्याच्या इंदूताईचा मला राग आला. माझ्या हाताची आणि त्याच्या पाठीची कडकडून भेट होण्यांत तो राग व्यक्त झाला. जयंतानं भोकाड पसरलं. मी उठलों, त्याला हातानं धरून उभं केलं आणि त्याला तसंच फरफटत ओढीत बाहेर आलों.

घरीं आल्यावर सुलूनं किलबिलीचा प्रश्न काढलाच. मी त्रोटकपणानं एवढंच म्हणालों, "आपला जयंता किलबिल करीत नाही !" आणि माझ्या कामाला लागलों.

पंधरा एक दिवस असेच गेले. जयंताची एखादी तरी किलबिल ऐकण्या-करता माझे कान उत्सुक होते. परंतु ते तेवढे भाग्यवान् नव्हते. चाळींत अजूनहि कृष्णरावांच्या अनंताचं कोडकौतुक थोड्याफार प्रमाणावर चालूच होतं आणि जयंतावरचा माझा राग दिवसेंदिवस वाढतच चालला होता. कृष्णरावांचा अनंता मंत्री होणार आणि त्याचा पट्टेवाला होण्याइतकीहि आपल्या जयंताला अक्कल नाही, ह्या विचारानं माझं मन उद्विग्न होई. त्यातल्या त्यांत समाधानाची गोष्ट एवढीच होती की, मासिकाकडे किल-बिल पाठवण्याचा माझ्या मागचा लकडा आता थंडावला होता.

आणि मग पुन्हा एक तारीख उजाडली. त्या दिवशीं पोस्टमननं त्या पाचकाचा एक अंक आमच्याकडे आणून टाकला. त्यांत कृष्णरावांच्या अनंताची आणखी एखादी किलबिल आली असावी आणि पोस्टमननं तो अंक चुकून आमच्या घरीं टाकला असावा, अशी मला शंका आली. परंतु त्या अंकाच्या वेष्टनावरील पत्ता पाहतो तों वर सुलूचं नांव !

तेवढ्यांत सुलू धांवत आली. माझ्या हातांत पाचक पाहून ती उद्गारली "आली वाटतं जयंताची किलबिल !" तिनं तो अंक माझ्याकडून हिसकूनच घेतला आणि किलबिलचं पान उघडलं.

आमच्या जयंताची 'किलबिल' छापून आली होती ! प्रथम माझा ह्या गोष्टीवर विश्वासच बसेना. पण त्या किलबिलीचा मथळा आणि पहिलं वाक्यं अगदी चक्क दिसत होती—'माझं श्राद्ध !' आमचा जयंता

चार वर्षांचा आहे. तो नेहमी फार मजेदार बोलतो—शेवटीं ' प्रेषिका ' म्हणून सुलूचं नांव होतं म्हणजे जयंताचीच तर ही किलबिल ! सुलूनं केव्हा तरी ती गुपचूप त्या मासिकाकडे पाठवून दिली असावी !

आणि मग काय विचारता ? आमच्या चाळींत पुन्हा एकदा खळबळ उडाली. कृष्णराव आणि भामाबाई यांची तोंडं उतरल्यासारखीं झालीं. त्यांच्या अनंतापेक्षां आमच्या जयंताचं कोडकौतुक अधिक होऊं लागलं. तो पुढं कोण होणार, ह्याविषयी चर्चा सुरू झाली. सुलू मोठ्या तोऱ्यानं चाळींतून हिंडूं लागली.

त्यानंतर आमच्या जयंताच्या किलबिली त्या मासिकात अगदीं नियमित-पणं येऊं लागल्या. आतापर्यंत त्यानं केलेल्या, ' सौभाग्यवती ! ' ' खाऽरे, दाणे ! ' ' अजब प्राणी ' ' डी. डी. टी. ' ' दारिद्रय ' ' नळाची मुंज ' ' देवाची कवायत ' इत्यादि अनेक सुंदर सुंदर किलबिली त्या मासिकांत येऊन गेल्या आहेत.

अर्थातच कृष्णरावांचा अनंता त्याच्यापुढं अगदी हतप्रभ झालेला आहे.

दिल्लीच्या मंत्रिपदाकरता आमच्या चाळींतल्या सर्वांनी आमच्या जयंताचीच एकमतानं निवड केली आहे. आणि कृष्णरावांचा अनंता–झाला तर होईल त्याचा पट्टेवाला असं आता सर्वत्र बोललं जात आहे.

• • •

१०

# उमा, उमा काय केलंस तूं हें !

[ ‘ राणीचा बाग ’ हें वर्टींचें एक सुंदर नाटक. विद्रूप चेहऱ्याच्या उमाकांताबरोबर सुंदर पण आंधळी उमा संसार करीत होती. सुदैवाने एका डॉक्टरच्या कौशल्याने तिला दृष्टि आली. मग मनोहर तिला वश करण्याचा यत्न करूं लागला. मनोहरने विमल नांवाच्या बालविधवेला फशी पाडलें व ह्या आरोप उमाकांतावर घेतला. उमा संतापली. उमाकांताची संगति टाळूं लागली. अखेर तिला सदय वृत्तीच्या उमाकांताच्या थोर हृदयाची कल्पना आली व मनोहरच्या पापाचा शोध लागला. ती स्वतःलाच दोष देऊं लागली. आपण मनोहरला वश होऊं लागलों, याची जाणीव तिला बोचूं लागली. उमाकांताबरोबर सुखानें जीवन जगण्याचीं स्वप्नें रंगविण्याचें सोडून जें केलें त्यामुळेंच ही शोकांतिका विलक्षण गहिरी आणि दुःखाने चिंब भिजलेली अशी होऊन पुनः नियतीच्या चाकोरींत जाऊन कोसळली. वर्टींच्या संवाद-रचनेचें आणि नाट्याला बोलकें करण्याचें सामर्थ्य या अखेरच्या अंकांत कसें रेखीवपणें प्रकट झालें आहे तें अनुभविण्यासारखें आहे.]

* * *

**मनो.**—पण ती लहर सांभाळण्यांतहि सुख असतं. उमा, आज मी किती आशेनं आलोय तुझ्याकडे ! (तिच्याजवळ जातो.)

**उमा**—(बाजूला सरकून) दूर व्हा.

**मनो.**—उमा, मला तूं दूर लोटूं शकतेस ? हेंच का तुझं प्रेम ?

**उमा**—(मोठ्याने हसून) प्रेम !

**मनो**.—उमा, आता किती छळ करतेस ह्या दासाचा ? (तिच्यासमोर गुडघे टेकून) उमा, पहा–पहा माझ्या डोळ्याकडे. त्यांत तुला तुझ्या मूर्तीशिवाय कांही दिसतं का ? माझं हृदय मला फाडून दाखवतां आलं असतं तर त्यांत देखील तुला फक्त तुझीच मूर्ति दिसली असती. उमा—उमा—

**उमा**—ह्या भाषणाची रंगीत तालीम पूर्वी कुठं तरी केलेली दिसतेय तुम्ही !

**मनो**.—रंगीत तालीम ! हा प्रसंग थट्टा करण्याचा नाही. ऐक—माझ्या मनोमंदिरांत तुझ्या सुंदर मूर्तीची स्थापना करून तिची मनोभावानं पूजा केली. तिच्या चरणकमलांवर माझ्या हृदयाचं नाजूक पुष्प वाहिलं. हे देवी, आता तुझ्या भक्तावर प्रसन्न हो, आणि प्रसाद देऊन त्याचं जीवन धन्य कर.

**उमा**—भक्तराज, देवी तुझ्यावर प्रसन्न झाली आहे, फिदा झाली आहे. काय प्रसाद पाहिजे तुला ?

**मनो**.—मघा देवीनं जो अलंकार देण्याचं वचन दिलं होतं, तो अलंकार मिळावा आता. आज कैक दिवसांपासून त्या अलंकाराकरितां हा भक्त अधीर झाला आहे !

**उमा**—तर मग भक्ता, तुझा गाल जरा पुढं कर !

[मनोहर गाल पुढे करतो. उमा काडकन् त्याच्या मुस्कटांत एक चपराक लगावते.]

**मनो**.—(गाल चोळीत उठून) उमा, हें काय ? ही कसली थट्टा !

**उमा**—भक्ता, कोण म्हणतो ही थट्टा आहे म्हणून ! हा देवीचा प्रसाद आहे. तुझ्या गालाला शोभून दिसेल असा अलंकार आहे. वा ! किती सुंदर उमटला आहे ठसा तिरंगी झेंड्याचा !

**मनो**.—उमा, तुला वेड तर नाही ना लागलं ? काल रात्रीपर्यंत माझ्यावर इतकं प्रेम केलंस—

**उमा**—(एकदम चिडून) प्रेम ! तुमच्यासारख्या नीच माणसावर प्रेम ! मनोहर, वेड मला लागलेलं नाहीं, वेड तुम्हांला लागलेलं आहे. त्याशिवाय माझं तुमच्यावर प्रेम आहे असं तुम्हांला वाटलं नसतं !

**मनो**.—म्हणजे ? तूं माझ्यावर प्रेम करीत नव्हतीस ?

**उमा**—मनोहर, नाटक तुम्हांलाच करतां येतं आणि इतरांना करतां

येत नाही असं का समजतां तुम्ही ? नाटक करायचं असलं तर गोविंदरावां-कडूनच अभिनयाचे धडे घेतले पाहिजेत असं नाही !

**मनो**.—नाटक ? म्हणजे तूं प्रेमाचं नुसतं नाटक करीत होतीस !

**उमा**—नाहींतर काय ! तुम्हांला वाटलं, माझं तुमच्यावर खरंखुरं प्रेम आहे म्हणून ! तुमचं सौंदर्य सोडलं तर काय आहे तुमच्यांत असं, कीं मीं तुमच्यावर प्रेम करावं ! पुरुषांच्या सौंदर्याला सद्‌गुणांचं कोंदण असेल तरच स्त्री त्याच्यावर प्रेम करते, समजलांत ?

**मनो**.—उमा, आज तूं एकाएकीं असं काय बोलूं लागलीस ? कां रागा-वलीस माझ्यावर ? काय अपराध घडला माझ्या हातून ?

**उमा**—आहाहा ! काय पण भोळेपणाचं सोंग आणतां !

**मनो**.—म्हणजे काय मीहि नाटक करतों ?

**उमा**—हें जग म्हणजेहि एक भलंमोठं नाटकच आहे, नाही का ? "प्रफुल्ल" मंडळींत तुम्ही हीरो झालां आहांत; पण ह्या मोठ्या नाटकांत मात्र खलनायकाची भूमिका तुमच्या वाट्याला आली आहे !"

**मनो**.—काय बोलतेस तूं ! कांहीच कळत नाही मला.

**उमा**—सांगायलाच पाहिजे का सारं ? तुमच्या कपटाचा, मित्रद्रोहाचा, पापाचा धडा ऐकवायलाच पाहिजे का तुम्हांला ? ऐका तर. तुम्ही विमलला फसवलं !

**मनो**.—(दचकून) कुणी ? मीं ?

**उमा**—होय तुम्ही ! विमलशी गोडगोड बोलून, तिला लग्नाचं वचन देऊन, तुम्हीं तिला फशीं पाडलं. ती बिचारी दुःखांत असतांनाच, माझ्याशीं लघळपणा करायला तुम्हांला कांहीच वाटलं नाही. आपला हा नीच डाव यशस्वी व्हावा, म्हणून आपलं पाप तुम्हीं उमाकांतांवर ढकलून दिलं आणि माझं मन त्यांच्याविषयी कलुषित केलंत. विमलला आपण स्वतःच लिहि-लेलीं पत्रं उमाकांतांनीच लिहिलीं आहेत, असं तुम्ही मला भासवलंत ! तुम्ही विमलच्या आयुष्याचा नाश केला आणि त्याच वेळीं आमच्या सुखाच्या संसाराचाहि धुव्वा उडवला ! किती वाईट वाटतं मला मनोहर कीं एवढ्या सुंदर रूपाच्या आंत इतकं दुष्ट मन असावं !

**मनो**.—पण तूंहि माझ्यावर प्रेम करीत होतीस. एकाच हातानं टाळी वाजत नाही !

**उमा**——माझं तुमच्यावर प्रेम कधीच नव्हतं. तुमच्याविषयीचा माझ्या मनांतला तिरस्कार कधीच कमी झाला नाही.

**मनो.**——म्हणूनच वाटतं माझ्याबरोबर फिरायला येत होतीस!——उमाकांत नको म्हणत होता तरी रात्रीं वेरात्रीं येत होतीस !

**उमा**——तुम्ही आपल्याच सौंदर्याच्या धुंदींत होता. नाहीतर माझ्या वागणुकीमागला अर्थ तुमच्या लक्षांत आला असता ! माझं तुमच्यावर प्रेम नसूनहि मी तसं नाटक करीत होतें, तें शिक्षा करण्याकरितां——

**मनो.**——शिक्षा ? कुणाला ?

**उमा**——उमाकांतांना ! त्यांनी माझा विश्वासघात केला आहे, अशी तुम्ही माझी समजूत करून दिली होती. त्याबद्दल त्यांना शिक्षा करण्याकरितां मी त्यांच्याशी कठोर वागत होतें——त्यांना दुःख व्हावं म्हणून तुमच्यावर प्रेम असल्याचं नाटक करीत होतें ! त्यांना मी शिक्षा करूं पहात होतें; पण त्यावेळीं मलाच किती भयंकर शिक्षा भोगावी लागत होती ! तुमच्याशी प्रेमाचे शब्द तोंडांतून उच्चारतांना जिभेला कशा इंगळचा डसत होत्या ! तुमचा जरासा स्पर्श झाला, तर तापलेल्या लालभडक सळईचा स्पर्श झाल्यासारखा अंगाला कसा चटका बसत होता ! तुमच्याकडे——खोटचा का होईना; पण प्रेमाच्या दृष्टीनं पाहतांना दृष्टि आल्याची मला किती लाज वाटत होती !

**मनो.**——हें सारं करतांना तुला कधीच सुख झालं नाही ! खरं सांग माझ्या सौंदर्याचा तुला कधीच मोह पडला नाही ?

**उमा**——(थोडा विचार करून) ऐका मनोहर, तुम्हांला तुमच्या सौंदर्याचा भारी अभिमान आहे. केव्हा केव्हा तुमच्या सौंदर्याचा मला मोह पडे ! नाकबूल कशाला करूं? उमाकांतावर सूड उगवण्याच्या भावनेच्या आणि तुमच्या सौंदर्याच्या प्रभावापुढं मनाला आवरून धरतां धरतां माझ्या मनाची भयंकर ओढाताण होई ! कितीतरी वेळां मी अगदी अधःपाताच्या कडचाच्या टोकापर्यंत जाऊन पोहोंचलें होतं ! मोठा भगीरथ प्रयत्न करून मी तेव्हा मनाला आवरून घेई... मनोहर, तुम्हांला वाटे मी लहरीपणा करतें.... पण त्यावेळीं माझ्या मनांत केवढं भयंकर रणकंदन चाललेलं असे, ह्याची तुम्हांला कांहीच कल्पना नव्हती. दृष्टि आल्यापासूनच्या ह्या एका महिन्याची आठवण झाली तरी अंगावर कांटा उभा राहतो ! नरक-

यातना म्हणतात त्या याहून भयंकर असतील का ? (दांतओठ खात आणि हात एकमेकांवर घट्ट चोळीत फिरूं लागते.) उमाकांताच्या मनाला मी डागण्या दिल्या ! (एकदम मनोहरकडे पाहून ओरडून) जा ! निघा ! तो आपला सुंदर चेहरा क्षणभरसुद्धा माझ्या डोळ्यांसमोर ठेवूं नका !... दुष्ट, चांडाळ, नीच (करुणपणाने).... आम्ही असं काय घोडं मारलं होतं तुमचं म्हणून तुम्ही आमच्या छोट्याशा संसाराची धूळधाण उडवून दिली ? आमच्या सुखांत कालकूट कालवलं ? (उमाकांताच्या फोटोकडे जाऊन) उमाकांत, मला क्षमा करा ! मी पातिव्रत्यापासून थोडीतरी का होईना, पण ढळलें. रामायण-महाभारतांतल्या महान् पतिव्रतांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेव, म्हणून तुम्ही मला परोपरीनं सांगत होतां. हें जग म्हणजे, एक राणीचा बाग आहे.... ह्या बागेंत माणसांच कातडं पांघरलेले दुष्ट लांडगे आहेत. उपकारकर्त्यांवर उलटणारे सर्प आहेत–नाना तऱ्हेचीं जनावरें आहेत, असं आपण मला दृष्टि येण्यापूर्वीं सांगत होतां...ह्या एका महिन्यांत मला त्याचा प्रत्यय आला !...किती कठोर बोललें मी तुम्हांला ! तुमच्या हृदयाला डागण्या दिल्या... तुमच्या कुरूपपणाचा उघडउघड तिरस्कार केला...तुम्हांला " हाईड " म्हटलं ! (एकदम मुसमुसून रडूं लागते. मग अगदी कारुण्यपूर्ण स्वरांत) मला क्षमा करा. केवढं तुमचं मन उदार आहे... पण तुम्ही आता कुठं आहांत ! तुम्ही काल दंग्याच्या भागांत गेलांत, तें अजून परत आलां नाही !...जातांना किती हताश दृष्टीनं पाहिलं तुम्ही माझ्याकडे! तुमच्या तोंडावरचं दुःख मला आरशांत दिसलं; पण मीं मन घट्ट केलं ! मनाला वेदना होत होत्या तरी तुमच्याशी कठोरपणानं वागलें ...तुमच्याशीं दोन प्रेमाचे शब्दहि बोललें नाही !...तुम्हांला ताप येत होता...मी तुमची शुश्रूषा करायची... .पण ह्या चांडाळणीनं कधी तुमच्या औषधाची विचारपूसहि केली नाही आणि तुम्ही कर्णिकांना म्हणालां...... तुमचा जीव मौल्यवान आहे...तुम्हांला बायको आहे ! तुमच्या आत्म्याचा किती भेसूर विलाप ह्या साध्या शब्दांतून बाहेर पडला !... पण मला पिशाच्चानं झपाटलें होतें ! मी दगडासारखी कठोर राहिलें!...(आवेगानें) उमाकांत, कुठं आहांत तुम्ही ? या, लवकर या. परमेश्वरा, त्यांना परत सुखरूप परत आण रे ! (भिंतीवर डोकें ठेवून थोडा वेळ स्तब्ध राहते. मग

क्रमांक २८.३... दि... नों. दि...

मनोहरकडे पाहून एकदम ओरडून) तुम्ही अजून इथच ! जा–जा म्हणतेना माझ्या डोळ्यांसमोरून ! (मनोहर खाली मान घालून जाऊं लागतो. उमा शांतपणाने) पण नको. जरा थांबा. तसेच उभे राहा. (आंतल्या खोलींत शांतपणाने जाते. मनोहर गोंधळून उभा राहतो. उमा आंतल्या खोलींत गेल्यावर सावकाश पावलें टाकीत उमाकांत येतो. त्याचा डावा हात झोळींत आहे. डोक्यावर मोठी पट्टी बांधलेली आहे. तोंडावर ठिकठिकाणीं चिकणपाटचा लावलेल्या आहेत. आपला कोट त्याने खांद्यावर अडकवलेला आहे. तो मनोहरकडे पाहतो, आणि चालण्याच्या श्रमांनी थकून गेलेला आपला देह एका खुर्चीवर लोटून देतो. त्याच्याबरोबर कर्णिक येतो.)

**मनो.**––कोण––उमाकांत ? आलास ?

**उमाकांत**––हं ! उमा कुठं आहे ?

**मनो.**––आंतल्या खोलींत आहे.

**उमाकांत**––कुठं बाहेर जाण्याची तयारी करते आहे ?

**मनो.**––नाही ! पण, उमाकांत, हें काय ? तुझ्या शरीरावर इतक्या पट्टया कसल्या ह्या ?

**उमाकांत**––हा दंग्याचा प्रसाद !...कर्णिक,जा तुम्ही आतां. (कर्णिक जातो.)

**मनो.**––इतका वेळ कुठं होतास तूं ?

**उमाकांत**––हॉस्पिटलमध्ये. मला हॉस्पिटलमधून येऊं देत नव्हते–– पण आलों ! कां आलों ? कोट टेबलावर टाकतो आणि एकदम एका खुर्चीत लवंडतो. धापा टाकीत)...उमा बरी आहे ना ?

**मनो.**––बरी आहे. .बरंच लागलेलं दिसतंय तुला !

**उमाकांत**––(एक सुस्कारा टाकून) हो. दुर्दैवानं मी मेलों नाही! परत यायला जिवंत राहयलों. कर्णिकच्या बदली मी गेलों हें किती बरं झालं !

[उमाकांत बोलत असतांनाच उमा चाचपडत चाचपडत प्रवेश करते. तिने आपला डोळा फोडून घेतलेला आहे, आणि त्यांतून रक्त वहात आहे. तिच्या हातांतली कटयार ती टाकते आणि खुर्चीवर रेलून पडते.]

**उमा**––(आनंदी स्वरांत) कोण ? तुम्ही ? आलांत ना सुखरूप? (मनोहर आणि उमाकांत उमाकडे धावत जातात.)

**मनो**.––उमा, हें काय ? (मनोहर खिशांतला रुमाल काढतो आणि तिच्या डोळ्यांना बांधतो.)

**उमाकांत**—(कळवळून) उमा, उमा, काय केलंस तूं हें ? इतक्या प्रयत्नांनी तुला दृष्टि मिळालेली, तूं आपला डोळा फोडून घेतलास ! पुन्हा आंधळी झालीस!

**उमा**––(उमाकांताला) छे ! मी आंधळी झालें नाही, डोळस झालें. असे जवळ या. (उमाकांत तिच्या जवळ जातो, त्याचा हात आपल्या हातांत घेऊन कुरवाळीत) तुम्ही सुखरूप आहांत ना ?

**उमाकांत**—(हात सोडवून घेऊन) दुर्दैवानं आहे !

**उमा**––असं काय बोलतां !

**उमाकांत**––थोडक्यांत चुकलं. नाहीतर उमा, तुझ्या सुखांत व्यत्यय आणायला मी परत आलों नसतों ! शिवाय मी आता अधिकच कुरूप होऊन आलोंय ! तुला माझ्याकडे पाहवलं नसतं !

**उमा**––पण आता तुम्ही मला अधिकच सुंदर दिसतां आहां !

**उमाकांत**––हें काय केलंस तूं उमा ? एवढ्या परिश्रमानं मिळालेली दृष्टि तूं आपल्या हातांनी नाहीशी केलीस ! हा काय अविचार केलास ?

**उमा**––(हसून शांतपणाने) हा अविचार नाही. हें पूर्ण विचारांचं फळ आहे. माझी दृष्टि गेली नाही––माझी गेलेली पूर्वीची खरी दृष्टि मी आता परत मिळविली आहे !

**उमाकांत**––असं काय बोलतेस हें ?

**उमा**––मनोहर, माझ्या डोळ्यांसमोरून निघून जा, असं मी मघा तुम्हांला म्हटलं होतं; पण आता तशी जरुरी राहिली नाही. या. इथं असे माझ्याजवळ येऊन बसा. (मनोहर एक खुर्ची ओढून घेऊन तिच्याजवळ बसतो.) बसलांत ? हें पहा, मी आतां तुमच्याकडे अगदी रोखून पाहतें. आता मला तुमच्या सुंदर रूपाची भीति वाटत नाही. प्रत्यक्ष मदन माझ्या समोर येऊन उभा राहिला तरी आता माझ्या मनाची चलबिचल व्हायची नाही. तुमची कटचार आज माझ्या किती उपयोगी पडली म्हणून सांगूं ? आता माझी मूळची दृष्टि मला परत मिळाली ...जी दृष्टि अधिक खोलीवर पहाते... ज्या दृष्टीला माणसाच्या अंतर्यामाचा तळदेखील अगदी स्पष्ट दिसतो; माणसाचं बहेरचं गोरगोमटं किंवा कुरूप रूप पाहून जिच्यावर यत्किंचितहि परिणाम होत नाही, अशी ही दिव्य

दृष्टि मी परत मिळविलेली आहे! पहा, ह्या अंधारांत तुमचं मन मला कसं लख्ख दिसतं आहे! सांगूं का मला तिथं काय दिसतं तें? तिथं उकिरड्यासारखी घाण साचलेली आहे. आणि त्या वासनांच्या, मदाच्या, गर्वाच्या, कपटाच्या घाणींत एक भयंकर सर्प आपल्या जिभा लालसीपणानं बाहेर काढीत वळवळत पडला आहे! तुम्हीं आपल्या कपड्यावर कितीहि सेंट शिंपडला, तरी ती घाण आता मला शिसारी आणते.

**मनो**.—नको, उमा, माझ्या हृदयाला अशा डागण्या देऊं नकोस!

**उमा**—पण त्या सर्पाची मला आता मुळीच भीति वाटत नाही.

**मनो**.—उमा, उमाकांत, मला क्षमा करा. उमानं आपला डोळा फोडून घेतला; पण त्यामुळे माझे डोळे उघडले. ह्या जगांत केवळ वासना, लालसा आणि सुखोपभोग ह्यांच्याशिवाय कांहीतरी उदात्त, पवित्र गोष्टी आहेत, हें मला आज कळलं. मला माझ्या सौंदर्याचा मोठा गर्व होता. उमा आंधळी असतांना ती माझ्या सौंदर्याचा तिरस्कार करी. माझा स्वाभिमान डिवचला गेला होता. उमाला दिसूं लागतांच तिच्यावर माझ्या सौंदर्याची मोहिनी टाकून त्या अपमानाचं उट्टं काढावं म्हणूनच मी एवढ्या नीचपणानं वागलों!... उमा, मी इतका दुष्ट नाही ग!

**उमाकान्त**—जाऊं दे मनोहर, शांत हो. झाल्या गोष्टी होऊन गेल्या!

**मनो**.—उमानं आपला डोळा फोडून घेतला. कां! उमाकांत, तूं कुरूप आहेस म्हणून मी तुझी कींव करीत होतों, तिरस्कार करीत होतों; पण तूंच खरा सुदर आहेस! उमाचं तुझ्यावर स्वर्गीय, नितान्त, प्राणान्तिक प्रेम आहे, आणि म्हणूनच तिनं आपला डोळा फोडून घेतला!... उमा, मी जातों. मला इथं राहवत नाही! तुमच्या अविचल, सात्त्विक प्रेमाचं हें वातावरण मला असह्य होतं आहे! (जातो.)

**उमाकांत**—उमा, उमा, तूं आपला डोळा फोडून कां घेतलास?

**उमा**—तो डोळा पापी होता—विकृत होता. त्या डोळ्याला खरीं सुंदर माणसं कुरूप दिसत आणि कुरूप माणसांचा मोह पडे.

**उमाकांत**—हा एवढा स्वार्थत्याग कशाला केलास तूं?

**उमा**—स्वार्थत्याग नाही हा; हें प्रायश्चित्त आहे! गेल्या एक महिन्यांत मीं जीं पापं केलीं, ती धुऊन काढण्याकरितां मला हें दिव्य करावं लागलं.

ग्रं. क्र. १०६३

**उमाकांत**—उमा, उमा, पण भंगलेलं स्वप्न कधीं परत सांधतां येईल का ?

**उमा**——भंगलेलं स्वप्न ! गेल्या एक महिन्यांतल्या घडामोडी हेंच एक भयंकर स्वप्न होत. तें आता भंगलं आहे. आणि तें पुन्हा कधींहि पहायची माझी इच्छा नाही ! जग हा एक मोठा थोरला राणीचा बाग आहे असं तुम्ही म्हणालां होतां. एका महिन्यांतच मी तो बाग पाहून कंटाळलें—— आणि तुम्ही वर्षांनुवर्षें तो पाहातां आहां ! किती अभागी आहांत तुम्ही ! मीच तुमची कींव करायला हवी. मला क्षमा करा. मीं तुम्हांला त्रास दिला, दुःख दिलं, मुद्दाम तुमचा तिरस्कार केला——

**उमाकांत**——उमा——विसर तें सारं !

**उमा**—पण माझा तुम्ही तिरस्कार करीत नाही ना !

**उमाकांत**——तुझा तिरस्कार ! उमा, तें कधी तरी शक्य आहे का ! मला एकच ठाऊक आहे...तुझ्यावर प्रेम करणं...निरपेक्ष प्रेम करणं. (उमा गप्पच राहते.) उमा, बोल ना. बोलत कां नाहीस ?

**उमा**—मी तुमचं सौंदर्य पहातें आहें. प्रकाशांत तें मला दिसत नव्हतं. माझ्या अंधारांतल्या दुनियेंत तें मला आता पुन्हा स्पष्ट दिसूं लागलंय्. अहाहा ! एकाद्या देवाच्या मूर्तीइतकं तें मला सुंदर दिसतंय. औदार्य, प्रेम, शांति, दया—किती अलंकारांनी नटली आहे ती मूर्ति ! आसमंतात् किती शांत, सात्त्विक तेज विखरतं आहे !

**उमाकांत**——(आनंदाने मोठ्याने हसून) उमा, अजूनहि तूं पूर्वीसारखीच वेडी आहेस !

**उमा**——तुमचा कोट कुठं आहे ?

**उमाकांत**——कोट ? तिथं त्या टेबलावर आहे.

**उमा**——आणा पाहूं जरा.

[तिच्या ह्या विचित्र बोलण्याचें आश्चर्य करीत, उमाकांत कोट घेऊन येतो.]

**उमाकांत**—हा आणला.

**उमा**——आणला ? हं, आता तो तिथं खुंटीला टांगून ठेवा पाहूं.

**उमाकांत**——पण तुझ्या ह्या सुंदर दिवाणखान्याची शोभा . , . .

**उमा**——(संध्येच) त्यानंच वाढणार आहे !

[ उमाकांत हसत हसत कोट खुंटीला टांगतो.]

• • •

अनुक्रमांक 21326 नों: दि: 1799

REFBK-0010863

# मराठी साहित्य-दर्शन माला

[ मराठी भाषेंतील खालील नऊ नामवंत लेखकांच्या साहित्याचें दर्शन घडविणारी माला ]

| पुष्प क्र. | लेखक |
|---|---|
| १. | प्रा. ना. सी. फडके |
| २. | श्री. ग. त्र्यं. माडखोलकर |
| ३. | श्री. गो. नी. दांडेकर |
| ४. | आचार्य प्र. के. अत्रे |
| ५. | श्री. व्यंकटेश माडगूळकर |
| ६. | डॉ. अ. वा. वर्टी |
| ७. | प्रा. अनंत काणेकर |
| ८. | श्री. ग. दि. माडगूळकर |
| ९. | कै. अ. ब. कोल्हटकर |